CMYK




सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

लातूर | रविवार, ६ सप्टेंबर २०२६ | वर्ष ४ थे अंक १७७ | पाने १२+८ | किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




## विचारपुष्प



कार्यकर्त्याने 'अनसूय' - कोणाचीही असूया न करणारे बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मनःस्वास्थ्य उत्तम ठेवायचे असेल तर कधीही कोणाविषयी वाईट विचार मनात आणू नये. सर्वच चांगले आहेत असाच विचार मनात आला पाहिजे.

**- स्व. रंगा हरी**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. बौद्धिक प्रमुख

## झीरम खोरे हल्ला

# १० नक्षलवादी दोषी

### १३ वर्षांनंतर एनआयए न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**रायपूर, ५ सप्टेंबर**

छत्तीसगडमधील झीरम खोऱ्यात झालेल्या नक्षलवादी हल्ल्याप्रकरणी एनआयए विशेष न्यायालयाने शनिवारी ऐतिहासिक निकाल देत सुमारे १३ वर्षे जुन्या प्रकरणातील उर्वरित १० आरोपींना दोषी ठरवले आहे. बऱ्याच काळापासून निकालाची प्रतीक्षा करीत असलेल्या पीडितांच्या कुटुंबीयांसह समर्थकांसाठी हा एक महत्त्वपूर्ण निर्णय आहे. या हल्ल्यात काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांसह २९ जण ठार झाले होते.



झीरम खोरी नक्षलवादी हल्ला प्रकरणात न्यायालय आता १६ सप्टेंबरला शिक्षा सुनावणार आहे. आरोपींनी या निकालाला उच्च न्यायालयात आव्हान देणार असल्याचे म्हटले आहे. ही भयानक घटना २५ मे २०१३ रोजी घडली होती. नक्षलवाद्यांनी काँग्रेसच्या 'परिवर्तन यात्रे'दरम्यान दरभाच्या झीरम व्हॅलीत एक पूर्वनियोजित हल्ला केला होता. या घटनेच्या दोन दिवसांनंतर २७ मे २०१३ रोजी केंद्र सरकारने तपास एनआयएकडे सोपवला.

नक्षलवाद्यांनी २५ मे २०१३ रोजी बस्तरच्या दरभा भागातील झीरम खोऱ्यात काँग्रेस परिवर्तन यात्रेवर हल्ला केला होता. ही यात्रा सुकमा येथून जगदलपूरकडे परत येत असताना नक्षलवाद्यांनी अचानक हल्ला करून गोळीबार केला. या हल्ल्यात तत्कालीन काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नंदकुमार पटेल, त्यांचे पुत्र दिनेश पटेल, ज्येष्ठ नेते महेंद्र कर्मा, माजी केंद्रीय मंत्री विद्याचरण शुक्ला आणि काँग्रेस नेते उदय मुदलियार आणि १० सुरक्षा कर्मचाऱ्यांसह २९ जण ठार झाले होते. तर ३० हून अधिक जण जखमी झाले.

**१०१ साक्षीदारांचे नोंदवले जबाब**

या हल्ल्यात बंदी घातलेल्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (माओवादी) विविध कार्यकर्त्यांची आणि लष्करी तुकड्यांची भूमिका असल्याचा आरोप एनआयएने केला. खटल्याच्या सुनावणीदरम्यान, अभियोजन पक्षाने कागदपत्रे आणि इतर पुरावे सादर केले आणि १०१ साक्षीदारांचे जबाब नोंदवण्यात आले. या प्रकरणात प्रमिला मोडियम, चैतू लेकम उर्फ मुन्ना, सुमित्रा उर्फ सुमित्रा पुनेम मोडियम, मुक्का मांडवी, कोसा कावासी उर्फ कोसाराम, आयाता मरकम, मदकामी देवा, जोगा मडकामी, बंजामी सन्ना उर्फ चमरू उर्फ डेंगा आणि महादेव नाग यांच्या विरोधात खटल्याची सुनावणी कोर्टात झाली. आरोपींतर्फे अधिवक्ता अरविंद चौधरी यांनी बाजू मांडली. (वृत्तसंस्था)

### महेंद्र कर्मा यांच्या पार्थिवावर केले होते नृत्य

सुकमा येथून परतताना ताफा दुपारी सुमारे साडेतीन वाजता झीराम खोऱ्यात पोहोचला. डोंगरांवर सशस्त्र नक्षलवाद्यांना पाहून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आले. हल्लेखोरांनी महेंद्र कर्मा यांना पकडले होते. मला आणि इतर जखमींना डोंगराच्या उतारावर नेण्यात आले. त्या क्षणी सुमारे ६० सशस्त्र नक्षलवाद्यांनी घेरल्यामुळे त्यांच्या जगण्याची कोणतीही आशा नव्हती. हल्लेखोरांनी नंदकुमार पटेल यांच्याबद्दल चौकशी केली. माहिती न दिल्यास सर्वांना ठार मारण्याची धमकी दिली. मात्र, हा मृतदेह नंदकुमार यांचा नसून महेंद्र कर्मा यांचा असल्याचे सांगताच नक्षल्यांनी मृतदेहावर बिभत्स नृत्य केले, अशी अंगावर शहारे आणणारी आठवण काँग्रेस नेते शिव सिंह ठाकूर यांनी सांगितली.

### पुलवामा हल्ला; आरोपीचा जामीन नाकारला

**दिल्ली, ५ सप्टेंबर**

पुलवामा दहशतवादी हल्ला प्रकरणातील आरोपी मोहम्मद इक्बाल राथरला दिल्ली एनआयए न्यायालयाने अंतरिम जामीन नाकारल्याची माहिती समोर आली आहे. राथरने बहिणीच्या लग्नासाठी ५ ते १० सप्टेंबरदरम्यान १० दिवसांची तात्पुरता जामीन मागितला होता. मात्र राष्ट्रीय सुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था आणि नागरिकांच्या सुरक्षेचा मुद्दा न्यायालयाने महत्त्वाचा मानला जात आहे.

आरोपीच्या वैयक्तिक इच्छेपेक्षा सुरक्षेच्या चिंतेला प्राधान्य देण्यात येत असल्याचे कोर्टाने सांगितले. त्यामुळे राथरला प्रत्यक्ष लग्नाला उपस्थित राहण्याची परवानगी मिळाली नाही. मात्र मानवतावादी दृष्टिकोनातून त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे लग्नात सहभागी होण्याची परवानगी कोर्टाने दिली आहे. पुलवामा दहशतवादी हल्ल्यातील मुख्य आरोपी आणि जैश-ए-मोहम्मदचा दहशतवादी मोहम्मद उमर फारूकला मदत करणाऱ्या मुझम्मिल इक्बाल राथरला राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) सहावा आरोपी म्हणून अटक केली होती. इक्बाल राथर जम्मू-काश्मीरमधील बडगाम येथील रहिवासी आहे. (वृत्तसंस्था)



मुंबईतील दादर येथे शनिवारी जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. गोविंद पथकांनी उंचावर टांगलेली दहीहंडी फोडण्यासाठी असा मानवी मनोरा तयार केला.

## महत्त्वाचे

### आसीम मुनीर झाले पाकिस्तानचे हुकूमशहा

**इस्लामाबाद :** पाकिस्तानात नागरी-लष्करी रचनेत ऐतिहासिक बदल करण्याच्या निर्णयाचा भाग म्हणून लष्करप्रमुख फील्ड मार्शल आसीम मुनीर यांनी शनिवारी 'चीफ ऑफ डिफेन्स फोर्सेस' अर्थात् सीडीएफ या नवीन पदाची जबाबदारी स्वीकारली. त्यांच्याकडे तिन्ही दलाची सूत्रे देण्यात आली असून, अण्वस्त्रांचाही ताबादेखील त्यांच्याकडे राहणार आहे. अण्वस्त्रांचा वापर करण्यासाठी त्यांना कुणाचीही परवानगी घ्यावी लागणार नाही. पाकिस्तनच्या इतिहासात प्रथमच एकाच लष्करी अधिकाऱ्याकडे तीनही सैन्यदलांची कमान सोपवण्यात आली.



### आरबीआयचा पाच कंपन्यांना दणका

**नवी दिल्ली :** नियमांचे पालन न करणाऱ्या पाच कंपन्यांवर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने दंडात्मक कारवाई केली आहे. आरबीआयने या कंपन्यांना वेगवेगळ्या कारणांसाठी ४५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. ट्रान्सयूनियन सिबिल, सीआरआयएफ हाय मार्क क्रेडिट इन्फॉर्मेशन सर्व्हिसेस, इक्विफॅक्स क्रेडिट इन्फॉर्मेशन सर्व्हिसेस, सम्मान फिनसर्व्ह आणि हिंदुजा लेलंड फायनान्स यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. आरबीआयने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकांनुसार वेगवेगळ्या कंपन्यांनी नियमांकडे दुर्लक्ष केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली आहे.

### उधारीवर किराणा माल न दिल्याने महिलेला मारहाण

**पुणे, दि. ५ सप्टेंबर -**

उधारीवर किराणा माल न दिल्याने किराणा माल विक्रेत्याला मारहाण करण्यात आल्याची घटना हडपसर भागात घडली. या प्रकरणी एका दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. दाम्पत्याने किराणा माल विक्रेत्या महिलेला वीट फेकून मारल्याने त्या जखमी झाल्या. सीमादेवी रामबाबू पटेल (वय ३६) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, सोहेल बळीराम कांबळे (वय २५), त्याची पत्नी नीलू (वय २३) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पटेल यांचे हडपसरमधील माळवाडी भागात श्रीराम सुपर मार्केट हे किराणा माल विक्री दुकान आहे. आरोपी दाम्पत्य हे ३ ऑगस्ट रोजी रात्री दहाच्या सुमारास पटेल यांच्या दुकानात आले. आरोपींनी त्यांच्याकडे उधारीवर किराणा माल मागितला. तेव्हा आरोपी दाम्पत्याने त्यांना करुन धक्काबुक्की करून जखमी केले.

## भारताचा पाकिस्तानवर दणदणीत विजय

**दुबई, ५ सप्टेंबर**

श्री चरणी व प्रेमा रावतची प्रभावी गोलंदाजी आणि कर्णधार हरमनप्रीत कौर व दीप्ती शर्माच्या नाबाद फलंदाजीच्या बळावर भारताने महिलांच्या आशिया चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेतील आपल्या अखेरच्या साखळी सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानवर ६८ चेंडू शिल्लक ठेवित ७ गड्यांनी सहज विजय नोंदविला.

पाकिस्तानच्या महिला संघाला १८.१ षटकांत ५५ धावांत गुंडाळल्यानंतर भारताने ८.४ षटकांत ३ गडी गमावित ५७ धावा काढून आपला विजय साकार केला.



हरमनप्रीत कौर

विजयासाठी धावांचा पाठलाग करताना भारताने आपले तीन मोहरे लवकरच गमावले. फातिमा सनाने शेफाली वर्मा (१२), स्मृती मंधाना (९) व प्रतिका रावतला (४) बाद केले, परंतु त्यानंतर हरमनप्रीत १८) व दीप्ती शर्माने(१२) नाबाद खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला. (वृत्तसंस्था)

# नक्षलवाद, दहशतवादाच्या नाड्या आवळल्या

### पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन, तत्कालीन सरकारच्या अपयशावर हल्ला

**नवी दिल्ली, ५ सप्टेंबर**

आमचे सरकार सत्तेवर येण्यापूर्वी २०१३ मध्ये देशाचा विकास खालच्या पातळीवर होता आणि महागाई गगनाला भिडली होती. घोटाळेबाज आणि भ्रष्टाचारी मोकाट फिरत होते. दहशतवाद आणि नक्षलवाद देशाला अस्थिर करण्याच्या प्रयत्नात होता आणि पाकिस्तानवर कोणाचेही नियंत्रण नव्हते. अशा परिस्थिती जनतेने आमच्यावर विश्वास ठेवत सत्ता सोपवली, गेल्या दशकात आम्ही नक्षलवाद, दहशतवादाच्या नाड्या आवळल्या आणि पाकिस्तानला अद्दल घडवली. अर्थव्यवस्था आणि विकासाला नवी दिशा मिळाली असून आगामी काळात भारत संशोधन आणि नवोपक्रमात जगाचे नेतृत्व करेल, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी एका कार्यक्रमात व्यक्त केला.

दिल्ली विद्यापीठाच्या प्रतिष्ठित श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्स (एसआरसीसी) च्या शताब्दी सोहळ्यात विद्यार्थ्यांना संबोधित करताना मोदी म्हणाले, पूर्वी भारताच्या संरक्षण क्षेत्रासाठी लागणारी बहुतांश उपकरणे परदेशातून खरेदी करावी लागायची. लष्कर, वायुदल आणि नौदलालाही छोट्या उपकरणांसाठी महिनोन्महिने वाट पाहावी लागत होती. आज भारताचे संरक्षण उत्पादन २ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त होऊन



आतापर्यंतच्या उच्चांकावर पोहोचले आहे. २०१३ पर्यंत आपली संरक्षण निर्यात केवळ ६००-७०० कोटी रुपये होती, तर आज भारत ४०,००० कोटी रुपयांच्या संरक्षण उत्पादनांची निर्यात करत आहे. जागितक अनिश्चिततेच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था इतर देशांच्या तुलनेत सुसाट आहे. २०१३ पर्यंत ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांना बचत खाते उघडण्यासाठीही संघर्ष करावा लागत होता. ही परिस्थिती बदलण्यासाठी आम्ही जन धन योजना सुरू केली.

**मेट्रोमधून प्रवास, मुलांशी गप्पा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एसआरसीसीपर्यंतचा प्रवास मेट्रो ट्रेनमधून केला. यावेळी त्यांनी विशेषतः लहान मुले आणि महिलांशी संवाद साधला. त्यांनी अनेक मुलांना आपल्या शेजारी बसू दिले आणि त्यांच्यासोबत विनोदी प्रश्नोत्तरे केली. (वृत्तसंस्था)

### खिल्ली उडवणाऱ्यांचा दातखळी बसली

पंतप्रधान म्हणाले, २०१३ मध्ये याच महाविद्यालयातील कार्यक्रमात जेव्हा मी म्हणालो होतो की, आपल्याला 'मेड इन इंडिया'वर काम करायचे आहे, तेव्हा त्या क्षेत्रातील लोकांना हे समजले नाही. त्यांना वाटले की, निराशेच्या काळात 'मेड इन इंडिया'सारखी गोष्ट शक्य होणार नाही. अनेकांनी योजनेची खिल्ली उडवली. मात्र या उपक्रमामुळे जागतिक पटलावर भारताचा दबदबा पाहून अनेकांची दातखळी बसली.



सरसंघचालक डॉ मोहनजी भागवत यांनी शनिवारी लंडनमधील विल्सडेन येथील श्री स्वामिनारायण मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले. तसेच खालसा जत्था ब्रिटिश आईल्स गुरूद्वारालाही मोहनजी यांनी भेट दिली

# भीषण अपघातात आठ विद्यार्थ्यांचा मृत्यू

**थ्रिसूर , ५ सप्टेंबर**

केरळमधील थ्रिसूर जिल्ह्यात एनएच-६६ वर उभ्या असलेल्या एका मालवाहू ट्रकला कारने जबर धडक दिली. यात तामिळनाडूच्या डिंडीगुल येथील आठ अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. हा अपघात शुक्रवारी रात्री सुमारे ११.४० वाजता कैपमंगलममधील पनंबिक्कुन्नू येथे घडला.

पोलिसांनुसार, अपघातग्रस्त भागात सुरू असलेल्या बांधकाम कामामुळे वाहतूक वळवण्यात आली होती. बॅरिकेड लावलेल्या भागाजवळ महामार्गाच्या उजव्या बाजूला ट्रक अनधिकृतपणे उभा होता. तर कार वेगाने जात होती. धडक बसण्यापूर्वी चालकाच्या नजरेस वाहतूक वळवणारा बॅरिकेड पडलाच नाही. त्यामुळे कार थेट ट्रकला धडकली. या अपघातात सहा विद्यार्थ्यांचा जागीच तर दोघांना रुग्णालयात उपचारापूर्वी मृत्यू झाला. मृतांपैकी पाच जण सूर्या, युवसंजित, जोशुआ, मुरली आणि जीवा हे दिंडीगुलचे तर संतोष आणि प्रसन्न मदुराईचे आणि विश्व सालेमचा रहिवाशी होता.



अपघातात चक्काचूर झालेले वाहन

**ओळखपत्रांच्या आधारे मृतांच्या कुटुंबीयांशी संपर्क**

मृत विद्यार्थी डिंडीगुल येथील एका अभियांत्रिकी महाविद्यालयाचे होते. ते कोडुंगल्लूरच्या दिशेने प्रवास करत होते. अपघातानंतर स्थानिक नागरिक, अग्निशमन आणि बचाव पथक तसेच पोलिसांच्या मदतीने विद्यार्थ्यांना चक्काचूर झालेल्या कारमधून बाहेर काढले. पीडितांकडे सापडलेल्या विद्यार्थी ओळखपत्रांच्या आधारे मृतांच्या कुटुंबीयांशी संपर्क साधला. (वृत्तसंस्था)

# शिक्षकांचा सन्मान हाच प्रगत समाजाचा पाया

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय पुरस्काराने गौरव

**नवी दिल्ली, ५ सप्टेंबर**

शिक्षक केवळ विद्यार्थ्यांना ज्ञान देत नाहीत, तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला, चारित्र्याला आणि विचारांना आकार देऊन सशक्त राष्ट्राची पायाभरणी करतात, असे उद्गार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढले आहे. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, रवींद्रनाथ टागोर आणि गोपाळबंधू दास यांचे शैक्षणिक योगदान कुणीही विसरू शकणार नाही, असे त्या म्हणाल्या.

देशभरातील गुणवंत शिक्षकांचा त्यांच्या हस्ते शनिवारी राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी त्या बोलत होत्या. राष्ट्रपतींनी अंदमान-निकोबारपासून लडाखपर्यंत दुर्गम आणि ग्रामीण भागात प्रतिकूल परिस्थितीत कार्य करणाऱ्या शिक्षकांच्या समर्पणाचे त्यांनी कौतुक केले.

उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील ९ गुणवंत शिक्षकांचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२६ ने गौरव करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे आयोजित दिमाखदार सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते या पुरस्कारांचे आज वितरण करण्यात आले. देशभरातील ४८ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक आणि १३ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षक, अशा एकूण ८२ शिक्षकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

पुरस्कारार्थींना प्रमाणपत्र, पदक आणि ५० हजार रुपये रोख पुरस्कार प्रदान करण्यात आला. (वृत्तसंस्था)



(छायाचित्रे पान २ वर...)

### राज्यातील नऊ शिक्षकांचा समावेश

राष्ट्रपती यांच्या हस्ते डॉ. अमर मोहनराव ताकसांडे (जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालय, दत्ता मेघे संस्था, वर्धा) डॉ. कविता नृसिंहराव गिट्टे (बीड), श्रीमती कुंदा जयवंत बच्छाव(नाशिक), वैभव वसंतराव कुलकर्णी (लातुर), शिवप्रसाद अरविंद टिंगरे (सातारा), डॉ. विक्रम विशाल (मुंबई), डॉ. संदीपान प्रल्हाद नरोटे (सोलापूर), किरण प्रकाश झारकर (धाराशिव) आणि श्रीमती अर्चना राकेश जाधव (नाशिक) यांचा समावेश आहे.

### व्हिडीओ कॉलवर बोलणाऱ्याचा मोबाईल हिसकावला

**पुणे, ५ सप्टेंबर**

मित्राशी व्हिडिओ कॉल वर बोलणाऱ्या तरुणाचा मोबाइल हिसकावून नेण्यात आल्याची घटना कोंढव्यात घडली. या प्रकरणी दुचाकीस्वार चोरट्यांविरुद्ध कोंढवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

याबाबत एका तरुणाने कोंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार तरुण बिबवेवाडीतील आईमाता मंदिर परिसरात राहायला आहे. तो शुक्रवारी (४ ऑगस्ट) मध्यरात्री बाराच्या सुमारास कोंढव्यातील कमेला वसाहत परिसरातून निघाला होता. त्या वेळी तरुण मोबाइलवर बोलत निघाला होता. दुचाकीस्वार चोरट्यांनी तरुणाच्या हातातील दहा हजार रुपयांचा मोबाइल हिसकावून नेला. तरुणाने आरडाओरडा केला. दुचाकीस्वार चोरटे पसार झाले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### जरांगेंनी सरकारला दिला अल्टिमेटम

**अंतरवाली सराटी :** मराठा आरक्षणावरून मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू आहे. शुक्रवारी या आंदोलनाचा सातवा दिवस होता. गुरुवारी राज्य सरकारच्या मंत्र्यांच्या शिष्टमंडळाने जरांगे यांची भेट घेत समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, शिष्टमंडळाला यश आले नाही. जरांगे उपोषणावर ठाम आहे. शिष्टमंडळात मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मंत्री उदय सामंत आणि भाजपा आमदार प्रसाद लाड यांचा समावेश होता. दरम्यान, जरांगे यांनी ११ तारखेपर्यंत सगळ्या मान्य करा, असा नवा अल्टिमेटम सरकारला दिला आहे. ११ तारखेला मागण्या मान्य झाल्यास मुंबईत गुलाल घेऊन येऊ आणि १२ तारखेच्या बैठकीत पुढचा निर्णय घेऊ, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. यावर, शिष्टमंडळाले तुमच्या सर्व मागण्या मान्य पूर्ण होतील. तुम्ही उपोषण मागे घ्या, अशी वारंवार विनवणी केली. मात्र, पाणी पितो, सलाईन लावतो. परंतु, उपोषण मागे घेणार नाही, असा पवित्रा जरांगेंनी घेतला. अखेर अडीच तासांच्या चर्चेनंतर मंत्र्यांचं शिष्टमंडळ माघारी परतले.

### १५ सप्टेंबरपासून आदि कैलास यात्रा

**पिथौरागढ :** चीन सीमेला लागून असलेल्या पिथौरागढ जिल्ह्यातील व्यास खोऱ्यात भगवान शिवाचे प्राचीन धाम आदि कैलास आणि ओम पर्वताची यात्रा १५ सप्टेंबरपासून पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. मान्सूनमुळे जुलै आणि ऑगस्टमध्ये यात्रा स्थगित करण्यात आली होती. आता पावसाळा संपल्यानंतर प्रवाशांसाठी इनर लाइन परमिट जारी करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. या वर्षी आदि कैलास यात्रेने भाविकांच्या संख्येचा नवा विक्रम केला आहे. मे आणि जूनमध्येच सुमारे ५२ हजार भाविकांनी आदि कैलास आणि ओम पर्वताचे दर्शन घेतले आहे. मान्सूनमध्ये रस्त्यावर भूस्खलन, दरडी कोसळणे आणि इतर धोके लक्षात घेता प्रशासनाने जुलै-ऑगस्टमध्ये यात्रेवर बंदी घातली होती. आता हवामानात सुधारणा झाल्याने यात्रा मार्ग पुन्हा सुरू करण्याची तयारी आहे.

### गांजा सेवन करणारा वैमानिक बडतर्फ

**नवी दिल्ली :** मादक द्रव्य पॉझिटिव्ह आलेल्या वैमानिकाला एअर इंडियाने तात्काळ बडतर्फ केले आहे. हा तोच वैमानिक आहे जो फुकेटहून दिल्लीला जाणाऱ्या विमानात होता. या उड्डाणादरम्यान विमान अचानक सुमारे ३०० फूट खाली आले होते. या घटनेनंतर दोन्ही पायलटांची चाचणी करण्यात आली. कमांडरची प्राथमिक चाचणी पॉझिटिव्ह आली. त्यानंतर पुष्टीकरणासाठी नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले. कमांडरची दुसरी चाचणीही पॉझिटिव्ह आली. तर दुसऱ्या पायलटची चाचणी निगेटिव्ह आली होती.

### इंडिगोचे विमान खांबाला धडकले

**श्रीनगर :** सप्टेंबरनवी मुंबईहून श्रीनगरला जाणारे इंडिगोचे विमान शुक्रवारी श्रीनगर विमानतळावर पार्क केले जात असताना एका खांबाला धडकले. या घटनेत विमानाचे नुकसान झाले असले, तरी प्रवासी किंवा कर्मचारी यांना कोणतीही दुखापत झाली नाही. एअरपोर्ट ऑथॉरिटी ऑफ इंडिया'ने दिलेल्या माहितीनुसार, सकाळी ९:०२ वाजता विमान 'बे क्रमांक ६'वर उभे केले जात असताना, पार्किंगच्या प्रक्रियेदरम्यान ते 'व्हिज्युअल डॉकिंग गाइडन्स सिस्टम'च्या खांबाला धडकले. सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुरक्षित आहेत आणि कोणालाही दुखापत झाल्याचे वृत्त नाही, असे प्राधिकरणाने नमूद केले.

### खांब कोसळून चार कामगारांचा मृत्यू

**मिर्झापूर :** मिर्झापूर जिल्ह्यातील भगवती देई टेकडीवर असलेला एक क्रशर प्लांट शनिवारी दुपारी स्फोटामुळे कोसळला. दरम्यान, पत्ते खेळत असलेले चार कामगार त्यात गाडले गेले. त्यांना जेसीबीच्या साहाय्याने बाहेर काढून रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनुसार, भगवती देई येथे एक क्रशर प्लांट आहे. तिथे दररोज स्फोट होतात.

# खार्ग बेटाजवळ अमेरिकेचे हल्ले

## होर्मुझ जलमार्गात पुन्हा तणाव वाढला; तीन तेलवाहू जहाजे उद्ध्वस्त

**दुबई, ५ सप्टेंबर**

अमेरिकेच्या सैन्याने शनिवारी इराणच्या खार्ग बेटाजवळ जोरदार हल्ले चढवत तीन तेलवाहू जहाजे उद्ध्वस्त केली. या हल्ल्यानंतर होर्मुझ जलमार्गात तणाव वाढला आहे. इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सने (आयआरजीसी) हल्ल्याला जोरदार प्रत्युत्तर देण्याची धमकी दिली.

अमेरिका आणि इराण यांच्यातील सुरू असलेल्या संघर्षात शनिवारी पुन्हा तणाव वाढला. अमेरिकेने इराणमधील एक प्रमुख तेल केंद्र असलेल्या खार्ग बेटाजवळ तेलवाहू जहाजांना लक्ष्य करत क्षेपणास्त्रांचा मारा केला. यात तीन तेलवाहू जहाजांना आग लागली. हा परिसर स्फोटाने हादरला, मात्र इराणने अद्याप हल्ल्याला प्रत्युत्तर दिले नाही. अमेरिकेच्या लष्कराने निवेदनात म्हटले की, सागरी मार्गांमध्ये भूसुरुंग पेरणाऱ्या आणि सागरी वाहतुकीला धोका निर्माण करणाऱ्या इराणी सैन्याला लक्ष्य करण्यासाठी शनिवारी हल्ले करण्यात आले. या कारवाईत इराणी हवाई संरक्षण प्रणाली, रडार केंद्रे, सागरी संसाधने, सुरुंग पेरण्याची क्षमता आणि दळणवळण सुविधांना लक्ष्य करण्यात आले.



**जहाजांची वाहतूक घटली**

होर्मुझची सामुद्रधुनी जागतिक ऊर्जा व्यापारासाठी एक महत्त्वाचा मार्ग आहे. प्रादेशिक तणावामुळे, त्यातून होणारी जहाजांची वाहतूक लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. मोठ्या तेलवाहू जहाजांनी आणि वायूवाहक जहाजांनी हा मार्ग वापरणे जवळजवळ थांबवले आहे. तणाव वाढण्यापूर्वी, जगातील सुमारे एक पंचमांश तेल आणि द्रवीकृत नैसर्गिक वायूची वाहतूक या जलमार्गातून होत असे. (वृत्तसंस्था)

### मध्यपूर्वेत सध्या किरकोळ संघर्ष : ट्रम्प

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले की, मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाला मी युद्ध मानत नाही, हा किरकोळ संघर्ष आहे. इराणवरील अमेरिकेच्या हल्ल्याची तीव्रता आता कमी झाली आहे. त्यांची लष्करी क्षमता कमकुवत झाल्याने धोका टळला आहे. इराणने आगळिक केल्यास त्यांची अणु केंद्र आणि युरेनियमचे साठे आमच्या लक्ष्यावर आहे. कोणत्याही क्षणी ते नष्ट केले जातील.

# आयसीआयसीआय बँकेत एलआयसीची गुंतवणूक

**नवी दिल्ली, ५ सप्टेंबर**

एलआयसीला भारतीय रिझर्व्ह बँकेकडून आयसीआयसीआय बँकेतील आपला हिस्सा वाढवण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. देशातील सर्वात मोठी सार्वजनिक क्षेत्रातील विमा कंपनी आता आपला हिस्सा ९.९९ टक्क्यांपर्यंत वाढवू शकणार आहे. याचा सरळ अर्थ असा की, एलआयसी बँकेतील आपली भागीदारी आणखी वाढवू शकेल.

आरबीआयने एलआयसीला आयसीआयसीआय बँकेच्या एकूण पेड-अप शेअर कॅपिटल किंवा मतदानाच्या अधिकारांपैकी ९.९९ टक्क्यांपर्यंत हिस्सा खरेदी करण्यास मंजुरी दिली आहे. आयसीआयसीआय बँकेने शनिवारी एका नियामक फाइलिंगमध्ये ही घोषणा केली. आयसीआयसीआय बँकेला आरबीआयच्या मंजुरी पत्राची प्रत ४ सप्टेंबला मिळाली. या मंजुरीनुसार, एलआयसीला आरबीआयच्या पत्राच्या तारखेपासून एका वर्षाच्या आत हा हिस्सा खरेदी करणे बंधनकारक आहे. असे करण्यात अयशस्वी झाल्यास केंद्रीय बँकेची मंजुरी रद्द होईल. ही मंजुरी काही अटींच्या अधीन आहे. यात लागू असलेल्या कायदेशीर आणि नियामक आवश्यकतांचे पालन करणे बंधनकारक आहे.

**३५ दिवसांत २१,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त नफा कमावला**

सरकारी मालकीच्या विमा कंपनीने तीन सॉफ्टवेअर निर्यातदारांकडून केवळ ३५ दिवसांत २१,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त मार्क-टू-मार्केट नफा कमावल्यानंतर जवळपास महिनाभरातच हा हिस्सा खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या प्रभावामुळे भारताच्या तंत्रज्ञान उद्योगाच्या भविष्याबद्दल चिंता व्यक्त केली जात असताना, एका वेगळ्या प्रकारच्या गुंतवणुकीतून हा नफा मिळाला आहे. ६ ऑगस्टच्या ईटी अहवालानुसार, जूनच्या अखेरीस टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, इन्फोसिस आणि एचसीएल टेक्नॉलॉजीजमधील एलआयसीच्या हिश्श्याचे बाजारमूल्य १.०५ लाख कोटी रुपये होते. (वृत्तसंस्था)

# 'बालपण' जिवंत ठेवण्याचे आव्हान

## पंतप्रधान मोदींचा शिक्षकांशी संवाद | वाढत्या स्क्रीन टाईमबद्दल व्यक्त केली चिंता

**नवी दिल्ली, ५ सप्टेंबर**

मुलांना मोबाईल स्क्रीनच्या मोहातून बाहेर काढण्यासाठी मैदानी खेळ आणि सर्जनशील उपक्रमांची सवय लावणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमाच्या चौकटीबाहेर पडून मुलांच्या वास्तविक आयुष्यात प्रवेश करावा लागेल. सध्याच्या काळा मुलांमधील बालपण जिवंत ठेवण्याचे मोठे आव्हान असून, शिक्षकांनी हे काम करण्याला प्राधान्य द्यावे. स्क्रीन टाइम हे एक प्रकारचे व्यसन बनत असून, मुलांच्या खेळांमधील आवडीला प्रोत्साहन दिले पाहिजे असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिक्षकांना संबोधित करताना केले.

शिक्षक दिनानिमित्त पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांसोबत आपल्या निवासस्थानी संवाद साधला. या अनौपचारिक आणि दिलखुलास चर्चेदरम्यान त्यांनी शिक्षकांकडून विविध विषयांवर सूचना मागवल्या. तसेच शिक्षण पद्धतीत बदलांसंदर्भातही मार्गदर्शन केले. मुलांच्या वाढत्या स्क्रीन टाइमबद्दलही चिंता व्यक्त करताना ते म्हणाले की, स्क्रीन टाइम हे एक प्रकारचे व्यसन बनत चालले आहे. मुलांच्या खेळांमधील आवडीला प्रोत्साहन दिले पाहिजे. खेळ म्हणजे घराबाहेर खेळणे, व्हिडीओ गेम्स नव्हेत. मुलांना सर्जनशील कामांमध्ये गुंतवल्यास त्यांचे लक्ष स्क्रीनपासून विचलित होऊ शकते. सर्जनशीलतेला चालना देणारे कार्यक्रम सवयीचे बनवण्याची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. शिक्षक दिन हा समाजासाठी शिक्षकांच्या महत्त्वपूर्ण योगदानाचा सन्मान करण्याचा प्रसंग असल्याचे त्यांनी नमूद केले. (वृत्तसंस्था)

### भाषण कौशल्य सुधारण्यावर विचारल्या सूचना

एका शिक्षिकेला आपले सार्वजनिक भाषण कौशल्य सुधारण्याबद्दल सूचना विचारताना पंतप्रधान मोदी म्हणाले, जर मी तुमचा विद्यार्थी असतो आणि मला एक कुशल वक्ता व्हायचे असते, तर तुम्ही काय सुचवले असते ? मी काय केले पाहिजे? यावर शिक्षिका म्हणाल्या, सर्वात आधी तुमच्यात आत्मविश्वास असायला हवा. मोदींनी विचारले, तो कसा येईल? यावर संबंधित शिक्षिका म्हणाल्या, भरपूर सराव करावा लागेल. यावर मोदी म्हणाले, वक्ता होण्यासाठी व्यक्तिमत्वाची (औरा) आवश्यकता नाही? यावर संबंधित शिक्षिका पुन्हा म्हणाल्या असायलहा हवे. यावर, मग लोक माझे ऐकणार नाहीत, फक्त माझा औराच बघतील, असा विनोद करत त्यांनी उपस्थितांमध्ये हशा पिकवला.

### मादक पदार्थांच्या धोक्यावर आवाहन

मोदी यांनी शिक्षकांना संबोधित करताना म्हणाले, विद्यार्थ्यांना मादक पदार्थांच्या व्यसनाचे धोके आणि त्याचे दुष्परिणाम याबद्दल शिक्षकांनी शाळेत जनजागृती करायला हवी. मोठ्या शहरांमध्ये आणि विद्यापीठांमध्ये, एखादे मूल व्यसनी कसे झाले हे ठरवणे कठीण आहे. अशा परिस्थितीत, शिक्षकांनी जनजागृती करण्यासाठी पुढाकार घ्यावा. मुलांच्या वर्तनातील अगदी लहान बदलांवरही बारकाईने लक्ष ठेवावे, जेणेकरून कोणत्याही समस्या लवकर ओळखता येतील.

# राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शिक्षकांचा सत्कार


डॉ. अमर मोहनराव ताकसांडे (वर्धा)


डॉ. कविता गिट्टे (बीड)


कुंदा बच्छाव (नाशिक)


वैभव कुलकर्णी (लातूर)


शिवप्रसाद टिंगरे (सातारा)


डॉ. संदीपान नरोटे (सोलापूर)


डॉ. विक्रम विशाल (मुंबई)


किरण प्रकाश झारकर (धाराशिव)


अर्चना राकेश जाधव (नाशिक)

# मलब्यातून महिला ११ दिवसांनी बाहेर

**काठमांडू, ५ सप्टेंबर**

नेपाळमध्ये अचानक आलेल्या पुरामुळे ३२,००० हून अधिक लोक बेघर झाले असून, शनिवारपर्यंत १,३४४ लोकांचा मृत्यू झाला. बाधित भागातून मृतदेह सापडणे सुरू असताना नुवाकोट जिल्ह्यातील बेत्रावती परिसरात पूर आणि भूस्खलनाच्या तब्बल ११ दिवसांनंतर एका महिलेला घराच्या मलब्यातून जिवंत बाहेर काढण्यात आले. बिदूर परिसरात राहणाऱ्या या महिलेचे नाव चंदिका श्रेष्ठ असे आहे. त्यांचे वय ५६ वर्षे आहे. याशिवाय एका चिनी नागरिकाला मलब्यातून जिवंत बाहेर काढण्यात आले. भूस्खलनामुळे चंदिका या घराच्या मलब्यात अडकल्या होत्या. शनिवारी बचाव पथकाने त्यांना सुरक्षितपणे बाहेर काढले.

भूस्खलनामुळे अर्धवट दबलेल्या घरातून मानवी आवाज ऐकू येत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिस आणि बचाव पथक घटनास्थळी पोहोचले. बचाव पथकाने मलबा हटवण्यासाठी खोदकाम सुरू केले. अत्यंत काळजीपूर्वक मलबा हटवल्यानंतर चंदिका श्रेष्ठ जिवंत असल्याचे आढळले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी जवळच्या आरोग्य केंद्रात नेण्यात आले अशी माहिती नुवाकोटचे पोलिस अधिकारी बिपिन रेग्मी यांनी दिली. दुसरीकडे नेपाळच्या अप्पर त्रिशुली-१ जलविद्युत प्रकल्पाच्या बाधित भागातून एका चिनी नागरिकालाही जिवंत वाचवण्यात आले. या घटनेमुळे, बाधित भागांमध्ये अडकलेल्या आपल्या प्रियजनांच्या कुटुंबीयांमध्ये आणि व्यक्तींमध्ये आशेचा किरण निर्माण झाला आहे.

**चीनकडून लपवाछपवी**

नेपाळ-तिबेट सीमेवरील पुरानंतर तिबेटमध्ये बेपत्ता झालेल्यांची कुटुंबीय आपल्या प्रियजनांची माहिती मिळवण्यासाठी आतूर झाले असताना चीनकडून पुरेशी माहिती दिली जात नाही. बेपत्ता झालेल्यांचे नातेवाईक चिनी अधिकाऱ्यांना माहिती देण्याची विनंती करत आहेत. (वृत्तसंस्था)

# सिंधूच्या मुख्य प्रवाहावर धरण

**लेह, ५ सप्टेंबर**

लडाखमधील सीमावर्ती भागातील शेतकऱ्यांची पाणीटंचाई दूर करण्यासाठी आणि सिंधू नदीच्या पाण्यावर भारताचा अधिकार अधिक सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारने एक ऐतिहासिक पाऊल उचलत लेह जिल्ह्यातील उपशी येथे सिंधू नदीच्या मुख्य प्रवाहावर देशातील पहिल्या 'रॉक चेक डॅम'ची उभारणी केली आहे. या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून, पाकिस्तानात जाणारे पाणी रोखून याचा वापर स्थानिक नागरिकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी केला जाणार आहे. हा बंधारा पूर्णपणे नैसर्गिक शिळा आणि अजस्त्र दगडांचा वापर करून पर्यावरणपूरक पद्धतीने बांधण्यात आला असून यात सिमेंटचा अजिबात वापर करण्यात आलेला नाही. या बंधाऱ्यामुळे नदीच्या पाण्याची पातळी सुमारे १० फुटांनी वाढली आहे. यामुळे जवळजवळ ४ कोटी लिटर पाण्याचा राखीव साठा तयार झाला आहे. (वृत्तसंस्था)

# पिलीव येथील बँक ऑफ इंडियाच्या १३६ शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ

## अकरा जणांची ईकेवायसी पेंडींग

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि. ५ सप्टेंबर -**

महाराष्ट्र शासनाच्या कर्जमाफी योजनेत पिलीव येथील बॅंक ऑफ इंडियाच्या १३६ शेतकऱ्यांची पहिल्या यादीत कर्जमाफी झाली आहे. अकरा जणांची ईकेवायसी पेंडींग आहे.

पिलीव, झिंजेवस्ती, कुसमोड, काळमवाडी, बचेरी, शिंगोर्णी या गावातील हे शेतकरी आहेत. यामध्ये १३६ शेतकऱ्यांपैकी ११ शेतकऱ्यांनी अद्यापपर्यंत ईकेवायसी केली नाही. तर १२५ शेतकऱ्यांनी ई केवायसी पुर्ण केली असून त्यांच्या खात्यावर शासनाने पैसे जमा केले आहेत. मात्र पिलीव येथील बॅंक ऑफ इंडियाच्या या १२५ शेतकऱ्यांना पुन्हा नव्याने पिक कर्ज देण्यात येणार आहे. मात्र व्याज दराबाबत अडचणीमुळे अद्यापपर्यंत ते शेतकरी कर्ज मिळण्यापासून वंचित आहेत. पण कर्ज माफ झालेल्या सर्व शेतकऱ्यांना लवकरच पुन्हा कर्ज देण्यात येणार आहे.

याबाबत बॅंक ऑफ इंडियाचे कृषी विभागाचे पाटील यांनी व्याजदराबाबत थोडासा संभ्रम निर्माण झाला आहे. पण तो लवकरच मिटेल तोपर्यंत शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे बॅंकेत दयावीत असे आवाहन केले आहे. शासनाने कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांना तिसऱ्या दिवशीच नव्यानेच कर्ज देण्याचे जाहीर केले आहे, पण तांत्रिक अडचणीमुळे अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना मिळालेच नाही. शासनाने कर्जमाफ झालेल्या शेतकऱ्यांना लगेच कर्ज देण्याची घोषणा केली आहे. पण अजुन पहिल्या यादीतील शेतकऱ्यांना महीना उलटुन गेला तर पिक कर्ज मिळाले नाही.

**पुन्हा कर्ज देण्याचे कृषिमंत्र्यांचे आश्वासन**

पिलीव येथील बँक ऑफ इंडियाच्या कर्जमाफ झालेल्या शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत कर्ज मिळत नाही याबाबत कुसमोडचे माजी उपसरपंच संजय पाटील कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे याबाबत कैफियत मांडली आहे. त्यांनी पिलीव येथील कर्ज माफ झालेल्या शेतकऱ्यांना पुन्हा नव्याने ताबडतोब पिक कर्ज देण्यात येईल असे सांगितले आहे.

# ४५७ वर्षांनंतर जगाचा नकाशा बदलला

## १६४ देशांचे ठरावाच्या बाजूने मतदान; आफ्रिका सर्वात मोठा खंड

**न्यू यॉर्क, ५ सप्टेंबर**

जगाच्या नकाशावर खंडांचा आकार अधिक अचूकपणे दर्शविण्याच्या उद्देशाने संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत मांडलेल्या ठरावाला भारताने पाठिंबा दिला, तर अमेरिकेने याला जोरदार विरोध केला. १९३ सदस्य राष्ट्रांच्या आमसभेने शुक्रवारी 'नकाशा दुरुस्त करा' हा ठराव प्रचंड बहुमताने मंजूर केला. १६४ देशांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले, तर सहा देश तटस्थ राहिले. टोगोने मांडलेल्या या ठरावाच्या बाजूने १६४ मते पडली. एस्टोनिया, जॉर्जिया, लिथुआनिया, मोल्दोव्हा, सर्बिया आणि युक्रेन तटस्थ राहिले, तर अमेरिकेने एकट्याने विरोधात मतदान केले. यामुळे ४५७ वर्षानंतर जगाच्या नकाशात बदलण्याचा मार्ग मोकळा झाला.



संयुक्त राष्ट्र संघात नवीन नकाशा स्वीकारण्यावर चर्चा सुरू असताना दोन्ही नकाशातील फरक समजावून सांगण्यात आला

नव्या नकाशात आफ्रिका सर्वात मोठा खंड तर उत्तर अमेरिका, युरोपचा आकार लहान झाला आहे. यामुळे जगाकडे पाहण्याच्या आणि समजून घेण्याच्या पद्धतीत मोठा बदल होणार आहे. संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत शुक्रवारी नवीन जागतिक नकाशा स्वीकारण्यासाठी मतदान पार पडले. या नकाशात, आफ्रिका पूर्वीपेक्षा मोठा दिसेल, तर उत्तर अमेरिका आणि युरोप लहान दिसतील. नवीन नकाशाला 'इक्वल अर्थ कार्टोग्राफिक प्रोजेक्शन' असे नाव देण्यात आले. संयुक्त राष्ट्रांच्या मते, जगातील खंडांचे भूभाग अधिक अचूकपणे दर्शवणे हा त्याचा उद्देश आहे. भारतासह १६४ देशांनी या प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले, तर एकट्या अमेरिकेने विरोधात मतदान केले. जगभरात मोठ्या प्रमाणावर वापरला जाणारा नकाशा १५६९ मध्ये फ्लेमिश नकाशाकार गेरार्डस मर्केटर यांनी विकसित केला होता. तो प्रामुख्याने सागरी नौकानयनासाठी तयार करण्यात आला होता. या नकाशातील मुख्य समस्या ही आहे की, पृथ्वीच्या ध्रुवांजवळील प्रदेश त्यांच्या वास्तविक आकारापेक्षा खूप मोठे दिसतात, तर विषुववृत्ताजवळील प्रदेश तुलनेने लहान दिसतात. नवीन 'इक्वल अर्थ'चा उद्देश खंडांचा आकार अधिक अचूकपणे दर्शवणे हा असल्याचे संयुक्त राष्ट्राने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### ठराव कायदेशीररीत्या बंधनकारक नाही

हा ठराव कायदेशीररीत्या बंधनकारक नसला तरी, शिक्षण, संस्था आणि इतर ठिकाणी अधिक अचूक जगाचा नकाशा वापरण्यासाठी सदस्य देशांना प्रोत्साहित करणे हा त्याचा उद्देश आहे. नवीन ठराव सदस्य देशांना पारंपरिक नकाशाऐवजी 'इक्वल अर्थ प्रोजेक्शन' (समान पृथ्वी प्रक्षेपण) स्वीकारण्याचे आवाहन करतो, ज्यामुळे जगाच्या भूभागाचे अधिक अचूक निरीक्षण करता येईल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पहलगामचा सूड पूर्णत्वास

**शेवटच्या दहशतवाद्यालाही धाडले यमसदनी**

**श्रीनगर, ५ सप्टेंबर**

पहलगाममधील बैसरण खोऱ्यात झालेल्या दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेला कुख्यात दहशतवादी यासीरला बडगाम येथील चकमकीत सुरक्षा दलांनी ठार मारले आहे. हल्ल्यानंतर यासिर बेपत्ता झाला होता. 'ऑपरेशन अर्शद'मध्ये यासिरला यमसदनी धाडण्यात आले. तो पाकिस्तानचा रहिवासी होता.

पहलगाम हल्ल्यानंतर सुरक्षा दलांनी ज्या चार संशयित दहशतवाद्यांची छायाचित्रे प्रकाशित केले होते त्यात यासिरचाही समावेश होता. तो ठार झाल्याने बडगाम जिल्ह्यातील दहशतवादी कारवायांवर आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात असून तो ठार होणे मोठे यश मानले जात आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी लोकांचा धर्म विचारून त्यांची हत्या केली होती. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी चार दहशतवाद्यांचे एक संयुक्त छायाचित्र प्रसिद्ध केले होते. यात यासिरसह सुलेमान शाह, जुनैद रमजान आणि हाशिम मुसाचा समावेश होता. (वृत्तसंस्था)



पहलगाम हल्ल्यात सहभागी असलेल्या चार दहशतवाद्यांचे छायाचित्र लष्कराने प्रसिद्ध केले होते. या चारही जणांचा आता खात्मा झाला आहे

### चारही दहशतवाद्यांचा खात्मा

सुरक्षा दलांनी गतवर्षी जुलैमध्ये 'ऑपरेशन महादेव'मध्ये हाशिम मुसाला ठार केले होते. पहलगाम दहशतवादी घटनेनंतर सुरक्षा दलांनी आता सर्व चार दहशतवाद्यांना ठार केले आहे. हाशिम मुसा हा लष्कर-ए-तोयबाचा एक प्रमुख कमांडर होता. २२ एप्रिल २०२५ रोजी जम्मू आणि काश्मीरमधील पहलगामजवळच्या बैसरन खोऱ्यातील हल्ल्यात २६ नागरिकांचा मृत्यू झाला होता.

### सुलेमान मुसा गटाशी संबंध

सुरक्षा सूत्रांनुसार, ठार झालेला पाकिस्तानी कमांडर यासिर हा पूर्वी लष्कर-ए-तोयबाच्या मोठ्या 'सुलेमान मुसा गटा'चा भाग होता. तो सुमारे एक वर्षापूर्वी या गटापासून वेगळा झाला होता. या परिसरात लष्कर-ए-तोयबाचा एक प्रमुख स्वतंत्र कमांडर म्हणून सक्रिय होता. यासीन ठार झाल्यानंतर, सुरक्षा यंत्रणा आता त्याचे स्थानिक नेटवर्क, त्याचे साथीदार आणि अलीकडील दहशतवादी कारवायांमध्ये त्याच्या सहभागाची सखोल चौकशी करत आहेत.

## लष्करी तळावर स्फोट; १५ ठार, ६० जखमी

**सुक्रे, ५ सप्टेंबर**

दक्षिण अमेरिकेतील बोलिव्हिया देशातील एका लष्करी तळावर शक्तिशाली स्फोटामुळे प्रचंड विध्वंस झाला. स्थानिक आरोग्य संचालक रीटा नेब्रास्का यांनी सांगितले की, या घटनेत आतापर्यंत किमान १५ जण ठार आणि ६० हून अधिक जण जखमी झाले आहेत. स्फोटात परिसरातील घरांचे प्रचंड नुकसान झाले.

बोलिव्हियाची राजधानी ला पाझपासून सुमारे ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या वियाचा येथील लष्करी तळावर हा स्फोट झाला. अधिकाऱ्यांच्या हा स्फोट फटाके आणि आतषबाजीचे साहित्य ठेवलेल्या विभागात झाला. स्फोट कशामुळे झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. अधिकाऱ्यांनी सांगितले की, संरक्षण मंत्रालयाच्या साठवणुकीच्या ठिकाणी ठेवलेला दारूगोळा या संकुलात ठेवला होता. बोलिव्हियाचे संरक्षण मंत्री अर्नेस्टो जस्टिनियानो यांनी सांगितले की, जखमींपैकी बहुतांश ५२ जण सामान्य नागरिक आहेत, तर उर्वरित लष्करी कर्मचारी आहेत. घटनेनंतर बचाव पथक जखमींवर उपचार करण्यासोबतच त्यांच्या कुटुंबीयांना मदत करण्यात गुंतले. जखमींपैकी १४ जणांना उपचारासाठी ला पाज येथील रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. स्फोटामुळे आजूबाजूच्या अनेक घरांचेही नुकसान झाले. (वृत्तसंस्था)

# बिहारमध्ये पुराचा हाहाकार

## ६.६५ लाख लोकांना फटका; अनेक जिल्ह्यांतील सखल भागांमध्ये पाणी

**पाटणा, ५ सप्टेंबर**

बिहारमधील गंगा, पुनपुन, दरधा आणि गंडक यांसारख्या प्रमुख नद्यांच्या वाढत्या पाणी पातळीमुळे बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. पाटणा, भोजपूर, बक्सर, बेगुसराय, खगडिया, मुंगेर आणि भागलपूरमध्ये अनेक ठिकाणी गंगा नदी धोक्याच्या पातळीच्या वर वाहत आहे. पुराचे पाणी १८ जिल्ह्यांमध्ये पसरले असून, ६.६५ लाखांहून अधिक लोकांना त्याचा फटका बसला आहे.

दियारा भागातून मोठ्या संख्येने लोक सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करत आहेत. पुराची परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. गंगा, गंडक, पुनपुन, दरधा आणि कोसी यांसारख्या अनेक नद्यांच्या वाढत्या पाणी पातळीमुळे सखल भागांमध्ये पाणी पसरले आहे. अनेक ठिकाणी रस्ते आणि गावे पाण्याखाली गेली आहेत. प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाला सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. शनिवारी सकाळी ९ वाजता गांधीघाट गेजवर गंगेची पाणी पातळी ५०.५१ मीटर नोंदवली गेली, जी धोक्याच्या पातळीपेक्षा १.९१ मीटरने जास्त आहे. गांधीघाट येथे पाण्याची नवीन उच्च पातळी गाठण्याची शक्यता असून विशेषतः दियारा आणि नदीच्या प्रवाहाच्या भागात दाब वाढू शकतो. तसेच श्रीपालपूर येथेही नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. पाटण्यातील दिघा घाटावर गंगा भुयारी मार्गाच्या खाली पोहोचली आहे. गायघाट-दिदारगंज रस्ता पाण्याखाली गेला आहे. याशिवाय, बिंद टोली, एलसीटी घाट, गांधी घाट, महावीर घाट आणि पाटणा शहरात अनेक ठिकाणी गंगेचे पाणी शिरल्याने लोकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. (वृत्तसंस्था)



पुरामुळे बिहारमधील अनेक जिल्ह्यांमध्ये शहरे, गावे जलमय झाली आहेत

### पाटण्यातील संरक्षक भिंतीचे १०८ मार्ग बंद

गंगेचे पाणी शहराच्या सखल भागांपर्यंत पोहोचू नये म्हणून, पाटण्यातील संरक्षक भिंतीमध्ये बांधलेले सर्व १०८ मार्ग बंद करण्यात आले आहेत. दरम्यान, आढळलेली कोणतीही गळती थांबवण्यासाठी कारवाई करण्यात आली आहे. गंगेचे पाणी शहरात शिरू नये म्हणून कुर्जी भागातील नालेही बंद करण्यात आले आहेत. सखल भागात राहणाऱ्या लोकांना गरजेनुसार सुरक्षित ठिकाणी हलवले जात आहे. तसेच पाटणामध्ये पूरग्रस्तांसाठी चार ठिकाणी मदत शिबिरे चालवली जात आहेत.

## अभिषेक बॅनर्जींचे कार्यालय सील

**कोलकाता, ५ सप्टेंबर**

पश्चिम बंगाल अग्निशमन विभागाने शुक्रवारी मध्य कोलकातामधील एका उंच इमारतीचे तळघर, सहावा आणि सातवा मजला रिकामा करण्याचे आदेश दिले. तिथे तृणमूल नेते अभिषेक बॅनर्जी यांचे कार्यालय आहे. इमारतीचे अग्निसुरक्षा प्रमाणपत्र १० ऑगस्टला कालबाह्य झाले होते. तपासणीत अग्निशमन प्रणाली, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग आणि फायर अलार्ममध्ये त्रुटी आढळल्यानंतर ही कारवाई केली. कॅमॅक स्ट्रीटवरील कार्यालयात झालेल्या तोडफोडीच्या दुसऱ्या दिवशी आदेश देण्यात आला आहे. आठवडाभरापूर्वी अधिकाऱ्यांनी याच इमारतीवरून एक बेकायदेशीर होर्डिंग हटवले होते. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### फोटोग्राफर्सवर संतापला सलमान खान


**मुंबई :** सलमान खान बिग बॉस २० च्या सेटवर आलेल्या पापाराझींवर संतापला. सलमानने भरचौकात फोटोग्राफर्सना फटकारले. त्याचा एक व्हिडीओ समोर आला आहे. सलमान टी-शर्ट, जीन्स आणि काऊबॉय हॅट घालून बिग बॉस २० च्या मंचावर चित्रीकरणासाठी पोहोचले होते. यावेळी सलमान पोज देत असतानाच एका फोटोग्राफरने बाबा, बाबा, असे ओरडत त्यांना पोज देण्याची मागणी केली. हे ऐकून सलमान संतापले आणि रागाने म्हणाले, बाबा... हे तुझे काम नाही. मला कॅमेऱ्यासमोर येण्याची काही गरज नाही. या घटनेनंतर काही वेळाने पुन्हा पापाराझी वारंवार फोटो घेण्यासाठी समोर आले. यामुळे सलमानला राग आला. टेलिव्हिजन बिग बॉस २० हा रिॲलिटी कार्यक्रम ६ सप्टेंबरपासून सुरू होत आहे. बिग बॉस हाऊसचा फर्स्ट लुकही समोर आला आहे.



### सूरज चव्हाणच्या घरी चिमुकलीचे आगमन

**मुंबई :** 'बिग बॉस मराठी ५''चा विजेता सूरज चव्हाणच्या घरी चिमुकलीचे आगमन झाले असून तो बाबा झाला आहे. जन्माष्टमीच्या दिवशी सूरज चव्हाणच्या घरात गोडगोडुली राधा आली. चाहत्यांकडूनही सूरज चव्हाणवर अभिनंदनाचा वर्षाव केला जातोय. डिसेंबर २०२५ मध्ये सूरज चव्हाणचे लग्न संजना हिच्याशी झाले. काही दिवसांपूर्वी सूरज चव्हाण बाबा होणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. काही महिन्यांआधी अभिनेत्री जान्हवी किल्लेकरनेसंजनाच्या चोर ओटीचा व्हिडीओ शेअर केला होता. त्यामुळेच सूरज - संजना आई-बाबा होणार ही बातमी समोर आली. लग्नाच्या नऊ महिन्यांनी सूरज आणि संजना यांच्या आयुष्यात आनंदाचा क्षण आला असून दोघेही आई-बाबा झाले आहेत. बाबा झाल्यानंतर सूरज चव्हाणचा आनंद गगनात मावेनासा झाला. लेकीच्या जन्मानंतरचा सूरज चव्हाणचा रुग्णालयातला पहिला व्हिडीओ समोर आला आहे.

### पंकज त्रिपाठी करत होते हॉटेलमध्ये काम



**मुंबई :** बिहारमधील गोपालगंज जिल्ह्यातील बेलसंड गावातून नॅशनल स्कूल ऑफ ड्रामापर्यंत पोहोचलेल्या पंकज त्रिपाठी यांनी चित्रपटांमध्ये छोट्या-छोट्या भूमिकांपासून सुरुवात केली आणि सध्या ते हिंदी सिनेमातील सर्वात लोकप्रिय अभिनेत्यांपैकी ते एक आहेत. पंकज यांनी अभिनेते मनोज वाजपेयी यांच्या चपला स्वतःजवळ ठेवल्या होत्या. चित्रपटांमध्ये ओळख निर्माण करण्यापूर्वी पंकज त्रिपाठी पाटणा येथील हॉटेल मौर्यच्या स्वयंपाकघरात सुपरवायझर म्हणून काम करत होते. ते हॉटेलमध्ये काम करण्यासोबतच नाटकातही काम करत होते. ते मनोज वाजपेयींचे खूप मोठे चाहते होते. जेव्हा त्यांना कळले की मनोज वाजपेयी हॉटेलमध्ये थांबले आहेत, तेव्हा त्यांनी हॉटेलच्या कर्मचाऱ्यांना सांगितले होते की मनोज वाजपेयींच्या रूममधून कोणतीही ऑर्डर आल्यास त्यांना थेट कळवावे, असे पंकज यांनी कपिल शर्माच्या कार्यक्रमामध्ये सांगितले होते.

# बेकायदेशीरपणे बांधलेली मशीद पाडली

## जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई

**सहारनपूर, ५ सप्टेंबर**

सहारनपूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात सरकारी जमिनीवर बेकायदेशीरपणे बांधलेली मशीद शनिवारी सकाळी चोख पोलिस बंदोबस्तात पाडण्यात आली. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाला छावणीचे स्वरुप आले होते. कारवाईदरम्यान, सर्व पाचही प्रवेशद्वारे बंद करण्यात आली होती आणि वकिलांसह सामान्य नागरिकांना आत प्रवेश दिला जात नव्हता.

कारवाईदरम्यान, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रांतीय सशस्त्र दल (पीएसी) आणि रॅपिड ॲक्शन फोर्स (आरएएफ)च्या पाच कंपन्या घटनास्थळी तैनात करण्यात आल्या होत्या. याव्यतिरिक्त, कोणताही अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिस संवेदनशील भागांवर पाळत ठेवून असून पायी गस्त व संचलन करत आहेत. दरम्यान, पोलिस उपमहानिरीक्षकांनी लोकांना शांतता राखण्याचे आणि अफवांकडे दुर्लक्ष करण्याचे आवाहन केले.



**जिल्हा न्यायालयाने फेटाळले मशीद समितीचे अपील**

२०२५ मध्ये बजरंग दलाचे प्रादेशिक संयोजक विकास त्यागी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात असलेली ही वास्तू बेकायदेशीर असल्याचा आरोप करत शहर दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात याचिका दाखल केली होती. १६ जुलै २०२६ रोजी सहारनपूर शहर दंडाधिकाऱ्यांनी ही वास्तू बेकायदेशीर घोषित करून ती पाडण्याचा आदेश जारी केला. त्यानंतर, मशीद समितीने जिल्हा न्यायालयात अपील केले. मात्र, न्यायालयाने २ सप्टेंबरला ते अपील फेटाळल्यामुळे पाडकामाचा मार्ग मोकळा झाला. (वृत्तसंस्था)

# जग ओलांडणार तापमानवाढीची मर्यादा

## संयुक्त राष्ट्रांच्या अहवालाने दिला इशारा



**न्यू यॉर्क, ५ सप्टेंबर**

जागतिक हवामान बदलांविरुद्धच्या लढ्यात एक महत्त्वपूर्ण वळण म्हणून, जग आता पुढील काही वर्षांतच २०१५ च्या पॅरिस हवामान करारांतर्गत निश्चित केलेली १.५ अंश सेल्सिअस तापमान वाढीची मर्यादा ओलांडण्याची शक्यता आहे, असे संयुक्त राष्ट्रे संघाने म्हटले आहे.

'संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमा'ने आता तापमान त्या मर्यादेच्या वर किती प्रमाणात वाढते यावर नियंत्रण ठेवणे आणि त्यानंतर ते पुन्हा खाली आणणे या गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, हे एका अहवालात नमूद केले. त्या मार्गाचा अवलंब केला गेला, तरीही जगाला अनेक दशके हवामान बदलामुळे होणाऱ्या अधिक गंभीर नुकसानाचा सामना करावा लागेल. यामध्ये अत्यंत तीव्र हवामान, वाढती समुद्रपातळी, प्रजातींचा ऱ्हास आणि बर्फ व हिमनद्यांचे वितळणे यांचा समावेश आहे. पॅरिस करारांनंतर, संयुक्त राष्ट्रांनी आपल्या हवामान-विज्ञानविषयक संस्थेला धोक्याच्या विविध मर्यादांची तपासणी करण्यास सांगितले.

शास्त्रज्ञांना १.५ अंश सेल्सिअसच्या तुलनेत दोन अंश सेल्सिअस तापमानात लोक आणि पृथ्वी यांच्यावर होणारे परिणाम अत्यंत गंभीर असतील, असे आढळून आले. काही शास्त्रज्ञांच्या मते, केवळ एका वर्षाऐवजी २० वर्षांच्या सरासरीचा विचार करता, जगाचे तापमान औद्योगिक क्रांतिपूर्व पातळीच्या तुलनेत आधीच १.४ अंश सेल्सिअसने वाढले आहे. सर्वांत आशावादी परिस्थितीत, जर देशांनी हवामानविषयक महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे साध्य केली, तर या शतकाच्या मध्यापर्यंत जागतिक तापमानवाढ १.८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचून स्थिरावेल. मात्र, सध्याच्या सरकारी धोरणांनुसार, २१०० सालापर्यंत तापमान औद्योगिक क्रांतीपूर्व पातळीच्या तुलनेत २.६ अंश सेल्सिअसने वाढण्याचा अंदाज आहे. (वृत्तसंस्था)

### अधिक उष्ण जगातच जगावे लागणार

हे अगदी स्पष्ट असायला हवे की, १.५ अंशांचे उद्दिष्ट हेच आपले ध्येय आहे. परंतु, आता आपल्याला त्या दिशेने वेगळ्या पद्धतीने म्हणजेच वरच्या पातळीवरून प्रयत्न करावे लागतील, असे यूएनईपीच्या कार्यकारी संचालक इंगर अँडरसन यांनी सांगितले. यासाठी जीवाश्म इंधनाचा वापर थांबवणे आणि हवेतून कार्बन डायऑक्साइड काढून टाकण्याचे मार्ग विकसित करणे आवश्यक ठरेल. आपल्याला आता या अधिक उष्ण झालेल्या जगातच जगावे लागणार आहे, असे या अहवालाचे सह-लेखक आणि एक्सेटर विद्यापीठातील हवामानशास्त्रज्ञ रिचर्ड बेट्स यांनी म्हटले.

# अमेरिकेने क्युबावर लादले नवीन निर्बंध

**हवाना, ५ सप्टेंबर**

क्युबाची अर्थव्यवस्था खिळखिळी करण्यासाठी आणि तिथली विविध संकटे अधिक गडद करण्यासाठी अमेरिकेच्या सरकारने गुरुवारी क्युबावर नवीन निर्बंध लादले. या निर्बंधांच्या कक्षेत आलेल्यांमध्ये माजी राष्ट्राध्यक्ष राउल कॅस्ट्रो यांचे नातू फिडेल अर्नेस्टो कॅस्ट्रो आणि क्युबाची 'ऑइल इंडस्ट्री सप्लाय इम्पोर्ट कंपनी' यांचा समावेश आहे. क्युबाची मोडकळीस आलेली वीज यंत्रणा टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेली विशेष उपकरणे आणि सुटे भाग आयात करण्याची जबाबदारी या कंपनीवर आहे.

या निर्बंधांचा उद्देश क्युबाची महत्त्वाची यंत्रणा बंद पाडणे आणि तिथले ऊर्जा संकट अधिक तीव्र करणे हा आहे, असे 'ऑब्सीडियन रिस्क ॲडव्हायझर्स' या सल्लागार संस्थेतील तज्ज्ञ ब्रेट एरिक्सन यांनी सांगितले. अमेरिका शक्य तितका फास आवळण्याचा प्रयत्न करत आहे, असे ते म्हणाले.

ट्रम्प प्रशासनाला क्युबातील सत्तापालटाव्यतिरिक्त इतर कोणताही बदल स्वीकारण्यात स्वारस्य असल्याचे दिसत नाही. अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ हे प्रकरण सहजपणे सोडून देणार नाहीत, असे त्यांनी नमूद केले. (वृत्तसंस्था)

## कार तलावात कोसळून चौघांचा मृत्यू

**धोलपूरम, ५ सप्टेंबर**

राजस्थानच्या धोलपूरमधील फुलपूर गावाजवळ एक भीषण अपघात घडला. पाण्याने भरलेला रस्ता ओलांडताना चालकाचे इको कारवरील नियंत्रण सुटले आणि ती तलावात कोसळली. यात कारमधील ४ जणांचा मृत्यू झाला. तर सात प्रवासी जखमी झाले आहेत. अपघातानंतर एकच गोंधळ उडाला. गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत अथक परिश्रमाने लहान मुले आणि महिलांना वाचवले. अपघातानंतर गावकऱ्यांनी जखमींना मनियन येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले. तिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. गावकऱ्यांनी पोलिसांना या घटनेची माहिती दिली. स्थानिक पोलिस अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. (वृत्तसंस्था)

# पाच पैकी एक मूल ऑनलाईन लैंगिक शोषणाचा बळी



**युनिसेफचा अहवाल**

**जिनेव्हा, ५ सप्टेंबर**

'युनिसेफ'च्या एका अहवालाने मुलांच्या ऑनलाईन सुरक्षेबद्दल प्रश्न उपस्थित केले आहेत. २१ देशांमधील पाच मुलांपैकी एक मूल ऑनलाइन शोषणाचा बळी ठरत असल्याचे आढळून आले. समाज माध्यम आणि गेमिंगसोबतच, एआयचा गैरवापर ही देखील एक नवीन चिंतेची बाब ठरली आहे.

जागतिक स्तरावर, दरवर्षी दोन कोटी मुले ऑनलाईन लैंगिक शोषणाची बळी ठरतात. दरम्यान, २१ देशांमध्ये, इंटरनेट वापरणाऱ्या पाच मुलांपैकी एकाला ऑनलाईन शोषणाला सामोरे जावे लागते.

युनिसेफच्या अलीकडील अभ्यासानुसार, आफ्रिका, आशिया, लॅटिन अमेरिका आणि पूर्व युरोपमधील १२ ते १७ वयोगटातील मुलांना ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या लैंगिक शोषणाला सामोरे जाण्याची सर्वाधिक शक्यता आहे. ही आकडेवारी केनिया, पाकिस्तान, ब्राझील आणि सर्बियासारख्या देशांसह २१ देशांमधील सुमारे २१ हजार मुलांमध्ये २०२० ते २०२५ दरम्यान केलेल्या सर्वेक्षणांवर आधारित आहे. समाज माध्यम आणि गेमिंग ही धोक्याची प्रमुख केंद्रे आहेत. अहवालानुसार, सुमारे ६० टक्के प्रकरणे फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम, स्नॅपचॅट आणि टिकटॉक यांसारख्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर घडली. याशिवाय, १४ टक्के प्रकरणे ऑनलाईन गेमिंग दरम्यान घडली.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे, निम्म्याहून अधिक प्रकरणांमध्ये, पीडित मूल पीडित व्यक्तीला आधीपासूनच ओळखत होते, ज्यात मित्र, नातेवाईक किंवा प्रियकर किंवा प्रेयसी यांचा समावेश होता. (वृत्तसंस्था)

### गैरवापराबाबत देतो तीव्र इशारा

हा अहवाल कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या गैरवापराबाबतही तीव्र इशारा देतो. अहवालानुसार, नऊ देशांमधील अंदाजे ११ लाख मुलांनी त्यांच्या संमतीशिवाय एआय-निर्मित अश्लील प्रतिमा किंवा व्हिडीओ पाहिल्याचे सांगितले आहे. याव्यतिरिक्त, अंदाजे १.५ कोटी मुले अवांछित लैंगिक सामग्रीच्या संपर्कात आली आणि ४० लाख मुलांच्या प्रतिमा त्यांच्या संमतीशिवाय शेअर केल्या गेल्या.

# भामट्यांमुळे खरे अधिकारी बेजार

## मध्यप्रदेशात तोतया आयएएस-आयपीएस नेटवर्कचा भंडाफोड

**भोपाळ, ५ सप्टेंबर**

मध्यप्रदेशात एकापाठोपाठ एक भामटे अधिकारी पकडले जात आहेत. या तोतया आयएएस-आयपीएस अधिकाऱ्यांमुळे खऱ्या अधिकाऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. हे लोक उच्चपदस्थ अधिकारी असल्याचे भासवून लोकांशी संपर्क साधतात आणि फसवणूक करतात. गत महिन्यात मध्य प्रदेशात अशी पाच प्रकरणे समोर आली आहेत. ज्यात या भामट्यांनी खरे अधिकारी असल्याचे भासवून सरकारी पदाचा गैरवापर करत लोकांची लाखो रुपयांचा गंडा घातला आहे.

पोलिसांनुसार, लेडी नटवरलाल तृप्ती सिंग राजपूत आणि तिचा भाऊ सुधांशूने सरकारी नोकऱ्या आणि निविदांचे आमिष दाखवून अनेक लोकांची लाखो रुपयांची फसवणूक केली. या भावंडांविरुद्ध आतापर्यंत चार गुन्हे दाखल झाले आहेत. त्यापैकी दोन चंदेरी, अशोक नगर येथे आणि दोन बागसेवानिया, भोपाळ येथे नोंदवण्यात आले आहे.

लोकांना आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी हे भामट्यांनी सरकारी अधिकाऱ्यांसारखीच जीवनशैली जपली होती. जेणेकरून कोणालाही त्यांच्यावर संशय येऊ नये. पोलिसांनी 'भारत सरकार' अशी पाटी असलेली एक इनोव्हा कार, बनावट सीबीआय कार्ड, लेटरहेड आणि महागडा आयफोन जप्त केला. तृप्ती सिंग राजपूत मध्य प्रदेश पर्यटन विभागाची अतिरिक्त प्रमुख असल्याचा दावा करून लोकांना भेटत असे.

**नोकरीचे आमिष दाखवून तरुणांची फसवणूक**

या भामट्यांच्या आमिषाला बळी पडलेली पीडित व्यक्ती अशोक नगरमधील चंदेरी पोलिस ठाण्यात पोहोचल्यामुळे हे प्रकरण उघडकीस आले. पीडित व्यक्तीने सांगितले की, तृप्ती राजपूत नावाच्या महिलेने स्वतःला आयएएस अधिकारी भासवून मनुष्यबळ विकास मंत्रालयात नोकरी देण्याच्या बहाण्याने अनेक तरुणांची लाखो रुपयांची फसवणूक केली. त्यांना व्हॉट्सॲपवर बनावट 'जॉइनिंग लेटर्स'सुद्धा पाठवण्यात आले होते. याप्रकरणी पोलिसांनी तपास केला असता तृप्ती राजपूत आणि तिच्या भावाचे कटकारस्थान उघडकीस आली. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## दृष्टिकोन

**डॉ. सुकृत खांडेकर**

# असे अधिकारी देशभर हवेत

गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेली महाराष्ट्रातले कार्यक्षम आणि स्पष्टवक्ते सरकारी अधिकारी तुकाराम मुंढे यांची नोंद एव्हाना आंतरराष्ट्रीय नियतकालिकांनीही घेतली आहे. असे अधिकारी, त्यांची कार्यशैली हा किरकोळ चर्चेचा विषय नाही, तर देशभरात या प्रामाणिक कारभाराचा कित्ता गिरवण्याची गरज आहे. एखाद्या अधिकाऱ्याने सत्याची आणि नियमांची वाट चोखाळायचे ठरवले तर काय घडू शकते, हे यामधून स्पष्ट होते. इतकेच नव्हे, तर कोणत्याही समस्येकडे किंवा सरकारी कामातील त्रुटीकडे अवघ्या देशातील सरकारी अधिकाऱ्यांनी कोणत्या प्रकारे बघायला हवे, याचा वस्तुपाठही येथे मिळतो. महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आपल्या धडाकेबाज कार्यशैलीमुळे राज्यातील जनतेची मने अल्पावधीतच जिंकली आहेत. नियम आणि कायद्यांची काटेकोर व कठोरपणे अंमलबजावणी करणारा नोकरशहा अशी त्यांची ख्याती आहे. दुर्जनांचा कर्दनकाळ आणि सामान्य जनतेच्या हिताचा विचार करणारा अधिकारी म्हणून त्यांनी जनतेच्या मनात स्थान मिळवले आहे. जनतेला आपल्या हक्काची जाणीव करून देणारा आणि नियम व कायदे याविषयी जनजागृती करणारा हा अधिकारी आहे. म्हणूनच 'एफडीएचे सिंघम' म्हणून त्यांनी जनतेच्या मनात आदराचे स्थान प्राप्त केले आहे.

राज्यात नोंदणीकृत हॉटेल्सची संख्या अकरा लाखांपेक्षा जास्त आहे. मुंबईत हॉटेल्सची संख्या चार लाखांहून अधिक आहे. अनधिकृत-नोंदणी न केलेल्या खाणावळी, हॉटेल्स, रस्त्यावर-पदपथावर-रेल्वे स्टेशनसमोर किंवा एसटी बस स्थानकासमोर आणि कार्यालयांनी गजबलेल्या ठिकाणी खाद्यपदार्थांची सेवा देणाऱ्या टपऱ्या, स्टॉल्स, उभारलेले तंबू यांची संख्यासुद्धा लाखोंमध्ये असावी. रोज लाखो-कोटी लोक तेथे चहा, नाश्ता, जेवण करतात. पण तेथील किचन कसे आहे हे कुणालाच ठावूक नसते. कोण काय बनवतं हे माहिती नसते. मेन्यूतील पदार्थ बनवताना त्यात कोणते तेल, तूप, मसाले वापरले जातात हे ठावूक नसते. किचनमधील स्वच्छता, नेटकेपणा काय आहे याची कुणाला जाणीव नसते. कपडे खरेदी करताना, अगदी शर्ट-पँट खरेदीच्या वेळी निरखून पारख केली जाते, दुकानातील विक्रेत्याला अनेक प्रश्न विचारून भंडावून सोडले जाते, किमतीबाबत घासाघीसही केली जाते, पण आपण भूक लागली म्हणून पोटपूजा करण्यासाठी जातो तिथे पदार्थांची ऑर्डर दिल्यानंतर टेबलवर आणून देतील ते निमूटपणे खातो आणि जीएसटीसकट बिल देऊन बाहेर पडतो. पण आपण चवीने खाल्लेले पदार्थ बनवणाऱ्या स्वयंपाकघरातील वातावरण कसे आहे, याची आपल्याला उत्सुकताही नसते. तुकाराम मुंढे यांनी अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त झाल्यापासून हॉटेल्सची स्वयंपाकघरे तपासण्याची मोहीम सुरू केली. त्यांच्या टीमने मुंबईत घातलेल्या धाडींना मोठी प्रसिद्धी मिळत असली तरी अशी तपासणी मोहीम राज्यात सर्व शहरात चालू आहे.

पान टपरीपासून मोठ मोठी नामांकित हॉटेल्स, त्रितारांकित व पंचतारांकित हॉटेल्स, रेस्टॉरंटस, मॉल्स, नावाजलेले क्लब्ज, आईस्क्रीम पार्लर अशा अनेक ठिकाणी एफडीआयच्या टीम्सनी रोज किचन तपासणीचा धडाका लावला. नामांकित मिठाईची दुकाने, डेअरी फार्मची सुद्धा त्यातून सुटका नाही. मंत्रालय आणि विधान भवनाच्या उपाहारगृहाचीही एफडीएने तपासणी केली. अनेक सेलिब्रेटींच्या नावाने हॉटेल्स उभी आहेत. त्यांनाही अशा तपासणीला सामोरे जावे लागले. अशा धाडीनंतर किचनमधील स्वच्छता, शुद्ध पदार्थांचा वापर, शिस्त याचे पालन करण्यासाठी हॉटेलमालकांची धावधाव झाल्याचे बघायला मिळाले. कायद्याचे हात किती लांब असतात, हे तुकाराम मुंढे यांनी एफडीएचे आयुक्त म्हणून महाराष्ट्राला दाखवून दिले. एकावन्न वर्षे वयाचे तुकाराम मुंढे हे २००५ च्या तुकडीचे आयएएस अधिकारी आहेत. ते स्वतःविषयी



खूप कमी बोलतात. मुंबई प्रेस क्लबने त्यांना नुकतेच वार्तालाप कार्यक्रमासाठी बोलावले होते. त्या कार्यक्रमाला सव्वाशे ते दीडशे पत्रकार, टीव्ही वार्ताहर, कॅमेरामन, फोटोग्राफर्स यांनी गर्दी केली होती. प्रत्येकाला त्यांच्याशी बोलायचे होते, त्यांना प्रश्न विचारायचे होते. एका ज्येष्ठ पत्रकाराने तर त्यांची तुलना अमिताम बच्चन यांच्याशी केली. अनेकांनी त्यांचा उल्लेख 'सिंघम' म्हणून केला. तुकाराम मुंढे यांची लोकप्रियता आज मोठ्या उंचीवर आहे. पण त्याबरोबर जनतेला त्यांच्याविषयी मोठा आदर आणि आपुलकी वाटत आहे. हे भाग्य फारच थोड्या नोकरशहांना मिळाले असावे. म्हणूनच अशा एखाद्या प्रामाणिक अधिकाऱ्याच्या कार्याचा आणि कार्यशैलीचा कित्ता देशभरातील अधिकाऱ्यांनी गिरवावा, असे वाटते.

तुकाराम मुंढे हे होणाऱ्या कौतुकाने भारावून जात नाहीत आणि त्यांच्यावर होणाऱ्या टीकेने खचून जात नाहीत. ते नेहमी संयमी आणि शांत असतात. दुसऱ्याचे म्हणणे पूर्ण ऐकून घेतात. एखाद्यावर चुकीने कारवाई झाली असेल तर त्याला पुन्हा संधी देतात. मुद्दाम कोणी चूक केली नसेल तर त्यालाही पुन्हा संधी देतात. ते म्हणतात, मी वेगळे काहीच करत नाही. मी फक्त नियम आणि कायदे यांची काटेकोर अंमलबजावणी करत असतो. मी कोणी सेलिब्रेटी नाही किंवा इतरांपेक्षा वेगळा नाही. गेल्या एकवीस वर्षांमध्ये पंचवीस वेळा त्यांची बदली झाली, उद्या एफडीएमधून बदली झाली तर..., असा प्रश्न विचारला तेव्हा ते नम्रपणे म्हणाले, माझ्या बदलीबाबतचा प्रश्न आपण संबंधित ऑथॉरिटीला विचारा. मी दुसरीकडे गेलो तरी कामाची शैली अशीच पुढे चालू राहते. आज सरकारी दबावाखाली किंवा ठरावीक राजकारण्यांच्या दबावाखाली काम करणारे अधिकारी अनेक राज्यांमध्ये पैशापासरी सापडतील. म्हणूनच नियमांच्या चौकटीत सक्षमतेने काम करणाऱ्या अशा अधिकाऱ्याचे उदाहरण अवघ्या देशाने समोर ठेवायला हरकत नाही. तुकाराम मुंढे ज्या पदावर असतात, तिथे धडाकेबाज काम करतात, बेशिस्त व बेकायदेशीरपणा अजिबात खपवून घेत नाहीत. त्यामुळे हितसंबंधी लोक नाराज होतात. वर्षानुवर्षे सेटिंग लावून अधिकाऱ्यांना मॅनेज करून कामे करून घेण्याची सवय लागलेले अनेक जण अस्वस्थ होतात. म्हणून अशा दलालांना, मध्यस्थांना मुंढेंसारखे अधिकारी नकोसे वाटतात. हे चित्र अवघ्या देशामध्ये सार्वत्रिक मानता येते.

राजकारणी आणि राज्यकर्त्यांनाही तुकाराम मुंढे आपल्या खात्यात येणे अडचणींचे वाटते. नवी मुंबई महापालिकेचे आयुक्त असताना त्यांनी अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे, नाक्यानाक्यावर झळकणारी बेकायदा होर्डिंग्ज आणि बॅनर्सविरोधात मोहीम सुरू केली. राजकारण्यांसाठी ती अडचणीची ठरली. महापालिकेत सर्वपक्षीय नेत्यांनी ठराव करून त्यांच्या बदलीची मागणी केली. मुंढे यांची बदली झाली, पण त्यांनी आपल्या कार्यपद्धतीत बदल केला नाही. एव्हाना देशाचे वैभव असलेला गणेशोत्सव समोर आहे. गणेशोत्सवात विविध ठिकाणी महाप्रसादाचे वाटप होते. महाप्रसादासाठी परवाना आवश्यक असल्याचे आदेश एफडीएने जारी केले आहेत. लोकांच्या आरोग्यासाठी परवाना आणि उत्तरदायित्व आवश्यक आहे. राज्यात रक्तदान शिबिरांचे आयोजन केले जाते. रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान, असा प्रचार करून रक्त जमवले जाते. ते कोणत्या रक्तपेढीला पुरवले जाते, त्यापोटी पैसे दिले जातात का, त्याचा वापर पुढे कसा होतो, हे ठावूक नसते. म्हणून रक्तदान शिबिरासाठी परवाना आवश्यक आहे, असा फतवा एफडीएने काढला आहे. मेडिकलच्या दुकानातील औषधांची आणि पॅकिंगची तपासणीही चालू आहेच. अशी ही तपासणी आणि त्याबाबतची जागरूकता एका राज्यापुरती का मर्यादित रहावी? त्यासाठी जबाबदारी निभावण्याचा हा पॅटर्न देशभर अंगीकारला जायला हवा.

पद कोणतेही असो, नियमांशी तडजोड नाही, हे तुकाराम मुंढे यांच्या कामाचे सूत्र आहे. भेसळयुक्त अन्न, निकृष्ट किंवा बनावट औषधे, प्रतिबंधित पदार्थ, चुकीचे लेबलिंग, अस्वच्छ अन्ननिर्मिती याचा परिणाम लाखो लोकांच्या आरोग्यावर होऊ शकतो, याचे भान ठेवून एफडीए काम करत आहे. फाईलींच्या निपटाऱ्यामध्ये अडकून पडण्यापेक्षा प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर दिला जात आहे. नियम सर्वांसाठी समान आहेत. त्यातूनच तुकाराम मुंढे यांच्या कामाचा दरारा आणि विश्वास जनतेमध्ये निर्माण झाला आहे. अशी तत्परता, शिस्त आणि पारदर्शकता, पोलिस-प्रशासन व सरकारी कामात दिसावी आणि असे चित्र देशभर पाहायला मिळावे, ही अपेक्षा आहे. ■

## हलकं-फुलकं

**अरुंधती वैद्य**

# दीड कप चहा...



भारतात चहा ब्रिटिशांनी आणला पण त्याला आपण इतका आपलासा केला की आपल्या दिवसाची सुरुवात चहाशिवाय होऊ शकत नाही. कोणाला तर बिछान्यावरच चहा लागतो.

चिनी राजा शेन नुंग याला योगायोगाने चहाचा शोध लागला. ब्रिटिशांनी तो भारतात आणला. त्याची लागवड केली. चहा हा शब्दही चिनी भाषेतील 'चा'या शब्दापासून आला आहे. भारतात आपल्या चहाचे ग्राहक तयार व्हावे म्हणून इंग्रजांनी भारतीयांना चहाची सवय लावली. त्यासाठी त्यांनी सुरुवातीला रेल्वे स्टेशन्स आणि कामाच्या ठिकाणी फुकट चहा वाटला. तेव्हापासूनच भारतीयांना चहाचीच नाही तर फुकट चहा पिण्याची सवय लागली असावी. आजही कोणी फुकट चहा दिला तर, ''क्या दोस्त है. दोस्ती हात मिलाने से नहीं चाय पिलाने से बढती है यार!'' असे मनःपूर्वक दाद देणार.

चहा बनवणे आपण ब्रिटिशांकडून शिकलो. चहाची सुंदर किटली, नाजूक नक्षीदार कप आणि बशी, किटलीतला गरम गरम वाफाळता सोनेरी चहा प्रत्येकाने आपल्या कपात ओतायचा आणि त्यात हवी तेवढी साखर, हवे तेवढे दूध घालून चमच्याने हळुवार हलवायचा तो चहा काळा होईपर्यंत. इंग्रजांची चहा बनवण्याची राजस, दिमाखदार पद्धत आपल्याला काही मानवली नाही. आपण स्वतःची स्वतंत्र पद्धत तयार केली. विशेष म्हणजे प्रत्येक देशात, राज्यात, अगदी प्रत्येक घरात चहा बनवण्याची स्वतंत्र पद्धत आहे. आपल्याकडे चहात आले आणि विलायची अगदी पाहिजेच. चहा करण्याला कोणी 'चहा मांडला,' कोणी 'चहा टाकला' म्हणतं, तर कोणी 'चहा ठेवला' म्हणतात. कपात चहाची पुडी सोडून ती हलवत बसून चहा करणे आपल्याला काही मानवले नाही. आपल्याला तयार चहा हातात लागतो.

चहाचे कडक मिठा चहा, निव्वळ दुधाचा चहा, लेमन टी, ब्लॅक टी, ग्रीन टी, हनी टी, काश्मिरी कहावा, बासुंदी चहा असे अनेक प्रकार आहेत. उरलेल्या बासुंदीचा चहा खरेच फक्कड लागतो. एकदा पिऊन पाहाच. पुण्यात तर 'मारामारी' नावाचा चहा प्रसिद्ध होता. हल्ली आरोग्यदायी म्हणून 'माचा टी'ची क्रेझ आहे.

पुण्यावरून एक किस्सा आठवला. पुण्यातला लक्ष्मी रोडवरच्या एका कपड्याच्या दुकानदाराला गिऱ्हाईकांना चहा द्यायचा नसला की तो दुकानातल्या कामगाराला, ''नाना चहा आण'', असे सांगायचा आणि ''अण्णा चहा आण'' असे सांगितले की तो कामगार चहा आणायचा.

आपण चहा एवढा आपलासा केला की त्याची तुलना प्रत्यक्ष स्वर्गीय पेय अमृताशी केली. अनेकांसाठी चहा म्हणजे संजीवनी झाला. आपण त्याला आपल्या भावनांशी जोडले आहे. सुखात- दुःखात, आगत-स्वागतासाठी चहा हवाच. कोणाच्या घरी गेल्यावर चहा दिला नाही तर ''काय खडूस माणूस आहे साधा चहा दिला नाही.'' अशी संभावना होते.

कपभर चहा मनोमिलन घडवून आणतो. चहा संवाद साधण्याचे छान माध्यम आहे. वधू परीक्षा, लग्नाची बोलणी, एवढेच नाही तर राजकीय चर्चा यशस्वी करण्यात चहा फार महत्त्वाचा!

''शायद मेरे शादी का खयाल मन में आया है
इसी लिए मम्मी ने तुम्हे चाय पे बुलाया है'' एकेकाळी तरुणाईच्या मनातील भावना व्यक्त करणारे हिंदी चित्रपटातील हे गाणे फार गाजले होते.

आज चहा अनेकांच्या पोटापाण्याचे साधन बनला आहे. इंजिनीयर झालेले युवक सुद्धा चहाचा व्यवसाय करतात. चहाच्या दुकानांची नावे पूर्वी 'रामभरोसे टी', 'भैरव चहा', 'काली माता चहावाला' अशी मजेदार असायची. आज मात्र 'प्रेमाचा चहा', 'आपला चहा', 'चहा आमचा आवड तुमची', 'फक्कड चहा', अशी ग्राहकांना आकर्षित करणारी नावे आहेत. एकदा प्रवासात एका खेडेगावात चहाच्या टपरीवर 'हेमामालिनी चहा' अशी पाटी वाचली होती. आपल्या देशात चहा हे आदरातिथ्याचे प्रतीक झाले आहे. कोणत्याही कार्यक्रमात उपस्थितांचे चहाने स्वागत केले जाते किंवा चहाने निरोप दिला जातो. हल्ली महागाईमुळे चहाच्या कपाचा आकार फारच छोटा झाला आहे. एका कार्यक्रमात अर्ध्या बोटाएवढा चहाचा कप पाहून माझी चहाबाज मैत्रीण म्हणाली, ''केवढासा तो कप आणि त्यातला केवढासा तो चहा! या चहाने वरचा ओठ ओला होतो आणि खालचा ओठ कोरडाच राहतो. काही दिवसांनी चहापानाच्या कार्यक्रमात तीर्थसारखा पळीभर चहा हातावर टाकतील.'' तिच्या या टीकेवर आम्ही बराच वेळ हसत होतो.

आमच्या पूर्वीची पिढी दिवसाची सुरुवात दीड कप चहाने करायची. सकाळचा चहा दीड कप हवा, असा अलिखित नियम होता. घरातल्या पुरुषांना तर पहिला कपभर चहा संपताच पुन्हा अर्धा कप चहा कपात लागायचा आणि तो जर लगेच मिळाला नाही तर, ''अरे चहा आण लवकर. माझा चहा संपला आणि अजून तू चहा दिला नाही.'' पुढचा चहा कपात पडेपर्यंत यांचा जीव टांगणीला लागणार. कधी गृहिणीचा अंदाज चुकलाच आणि चहा कमी पडला तर... पुढचा चहा कपात पडेपर्यंत यांच्या जीवाची अशी काही तगमग व्हायची की चहा करणारीला आपल्या हातून खूप मोठी चूक झाली, असे वाटून ती बिचारी ओशाळवाणी व्हायची. घरी भेटायला आलेल्यांनाही आग्रहाने 'घ्या हो थोडा' म्हणून आणखी अर्धा कप चहा दिला जाई.

आता साखरेचे भाव वाढले, दुधाचे भाव वाढले त्यामुळे दहा रुपयाला मिळणारा चहा आता पंधरा रुपये झाला आहे. त्यामुळे दीड कप चहा तर... बहोत दूर की बात बन गया है! ■

९४२०३९७५५९

## रविवारची पत्रे

### शिकूया संस्कृत

भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने १९६९ साली दिलेल्या आदेशानुसार श्रावणपौर्णिमा अर्थात नारळीपौर्णिमा म्हणजेच रक्षाबंधनाच्या पावनमुहूर्तावर 'संस्कृतदिन' साजरा केला जातो. संस्कृतभाषेचा प्रसार-प्रचार व्हावा, या भाषेतील साहित्याचा सन्मान व्हावा या उद्देशाने शाळा महाविद्यालये, विविध संस्कृतकार्यरत संघटना यांच्याकडून विविध स्पर्धा, व्याख्याने, विभिन्न उपक्रम या निमित्ताने राबविले जातात. यावर्षी नुकताच संस्कृत दिवस साजरा झाला. भारत देशातील संस्कृत विश्वविद्यालये, संस्कृत कार्यास कटिबद्ध असलेली 'संस्कृतभारती' या स्वयंसेवी संघटनेकडून संस्कृत दिनाच्या तीन दिवस आधी व तीन दिवस नंतर असा संस्कृत सप्ताह संपन्न होत असतो. यावर्षी संस्कृतभारतीद्वारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या उपक्रमात त्यांनी त्यांच्या भाषणात ज्या संस्कृत श्लोकांचा उल्लेख केला, ते संस्कृत श्लोक अर्थासह संकलित करून संस्कृतभारती, विदर्भप्रांतद्वारा 'उद्गाराः' हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकाचे विमोचन दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. याच पुस्तकातील काही श्लोक कंठस्थ करून प्रस्तुत करण्याचा उपक्रम शालेय स्तरावर राबविला जात आहे. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी संस्कृत रील निर्माण स्पर्धा आयोजिली आहे.

संस्कृत ही प्राचीन भाषा आहे. तंत्रज्ञानाच्या, संगणकाच्या, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या या युगात कालबाह्य संस्कृतचा इतका उदो उदो करणे म्हणजे व्यर्थ कालापव्यय आणि जुने ते सोने मानणे होय असे अनेकांचे मत असल्याचे लक्षात येते. ज्यांचे असे विचार आहेत, तीच मंडळी एखाद्या संस्कृतानुरागी व्यक्तीच्या संपर्कात आल्यानंतर ''अहो, तुम्ही संस्कृतजन आहात. म्हणून तुमच्यावर कशाचाही परिणाम होत नाही. स्वसुखनिरभिलाष तुम्हीच इतकी बिकट परिस्थिती हाताळू शकता'' असा अभिप्राय नोंदविते. हा अभिप्रायच संस्कृतची आवश्यकता अधोरेखित करतो.

मी स्वतः ग्रामीण आहे. आमच्या गावातील शाळेत संस्कृत हा विषय अध्ययनासाठी नव्हता. पुढे उच्चशिक्षणासाठी शहरी आल्यानंतर महाविद्यालयीन प्रवेशाचे वेळी तेथील प्राध्यापकांनी या विषयाची माहिती दिली. त्यांचे ऐकून मी हा विषय अध्ययनासाठी घेतला. एकदा काय हा विषय निवडला आणि हळूहळू या विषयाची गोडी वाढतच गेली. लक्षात असे आले की, संस्कृत हा एक अपूर्व असा अक्षय खजिना आहे. कितीही लुटा समाधान होतच नाही. हा कोष लुटणाऱ्या प्रत्येकाला यातील वेगळीच संपत्ती हाती लागते नि त्याचे जीवन धन्य होते. कोणी यातील शास्त्रज्ञान आत्मसात करतो तर कोणी जीवन जगण्याची कला, कोणी व्यवहार कौशल्य तर कोणी व्यवस्थापनकौशल्य, कोणी वैद्यकशास्त्र तर कोणी तत्त्वज्ञान, कोणी कर्मसिद्धांत तर कोणी भक्तिमार्ग चोखाळतो, कोणी अर्थार्जनार्थ यातील ज्ञान प्राप्त करतो तर कोणी आत्मज्ञानसंपन्न होऊन कृतार्थ होतो. एकूण काय तर हा एक अक्षयकोष आहे. जितका लुटाल तितका वाढेल. ही भाषा ज्ञानाचे भांडार आहे आत्म्याचे पोषण करणारी आहे.

यावर्षी दिल्ली येथे जंतरमंतरवरील आंदोलन अनुभवून सर्व मुद्दे बाजूला सारून संस्कृताश्रित संस्कृतीच्या विस्मरणाचा परिणाम हा एकच मुद्दा महत्त्वाचा वाटू लागला. आमची नानाधर्मनिगूढतत्त्वनिचित सनातन भारतीय संस्कृती संस्कृतातच निहित आहे. संस्कृतला दूर केले तर संस्कृतिरक्षण अशक्य आहे. बालपणापासून यातील विचारधन मनावर बिंबविल्यास बेताल आचरण घडणारच नाही. खरेतर तरुणवय हे मेहनतीचे, कष्टाचे, संस्कार आत्मसात करून ध्येयप्राप्तीसाठी झटण्याचे वय असते. नेमक्या याच वयात बुद्धीला कालुष्य प्राप्त होऊ शकते. अशावेळी अमलीन मनास मलिन करणाऱ्या घटकांपासून दूर राहण्याची, कोणत्याही प्रलोभनांना बळी न पडण्याची निर्णयक्षमता आवश्यक असते. उन्मत्त यौवन भविष्य काळवंडून टाकते. नेमका तोच उन्माद जंतरमंतर वर दिसून आला. यात युवजनांचा दोष आहे असे म्हणता येणार नाही. खरेतर ही युवाशक्ती 'योगा-योगा' करीत कसरत करीत असते. पण 'योग' ही व्यापक संकल्पना त्यांच्या समोर आम्ही मांडलीच नाही, तर त्यांना कसे कळणार? योगविज्ञान ही संस्कृतची जगाला अमूल्य अशी देण आहे. योगशास्त्रात 'यम' आणि 'नियम' ही दोन योगाची अंगे समाजाच्या धारणेकरिता, सुस्थितीकरिता आणि व्यक्तीच्या उन्नतीकरिता उपयुक्त आहेत. व्यक्ती ही समाजाची घटक आहे. समाजोन्नती हे त्याचे साध्य आहे. समाजातील व्यक्ती उन्नत असतील तर समाजव्यवस्था योग्य राहील अन्यथा असंस्कृत व अयोग्य असे वर्तन त्या व्यक्तीकडून होत राहिल्याने समाजाला त्याचा त्रास होईल.

यमामध्ये कायिक, वाचिक, मानसिक अहिंसा सांगितली आहे. सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह या मूलभूत पाच तत्त्वांचे पालन समाजाकडून जितके केले जाईल तितके या राष्ट्राचे कल्याण होईल.

१९८१ साली स्थापित संस्कृत भारती ही संघटना केवळ संस्कृत भाषेचाच प्रचार-प्रसार करते असे नाही. वर्षभर संस्कृत भारतीकडून विभिन्न उपक्रम राबविले जातात. उदा. महाकवी कालिदास दिन, गुरुपौर्णिमा, संस्कृत दिन, गीता जयंती, वाल्मीकि जयंती, विविध कार्यशाळा, वर्ग इत्यादींचे आयोजन करण्यात येते. जेणेकरून संस्कृतातील विविध ज्ञानशाखा सर्वांना अवगत व्हाव्या, मनुष्य जीवनातील त्यांची उपादेयता कळावी. यासाठी संस्कृतातील हा ज्ञाननिधी मिळविण्यासाठी संस्कृत शिकावे लागेल. संस्कृतातील ज्ञान, संस्कृती, विचारधन जाणून घेतल्यास जंतरमंतरसारखे गैरवर्तन घडणार नाही. यासाठी शिकूया संस्कृत एवढेच विनम्र आवाहन करावेसे वाटते.

**प्रा. डॉ. विभा क्षीरसागर**/९६५७७६७३९६
(संस्कृत भारती, नागपूर महानगर उपाध्यक्षा)

■■■

### गुन्हेगारांवर वचक हवा

महाराष्ट्रातील सध्याची कायदा आणि सुव्यवस्था आव्हानात्मक परिस्थितीचा सामना करत आहे. डिजिटल गुन्हे, बलात्काराच्या घटना, अमली पदार्थांचा व्यापार, भ्रष्टाचार अशा अनेक प्रकारच्या गुन्हेगारी घटना वरचेवर घडत आहेत. लहान बालकांवर अत्याचाराच्या घटना तर संतापजनक आहेत. नसरापूरच्या गुन्हेगाराला फास्ट कोर्टाने फाशीची शिक्षा सुनावली असली तरी त्या शिक्षेची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार हे कोणीही सांगू शकत नाही. अशा परिस्थितीत सर्वसामान्य नागरिकांना जगणे अवघड होते आहे. गुन्हेगारांना पोलिसांची, कायद्याची, शिक्षेची भीती वाटेनाशी झाली आहे. किरकोळ गुन्ह्यांपासून ते गंभीर गुन्हे करणाऱ्यांना कसलाही धाक राहिलेला नाही. एकेकाळी उत्तर प्रदेशसारख्या मोगलाई असलेल्या राज्यातील गुन्हेगारी तेथील मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी समूळ उखडून टाकली. त्यामुळे गेली काही वर्षे उत्तरप्रदेशमधील कायदा आणि सुव्यवस्था परिस्थितीत सुधारणा झाली आहे.

महाराष्ट्रातील गुन्हेगारी खरोखर मोडून काढायची असेल तर, अगदी उत्तरप्रदेशसारखी नसली तरीही, महाराष्ट्र सरकारला कठोर पावले उचलावी लागतील. गुन्ह्यांच्या घटनांमध्ये होणारा राजकीय हस्तक्षेप थांबवावा लागेल. पोलिसांना त्यांचे कर्तव्य पार पाडण्यासाठी स्वातंत्र्य द्यावे लागेल, पोलिसांना कारवाईचा अधिकार दिल्याशिवाय महाराष्ट्रातील गुन्हेगारी कमी होणार नाही. त्यासाठी गुन्हेगारांवर सरकार, पोलिस आणि कायद्याचा वचक असणे आवश्यक आहे.

**शिवराम वैद्य**/पुणे. ९८५०५१८०१८

■■■

### गणेशोत्सव, ध्वनिप्रदूषण आणि कायद्याची समानता



पुण्यातील ऐतिहासिक गणेशोत्सवातील कर्णकर्कश ध्वनिप्रदूषण आणि 'डीजे'च्या अवाजवी वापराविरोधात सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांनी घेतलेली भूमिका आरोग्यविषयक दृष्टीने अत्यंत रास्त आणि स्वागतार्ह आहे. डीजेच्या अतिरेकी आणि अवाजवी आवाजामुळे बालके, वृद्ध, रुग्ण आणि सामान्य नागरिकांच्या आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम ही एक निर्विवाद वस्तुस्थिती आहे. परंतु, या भूमिकेला विरोध करताना एका माथेफिरू तरुणाने बापट यांच्यावर केलेला हल्ला अत्यंत चिंताजनक आणि निषेधार्ह आहे. एका सुसंस्कृत, पुरोगामी आणि लोकशाही समाजात विचारांचा विरोध हा विचारांनी व सनदशीर मार्गानेच व्हायला हवा; कोणत्याही स्वरूपाच्या हिंसेचे समर्थन कधीही केले जाऊ शकत नाही.

मात्र, या संपूर्ण वादात सामाजिक कार्यकर्ते आणि प्रशासनाची भूमिका अधिक सर्वसमावेशक, प्रगल्भ आणि निःपक्षपाती असणे आवश्यक आहे. ध्वनिप्रदूषणाला किंवा सार्वजनिक जागेच्या वापराला विरोध करताना उत्सवाच्या मूळ सांस्कृतिक परंपरेचा आणि लोकभावनांचा समतोल विचार व्हायला हवा. पेठ भागातील वाहतुकीची कोंडी किंवा रस्त्यावरील मंडपांवर आक्षेप घेताना, उद्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीसमोरील अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात होणाऱ्या अथर्वशीर्ष पठनासारख्या उपक्रमांवरही आक्षेप घेतला जाईल, ही भीती अनाठायी वाटत नाही. गणेशोत्सवाचा पारंपरिक उत्साह, ढोल-ताशांचा गजर आणि सांस्कृतिक ओळख टिकवून डीजेसारख्या घातक अतिरेकाला नक्कीच चाप बसला पाहिजे.

येथे सर्वात महत्त्वाचा आणि कळीचा मुद्दा म्हणजे, नियमांची व कायद्याची निःपक्षपाती अंमलबजावणी. ध्वनिप्रदूषण किंवा सार्वजनिक जागेच्या वापराबाबतचे नियम हे केवळ एका विशिष्ट धर्मापुरते किंवा सणापुरते मर्यादित का असावेत? मशिदींवरील बेकायदेशीर भोंगे असोत, इतर धर्मीयांच्या प्रार्थनासभा असोत किंवा राजकीय नेत्यांच्या प्रचंड रॅली व सभा असोत; ध्वनिप्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याला व शांततेला होणारा त्रास हा सर्व ठिकाणी समानच असतो. जेव्हा नियमांच्या अंमलबजावणीत असा निवडकपणा दिसून येतो, तेव्हा समाजात अस्वस्थता आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे, गणेशोत्सवाची सांस्कृतिक भव्यता आणि पारंपरिक उत्साह जपताना डीजेसारख्या घातक संस्कृतीला अटकाव केलाच पाहिजे. परंतु त्याच वेळी 'नियम आणि कायदा सर्वांसाठी समान' हे तत्त्व शासन, प्रशासन आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी कठोरपणे अमलात आणणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

**अविनाश देशपांडे**/९४२२९४९२२६

■■■

### दशदिशा भूपाळी म्हणती

सध्याच्या पावसाळी हवामानामुळे आणि श्रावणाच्या आगमनामुळे आल्हाददायक वातावरण आहे. मानस सरोवर येथे झालेल्या दुर्घटनेमुळे मन निराश असते. पण निसर्ग कधी कुणासाठी थांबला आहे का? नेमेची येतो मग पावसाळा या प्रमाणे निसर्गाची उधळण सृष्टीवर होत असते. पहाटे उठून गच्चीत जाऊन बघावे तर काय? माझे सुस्वर स्वागत झाले...

**फूल पल्लव कली कालियन करत स्वागतम**
**पंछी मधुर सबद कहत करत स्वागतम**
**कोयल मधु कुऊक करत**
**भ्रमर करिती गुंजारव**
**पवन चलत सनन बहत करत स्वागतम**

काय नव्हते तेथे? निसर्गाच्या विविध रूपांचे दर्शन होते. निरभ्र निळ्याशार आकाशाचे मनोहारी दर्शन, कोकिळेचे साद घालणे ऐकू आले. पोपटांचे थवे आंब्याच्या झाडावर मिठू मिठू साद घालत होते. अनेकविध पक्ष्यांची किलबिल कधीही न पाहिलेल्या पक्ष्यांचे दुर्लभ दर्शन झाले.

मला आवडणारा भारद्वाज पक्षी त्याचे तांबूस पिंगट रंगाचे मऊ मखमली पंख पसरत गुंजासारख्या किरमीजी रंगाच्या डोळ्यांनी माझ्याकडे बघत ऐटीत कठड्यावरून चालत जात होता. मग क्रुप क्रुप क्रुप असा आवाज करत झाडाच्या फांदीवर जाऊन बसला. त्याला प्रत्युत्तर ही कुठूनसे येत होते. आकाश एकाच वेळी अनेकविध रंगांची उधळण करीत होता. आपण जणू एखाद्या अभयारण्याची सैर करतो आहोत असा भास होत होता. अशा विविध पक्ष्यांचे आवाज आता भर दिवसाही ऐकू येतात. दुर्लभ झालेल्या चिऊताई पण दिसू लागल्यात हल्ली. ही मंडळी प्रदूषणापासून तात्पुरती सुटका झाल्याचा आनंद तर मनवत नसतील? मग लक्षात आले निसर्ग चुकत नाही आपल्यालाच कुठे ही दृष्टी असते.

कुठे शोधिसि रामेश्वर अन कुठे शोधीसि काशी
हृदयातील भगवंत राहिला हृदयातून उपाशी

निसर्गाची श्रीमंती तर विनामूल्य आपल्या दारात अवतरली आहे फक्त नजर शाबूत हवी...

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

■■■

### गणेशोत्सव व वर्गणी

महाराष्ट्र राज्य हे विविध प्रकारच्या परंपरेने नटलेले राज्य आहे. त्यातील प्रमुख उत्सव म्हणजे सार्वजनिक गणेशोत्सव होय. या उत्सवाचे जनक लोकमान्य टिळक आहेत. टिळकांचा उद्देश गणेशोत्सवाच्या माध्यमातून परिसरातील लोक एकत्र जमतील असा होता. गणेशोत्सव आणि वर्गणी हा विषय अत्यंत आनंदाचा क्षण असतो. मात्र हा विषय आजच्या आधुनिक काळात चिंताजनक व भयभीत करणारा ठरत आहे. वर्गणी हा असा विषय आहे की ती प्रत्येकाने आपल्या परिस्थितीनुसार देण्याची क्रिया आहे. वर्गणीचे रूपांतर कधी कधी खंडणीप्रमाणे होते. हे असे चिंताजनक व भीषण चित्र आपणास हमखास बघावयास मिळते. काही लोकांनी वर्गणी कमी दिली असता त्या लोकांबाबत अपशब्द बोलणे, त्या व्यक्तीबद्दल असामाजिक वक्तव्य करणे, संपूर्ण समाजासमोर निंदा करणे ही परिस्थिती दिवसेंदिवस वाढत आहे. याचे सर्वांत मोठे कारण म्हणजे समूहामध्ये प्रत्येकासाठी एक ठरावीक रक्कम ठरवली जाते. समूहातील काही सदस्यांची आर्थिक परिस्थिती नसते. रक्कम देणे जमत नाही. मंडळातील सगळे सदस्य त्या सदस्यासोबत सगळ्या दृष्टीने भेदभाव करतात व त्या सदस्याला मंडळातून डावलण्यात येते. यापुढे मंडळाने केवळ वर्गणीच मागावी, त्याला खंडणीचे स्वरूप येऊ नये.

**अक्षय उपगडे**/नागपूर

■■■

### अकोल्याचे श्री राजराजेश्वर

अकोल्याच्या इतिहासाच्या खुणा शोधताना आपली पावले एका प्राचीन शिवमंदिरापाशी येऊन थबकतात. आख्यायिका, भक्ती आणि श्रद्धेने वेढलेले श्री राजराजेश्वर मंदिर सांस्कृतिक अस्मितेचे जिवंत प्रतीक आहे. या प्राचीन मंदिराच्या शिवलिंगाशी जोडलेली एक अद्भुत आख्यायिका आजही अकोलेकरांच्या ओठांवर आहे. अकोलसिंग नावाचा एक राजा या परिसरात राज्य करीत होता. त्याची राणी शिवभक्त होती. दररोज मध्यरात्री ती शिवलिंगाचे पूजन करण्यासाठी मंदिरात येत असे. कालांतराने राजाच्या मनात राणीबद्दल गैरसमज निर्माण झाला. राजाने राणीचा पाठलाग केला. पाठलाग करता करता तो दाट जंगलाने वेढलेल्या शिवलिंगाजवळ येऊन पोहोचला. राजाचा क्रोध पाहून राणी भयभीत झाली. संकटाच्या त्या क्षणी त्या दाट अरण्यात तिने कुणाचा आधार घ्यायचा? तिने भगवान शिवाला आर्त हाक घातली... आणि मग घडला तो अद्भुत चमत्कार... शिवलिंग दुभंगले आणि राणीला त्याने आपल्यात सामावून घेतले व शिवलिंग पूर्ववत झाले. क्षणभरात घडलेली ही घटना पाहून राजा स्तब्ध झाला. त्याने राणीला थांबविण्याचा आटोकाट प्रयत्न केला; पण वेळ निघून गेली होती. राणीच्या साडीच्या पदराचे टोक आणि वेणीतील काही केस बाहेर होते, असे सांगितले जाते. आपल्या कृत्याची जाणीव होताच राजाला पश्चात्ताप झाला. राणीच्या भक्तीपुढे आणि भगवान शिवाच्या सामर्थ्यापुढे त्याचा अहंकार क्षणात विरघळून गेला. या अकोलसिंग राजाच्या नावावरूनच पुढे या गावाचे नाव 'अकोला' पडले असल्याचे म्हणतात. आजही श्री राजराजेश्वर मंदिरात तेथील भव्य शिवलिंगाच्या मध्यभागी दिसणारी भेग त्या घटनेची साक्ष देते. 'भक्ताच्या हाकेला धावून येणारा देव' अशी अकोलेकरांची श्रद्धा आहे. वर्षभर या मंदिरात भाविकांची वर्दळ असतेच; पण दर सोमवारी मोठी गर्दी असते. महाशिवरात्रीच्या पर्वावर परिसर भक्तिसागरात न्हाऊन निघतो. श्रावण महिना सुरू झाला की अकोल्याच्या वातावरणात एक वेगळे चैतन्य निर्माण होते. 'हर हर महादेव'च्या जयघोषात मंदिर परिसर दुमदुमून जातो. श्रद्धेचे केंद्र, अस्मितेचे प्रतीक असलेले श्री राजराजेश्वराचे शिवलिंग अत्यंत प्राचीन असून भगवान शिव आणि पार्वतीचा प्रत्यक्ष वास येथे आहे, अशी भाविकांची श्रद्धा आहे. आजच्या धावपळीच्या जीवनातही मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश करताच मनाला एक वेगळीच शांतता लाभते. श्री राजराजेश्वर हे केवळ अकोल्याचे ग्रामदैवत नाही, तर अकोल्याच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अस्मितेचे जिवंत प्रतीक आहे. ■



**अखिल देशपांडे**/अकोला। ९७६७१५१८३०



## कर्करोगग्रस्त शिक्षकास कास्ट्राईब शिक्षक संघटनेकडून आर्थिक मदत

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

कॅन्सरसारख्या गंभीर आजाराशी लढा देणाऱ्या एका गरजू शिक्षकाला मदतीचा हात देण्यासाठी येथील कास्ट्राईब शिक्षक संघटनेच्या वतीने एक लाख पन्नास हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष श्रीशैल कोरे आणि उत्तर सोलापूर तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी अवचिल महाडिक यांच्या हस्ते कर्करोग ग्रस्त शिक्षक लखन कांबळे यांना हा धनादेश प्रदान करण्यात आला. याप्रसंगी बाळे केंद्राचे केंद्रप्रमुख जीवराज खोबरे, शहर प्रमुख पवन कांबळे, जिल्हा सचिव सोमलिंग कोळी, दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष श्रीरंग बनसोडे, सचिव बाबुराव गायकवाड आणि जिल्हा प्रतिनिधी लक्ष्मण बनसोडे आदी उपस्थित होते.



## डॉक्टरांची खेळाडूंविषयी संवेदनशिलता

**श्रीपूर, दि. ५ सप्टेंबर -**

येथे कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यातील कामगारांचा प्रशांत क्रीडा महोत्सव सुरु आहे. या महोत्सवात स्पर्धा शिस्त, नियोजन व कामगांरामधील विजुगुषी वृत्तीमुळे परिपूर्ण असल्याने वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे म्हटले होते. याचे प्रत्यंतर लगेचच दिसून आले. कामगारांच्या दोन संघामध्ये आट्यापाट्याचा सामना चालू झाला होता. या स्पर्धात नजरेबरोबर पायांच्या हालचालीसही महत्व असते. परंतू मैदानावर असलेले बारीक खडे खेळाडूंच्या पायास टोचत असून त्यांची एकाग्रता राहू शकत नाही, हे स्पर्धा पाहत असलेल्या कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांच्या चाणक्ष नजरेने हेरले व त्यांनी तात्काळ पंचाना सामना थांबविणेची सुचना केली व तडक ग्राऊंड मध्ये जावून खडे वेचणेस सुरुवात केली. याबरोबर उपस्थित असलेल्या सर्वच अधिकारी व कामगारांनी अनुकरण करत खडे बाजूला काढणेस सुरुवात केली. मग काय सर्वांचेच हात लागल्यावर काही क्षणातच ग्राऊंड चकाचक झाले. मग आट्यापाट्या स्पर्धा सुरळीत चालु झाल्या. खेळाडूंना होत असलेला परंतू बोलून दाखवता न येणारा त्रास डॉ. कुलकर्णी यांच्या संवेदनशिलतेमुळे थांबला.

# मुंबई व नागपाडा संघांचे थरारक विजय

## गुरुवर्य बापूसाहेब झपके स्मृती समारोह राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धा : केरळ व नागपूर संघांची विजयी घोडदौड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ५ सप्टेंबर -**

कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या ४५ व्या स्मृती समारोहानिमित्त सांगोला विद्यामंदिरमध्ये सुरू असलेल्या भव्य राष्ट्रीय निमंत्रित बास्केटबॉल स्पर्धेत दुसऱ्या दिवशीचे साखळी सामने अतिशय चुरशीचे आणि रोमहर्षक ठरले. ४ सप्टेंबरच्या सायंकाळच्या आणि ५ सप्टेंबरच्या सकाळच्या सत्रात झालेल्या या सामन्यांमध्ये मुंबई, केरळ, नागपूर आणि पुण्याच्या संघांनी आपले वर्चस्व गाजवत विजयी आगेकूच केली आहे.

दोन्हीही सत्रात प्रेक्षकांना अत्यंत थरारक सामने पाहायला मिळाले. क गटात जी.के.पी. मुंबई आणि बी.एस.सी. बी.ई.जी. सेंटर खडकी-पुणे यांच्यात अत्यंत अटीतटीची लढत झाली, ज्यामध्ये जी.के.पी. मुंबईने ५५-५३ असा अवघ्या २ गुणांनी विजय खेचून आणला. फ गटातही असाच थरार पाहायला मिळाला नागपाडा मुंबई संघाने एस.के.बी.ए. पुणे संघाचा ६८-६६ असा अवघ्या २ गुणांच्या फरकाने पराभव करत रोमहर्षक विजय नोंदवला.

इतर सामन्यांत ब गटातून जयहिंद जिमखाना कडा-बीड संघाने सहारा स्पोर्ट्स सोलापूरचा ६८-५५ असा १३ गुणांनी पराभव केला. भारती विद्यापीठ पुणे संघाने नवी मुंबई फाल्कन्सवर (४९-२५), ग्रीनस्टार सोलापूरने टीम-काश नागपूरवर (४६-३७), तर मस्तान वाय.एम.सी.ए. मुंबईने डू इट बास्केटबॉल कोल्हापूरवर (४३-१४) मात केली. ग गटात एस.एन.जी. नागपूरने सेलिब्रेशन स्पोर्ट्स सोलापूरचा (४६-३०) पराभव केला. तर अ गटात श्री केरळ वर्मा त्रिशूर संघाने बी.टी.एस. मिरज संघावर ४१-१९ अशा फरकाने दणदणीत विजय मिळवला.



मुंबई विरुद्ध नांदेड या सामन्यातील टिपलेला क्षण.

### नेक्सस नांदेडचा महाकाय विजय

सकाळच्या सत्रातही खेळाडूंनी आक्रमक खेळाचे प्रदर्शन केले. ई गटात नेक्सस स्पोर्ट्स अकादमी नांदेड संघाने नवी मुंबई फाल्कन्स संघाचा ४८-०२ अशा तब्बल ४६ गुणांच्या महाकाय फरकाने धुव्वा उडवत एकतर्फी विजय मिळवला. ग गटात शिवरत्न स्पोर्ट्स अकादमी अकलूज संघाने सेलिब्रेशन स्पोर्ट्स सोलापूर संघाचा ४२-३९ असा ३ गुणांनी निसटता पराभव करत रंगत वाढवली.

याच सत्रात मस्तान वाय.एम.सी.ए. मुंबईने प्रा. शरद पाटील महाविद्यालय मिरज संघाला ४७-३९ असे पराभूत केले. एस.के.बी.ए. पुणे संघाने प्रिन्स युनायटेड कोल्हापूरचा (५२-१८), तर टीम-काश नागपूरने यजमान बापूसाहेब झपके स्पोर्ट्स अकादमी सांगोला संघाचा (५३-१४) पराभव केला. ब गटात समायरा अकादमी मुंबईने सहारा स्पोर्ट्स सोलापूरवर ५५-४५ अशी मात केली. जी.के.पी. मुंबईने एस.टी.बी.ए. सांगोला संघाला (५८-४६) हरवत आपला सलग दुसरा विजय नोंदवला. तसेच, श्री केरळ वर्मा त्रिशूर संघाने हाय-५ युथ फाउंडेशन मुंबई संघाचा ५९-४१ असा पराभव करत गटातील आपले वर्चस्व सिद्ध केले.

साखळी सामन्यांमधील या अटीतटीच्या लढतींमुळे स्पर्धेची रंगत आता शिगेला पोहोचली असून, अव्वल दोन संघांत येऊन बाद फेरीत पोहोचण्यासाठी सर्वच गटांमध्ये मोठी चुरस पाहायला मिळत आहे.

### विश्वेश झपकेंच्या स्वप्नाला गरुडझेप

सांगोल्याच्या या भव्य इनडोअर स्टेडियममध्ये स्थानिक खेळाडूंसाठी हक्काची आणि दर्जेदार अकॅडमी असावी, हे संस्था कार्यकारिणी सदस्य विश्वेश झपके यांनी उराशी बाळगलेले एक सुंदर स्वप्न होते. आज ते स्वप्न प्रत्यक्ष मैदानात साकार होताना पाहून मनस्वी आनंद होत आहे. गुरुवर्य बापूसाहेबांच्या नावाने सुरू असलेल्या या राष्ट्रीय स्पर्धांसोबतच, २६ जानेवारी २०२६ रोजी सुरू झालेल्या बापूसाहेब झपके स्पोर्ट्स अकॅडमी अंतर्गत सांगोला शहर व तालुका बास्केटबॉल असोसिएशनशी संलग्न संभाजी कदम बास्केटबॉल अकॅडमीने अल्पावधीतच मोठी गरुडझेप घेतली आहे. याच मैदानातून घडलेले आणि भारतीय बास्केटबॉल संघाचे माजी कर्णधार व प्रशिक्षक संभाजी कदम यांचे मार्गदर्शनाखाली आज ६ ते २१ वयोगटातील १०० हून अधिक खेळाडू येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण घेत आहेत. नुकत्याच झालेल्या रायझिंग स्टार लीगमध्ये या नवोदितांनी दाखवलेली जिद्द अतिशय कौतुकास्पद होती.त्यामुळे संभाजी कदम बास्केटबॉल अकॅडमीचे तंत्र सहाय्यक गणेश नागणे, अकॅडमीचे मार्गदर्शक सागर कदम व समन्वयक प्रशांत मस्के, शरद नागणे,नरेंद्र होनराव यांच्या योगदानातून सुरू असलेला हा क्रीडायज्ञ सांगोल्याच्या क्रीडा परंपरेला नक्कीच सुवर्ण झळाळी देईल.

**- प्रा. प्रबुद्धचंद्र झपके**
**अध्यक्ष सांगोला ता.शि.प्र.मंडळ, सांगोला**

# विराट करिअर अकॅडमीची ६ पदकांची कमाई

### राज्य अजिंक्यपद ॲथलेटिक्स स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

चाळीसावी महाराष्ट्र स्टेट ज्युनिअर ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये नेहरूनगर येथील शासकीय मैदानावरील विराट करिअर अकॅडमीच्या खेळाडूंनी धमाकेदार कामगिरी करत ६ पदकांची कमाई केली.

### स्पर्धेतील उल्लेखनीय पदकविजेते खेळाडू

**स्वरा जाधव:** लांब उडी शर्यतीत सुवर्ण.
**पूजा राठोड:** १०० मीटर धावणे कांस्य, ४ बाय १०० मीटर रिले रौप्य.
**संध्या राठोड:** लांब उडी प्रकारात कांस्य.
**भक्ती थोरात:** १०० मीटर अडथळा शर्यतीत कांस्य.
**कीर्ती तोडणकर:** ४बाय १०० मीटर रिले प्रकारात रौप्य.

रत्नागिरीतील डेरवण येथे नुकत्याच झालेल्या या राज्यस्तरीय स्पर्धेत अकॅडमीच्या खेळाडूंनी ही कामगिरी केली. या कामगिरीतील ६ पदकांमध्ये १ सुवर्ण, २ रौप्य आणि ३ कांस्य पदकांचा समावेश आहे. या सर्व खेळाडूंना एनआयएस कोच भारती लिंगडे व सूर्याजी लिंगडे यांचे मार्गदर्शन लाभले.




## ‘शिक्षक हे राष्ट्रनिर्मितीचे खरे शिल्पकार’

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. ५ सप्टेंबर-**


रयत शिक्षण संस्थेच्या कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा येथे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संजयकुमार श्रीमंत भोसले उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. घनश्याम हराळे होते, तर श्री. पांडुरंग भोसले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. संजयकुमार भोसले यांनी शिक्षकांचे समाज व राष्ट्रनिर्मितीतील योगदान अधोरेखित केले. शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा देणारा आणि समाज परिवर्तनाचा आधारस्तंभ असल्याचे त्यांनी सांगितले. बदलत्या काळानुसार शिक्षकांनी आधुनिक ज्ञान, तंत्रज्ञान आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाची सांगड घालून विद्यार्थ्यांना सक्षम नागरिक बनविण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी गुणवंत शिक्षक व कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा त्यांच्या उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यामध्ये डॉ. सतीश घाडगे (वरिष्ठ विभाग) प्रा. महेश भोसेकर (कनिष्ठ विभाग) सुहास जवंजाळ (कार्यालयीन कर्मचारी) यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन स्टाफ वेल्फेअर समितीचे प्रा. अमोल मोरे, डॉ. रविराज कांबळे यांनी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्यांच्या मागदर्शनाखाली केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. अलका घोडके यांनी केले तर कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. कैलास शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि, श्रीपूर
जा.क्र. : ०३१०/२०२६-२७

**अभिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
(एक्षत सभासदांकरिता)

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि; श्रीपूर या संस्थेची सन २०२५-२०२६ या वर्षाची अभिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, दि. २१/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता कारखान्याचे चेअरमन मा.आ.श्री.प्रशांतराव प्रभाकर परिचारक यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय करून निर्णय घेण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सदर सभेस सभासदांनी उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**-सभेपुढील विषय-**

विषय नं. १ : दि. २०-०९-२०२५ रोजी झालेल्या सोवीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतांत वाचून कायम करणे.
विषय नं. २ : दि.१-४-२०२५ ते ३१-३-२०२६ या वर्षाच्या कामकाजाचा संचालक मंडळाने तयार केलेला अहवाल स्विकारणे.
विषय नं. ३ : दि. १-४-२०२५ ते ३१-३-२०२६ या वर्षाच्या हिशोबाचे नफा-तोटा पत्रक व दि.३१-३-२०२६ अखेरचे ताळेबंद पत्रक स्विकारणे.
विषय नं. ४ : दि. १-४-२०२५ ते ३१-३-२०२६ या कालावधीतील वैधानिक लेखापरीक्षक मे.एस.जे.जे.एस.अँड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे यांचेकडून झालेल्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेवून मागील वर्षाच्या लेखापरीक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवाल स्विकारणे.
विषय नं. ५ : सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक झालेल्या खर्चाची नोंद घेणे.
विषय नं. ६ : सन २०२६-२७ चे महसुली व भांडवली अंदाजपत्रकाची नोंद घेणे व मंजुरी घेणे.
विषय नं. ७ : शासनमान्य लेखापरीक्षकांच्या नामतलिकेमधून आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व लेखापरीक्षण शुल्क ठरविणे.
विषय नं. ८ : सन २०२६-२७ करिता आयकर सल्लागार, विक्रीकर सल्लागार, सर्व्हिस टॅक्स सल्लागार, इंटरनल ऑडिटर, कॉस्ट ऑडिटर, एनर्जी ऑडिटर, जी.एस.टी. सल्लागार इत्यादिंच्या नेमणुका करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
विषय नं. ९ : सन २०२५-२६ मध्ये विक्री केलेल्या स्क्रॅप मटेरियलची नोंद घेवून सन २०२६-२७ मध्ये निर्माण होणारे स्क्रॅप विक्री करणेबाबत निर्णय घेणे.
विषय नं. १० : कारखान्याच्या गाळप क्षमतेनुसार उसाच्या उपलब्धतेनुसार इतर कारखान्याकडून उस गाळीतास घेणे अथवा देणे बाबत निर्णय घेणे.
विषय नं. ११ : गाळीत हंगाम २०२५-२६ मध्ये गाळपास आलेल्या व हंगाम २०२६-२७ मध्ये गाळपास येणाऱ्या उसाची एफ.आर.पी. नुसार उसबिल देयके व्याज याबाबत उस उत्पादक शेतकऱ्यांशी करण्यात आलेल्या करारानुसार पुर्तता करणेबाबत निर्णय घेणे.
विषय नं. १२ : प्रतिदिन १० मे.टन क्षमतेच्या कॉम्प्रेस्ड बायोगॅस प्रकल्प उभारणी बाबत संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयास मंजुरी देणे.
विषय नं. १३ : सन २०२५-२६ या वर्षाच्या अभिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर राहणेबाबत सभासदांच्या आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.
विषय नं. १४ : मा. अध्यक्षांच्या पूर्व परवानगीने प्रलंबित येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

**विशेष सूचना**

१) सहकारी संस्था, सभासद यांनी अभिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे, कामकाजात भाग घेणे, मतदान करणे, इत्यादिबाबत आपल्या प्रतिनिधीस अधिकार दिल्याबद्दल संस्थेच्या पंचकमिटीच्या ठरावाची खरी नक्कल मा. चेअरमन अथवा मा. व्हाईस चेअरमन आणि सेक्रेटरी यांच्या संयुक्त सही शिक्क्यानिशी दि. १७/०९/२०२६ पर्यंत कारखाना कार्यालयामध्ये मिळेल अशा रितीने पाठवावी.
२) कारखान्याच्या पोटनियम क्रमांक २३ ला अधिन राहून आवश्यक असलेली गणपूर्ती (कोरम) नसल्यास सभेचे कामकाज सात दिवस स्थगित करून पूर्वीच्याच विषयपत्रिकेप्रमाणे सभेचे कामकाज त्याचठिकाणी त्याचवेळी होईल. त्यावेळी सभेस नियमाप्रमाणे गणपूर्तीची (कोरम) आवश्यकता राहणार नाही.
३) मा. सभासदांना कारखान्याच्या कामकाजासंबंधी काही धोरणात्मक प्रश्न विचारावयाचे असल्यास ते प्रश्न दि. १७/०९/२०२६ पर्यंत कारखान्याच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.
४) सभेस येताना ओळखपत्र सोबत आणावे.

स्थळ : गणेश हॉल, श्रीपूर (कारखाना कार्यस्थळ) ता. माळशिरस, जि. सोलापूर
दिनांक : ०६/०९/२०२६

मा. संचालक मंडळाचे आदेशान्वये,
डॉ. यशवंत कुलकर्णी
कार्यकारी संचालक

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर येथील जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- जिल्हा उपजिल्हा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर येथील सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील न्यू पाच्छा पेठ येथील जागा त्यासी टी. पी नं. १ यांसी फा.प्लॉट नं. ३२ पैकी सब प्लॉट नंबर ३६७/अ/३ याचे एकूण क्षेत्र २७८.७ चौ.मी इतके आहे यामध्ये बांधण्यात आलेल्या अनुष्का अपार्टमेंटमधील फेज-१ मधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ५ याचे बिल्टअप क्षेत्र ५६.४२ चौ.मी इतके असून त्यासी चतुःसिमा येणेप्रमाणे -

**पूर्वेस** : टेरेस **पश्चिमेस** : सब प्लॉट नं. ३६७/अ/१
**दक्षिणेस** : सब प्लॉट नं. ३६७/अ/४ **उत्तरेस** : प्लॉट नं. ६

येणेप्रमाणे चतुःसिमेत वर्णन केलेली घरजागा तिचेमध्ये असलेले मिळकत तिचेतील सिमेंट विट मधील बांधकाम नळ कनेक्शनसह व इतर तदंगभूत वस्तूंसह मिळकत ही श्री स्वप्निल जेम्स मोरे व रजनी स्वप्निल मोरे यांचे खरेदी मालकी कब्जे वहिवाटीची आहे. सदरहु मिळकतीची विक्री करण्याचे ठरवून, त्यांनी मिळकत आमचे अशिलांना कायमची खुषखरेदी देण्याचे ठरविले आहे. सदरची मिळकत त्यांचेच मालकी कब्जे वहिवाटीची असून ती निर्वेध निजोखमी बोजारहित असल्याचे आमचे अशिलांना त्यांनी खात्री दिल्याने सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलांनी दि. ०४/०९/२०२६ रोजी नोंदणीकृत साठेखताचा दस्त लिहुन घेतलेला आहे.

तथापी वर नमुद मिळकतीसंबंधी कोणाचेही कसल्याही प्रकारचे म्हणजे साठेखत, खरेदीखत, बक्षीस, दान, हक्कसोडपत्र, पोटगी, गहाण, बोजा, लिज, लिन, हिबा, कब्जा, दावे, कोर्टातील कोणत्याही प्रकारचा वाद वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत खाली नमुद पत्यावर लेखी हरकत व कागदोपत्री पुराव्यानिशी मुदतीत हरकत नोंदवावी. जर का मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग तदनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. आणि त्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली ता. ०५/०९/२०२६

**सही/-**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. प्रविण मु. उत्तरकर**
**ऑ. ६८, दक्षिण कसबा, झुंजे बोळ,**
**लक्ष्मी मार्केटच्या मागे सोलापूर**
**मो. नं. ९८५०६२५२३६**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

**सिलींग जमीन भोगवटदार वर्ग २ वरुन भोगवटदार वर्ग १ करीता जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि. सोलापूर, सब डि. वैराग व तालुका बार्शी पैकी मौजे कासारी येथील शेतजमीन गट नं. १२३/४, क्षेत्र ०२ हे ०० आर याचा आकार ०२ रु. ६० पैसे यांसी चतुःसिमा **पुर्वेस-** हनुमंत जगताप, **दक्षिणेस-** तानाजी माळी, **पश्चिमेस-** कैलास लंगोटे, **उत्तरेस-** हनुमंत जगताप. यापैकी दक्षिण बाजुची ०० हे ८० आर, आकार ०१ हे १० पैसे यांसी चतुःसिमा **पुर्वेस-** हनुमंत जगताप, **दक्षिणेस-** तानाजी माळी, **पश्चिमेस-** कैलास लंगोटे, **उत्तरेस-** सदर गोटापैकी क्षेत्र. येणेप्रमाणे या मिळकतीचे खातेदार श्री महादेव त्र्यंबक पकाळ व श्री केशरा लक्ष्मण हरीहर यांच्या वारसाहक्काने प्राप्त झालेली मिळकत असून सदर मिळकत सामाईक मध्ये असून यापैकी श्री केशरा लक्ष्मण हरीहर यांनी सदरची जमीन भोगवटदार वर्ग २ ची असल्याने सदर जमीनीची भोगवटदार वर्ग २ वरुन भोगवटदार वर्ग १ करीता आमचे अशील श्री नितीन नानासाहेब जगताप यांनी मा. अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर (कुळकायदा शाखा) या कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे.

तरी उक्त नमुद शेतजमिनीबाबत व त्यामध्ये झालेल्या व्यवहाराबाबत किंवा इतर कुठल्याही प्रकारचे व्यवहाराबाबत किंवा उक्त जमिनीबाबत कोणाचीही करार, लिज, भाडेपट्टा, पोटगी हक्क, वारसाहक्क, बोजा, गहाण, दान, लिन, कर्ज, कोर्ट केसेस, मृत्युपत्र, खरेदी विक्री, साठेखत, पतसंस्थेचा बोजा, सावकारी देणे घेणे इ. बाबत काही हरकत / तक्रार / हितसंबंध / अधिकार असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात (७) दिवसांचे आत मा. अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर (कुळकायदा), सात रस्ता, सोलापूर या पत्यावर आपली हरकत नोंदवावी. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झालेस कोणाचीही हरकत नाही असे समजून उक्त शेतजमिनीचा झालेला खरेदी व्यवहार विधीग्राह्य होण्यासाठी पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

ता. ०५/०९/२०२६

**सही/-**
**ॲड रणजित नेताजी गुंड**
**बी.एस.एल.एलएल.एम.**
**मो. ९८६०००७१२३**
**ॲड. राजकुमार शशिकांत गुंड**
**मो. ९४०४२७४५९१**
**खरेदीदार अशिल- श्री नितीन नानासाहेब जगताप**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम विशेषतः डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी नगरपरिषद हद्दीतील व आसपासचे परिसरातील लोकांना या खरेदीपूर्व नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**१) मिळकतीचे वर्णन** :- डि. सोलापूर सब. डि. व ता. बार्शी पैकी बार्शी शहर नगरपरिषद हद्दीतील सर्व्हे नं. ३५९, जुना गट नं. ८६० याचा नविन गट नं. ८६६ मधील प्लॉट नं. ९अ याचे एकुण क्षेत्रफळ १८७.०० चौ.मी., याचे मोजमाप पूर्व-पश्चिम दक्षिण बाजु- मी. १५.७१, पूर्व-पश्चिम उत्तर बाजु- मी. १५.७१ व दक्षिण-उत्तर- मी. १२.२१ आहे, यांसी चतुःसिमा **पूर्वेस-** गट नं. ८६५, **दक्षिणेस-** प्लॉट नं. १०, **पश्चिमेस-** १२.०० मीटर रुंदीचा दक्षिण-उत्तर चालीचा रस्ता व **उत्तरेस-** प्लॉट नं. ९ आहे, याचे वागणुक व पाणी पश्चिम बाजुचे रस्त्यास जाते व आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक वर्णनाचा खुला प्लॉट, आतील सर्व दगड-माती, झाड-झुडपे, वगैरे तदंगभूत वस्तूंसह, मालकी, कब्जे वहिवाटीचे हक्कासह.

**२)** वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत ही श्री. अशोक भिकाजी मोरे, रा. बार्शी, जि. सोलापूर यांची स्वकष्टाजीत खरेदी मालकीची मिळकत असून, मिळकतीचे हक्कपत्रकी व रेकॉर्ड ऑफ राईट्सला त्यांचे नावाची नोंद आहे. वर कलम १ मध्ये नमुद केलेली मिळकत ही श्री. अशोक भिकाजी मोरे यांनी योग्य त्या बाजारभाव किंमतीस आमचे अशिल नामे श्री. अतुल तुकाराम पाडे व श्री. प्रितम हनुमंत मोरे यांना विक्री करण्याचे ठरवून तसा वर नमुद मिळकत विक्रीबाबत उभयतांमध्ये तोंडी करार ठरलेला आहे. सदर मिळकत ही स्वतंत्र मालकी हक्काची व कब्जे, वहिवाटीची निर्वेध, निजोखमी व बिन-बोजाची असल्याची खात्री मिळकत मालकाने आमच्या अशिलांना दिलेली आहे व आमचे अशिलांचीही तशी खात्री झालेली आहे.

३) तरी वर नमुद मिळकतीवर कोणाचा कसलाही हक्क-हितसंबंध असल्यास, सदर मिळकती संदर्भाने कोणी इसार पावती, साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, हितसंबंध, बोजा, बक्षिस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर मिळकतीवर कोणाचा बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०८ दिवसांच्या आत आमच्या अशिलास लेखी स्वरुपात कागदपत्रासह विधीज्ञांचे खालील नमुद पत्यावर हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिन-बोजाची आहे, असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही हरकत आमचे अशिलांचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणुन ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे. दि. ०५/०९/२०२६

**सही/-**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. प्रशांत पांडुरंग एडके**
**कचेरी रोड, न्यायालयाच्या समोर,**
**खेडकर बिल्डींग, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर.**
**मो. नं. ७३८५११०१८४ / ९८२२८१६४७८**

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## ई निविदा प्रकाशनाची सूचना

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी- वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई-निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयाना रक्कम | ई-निविदा विक्रीचा कालावधी | ई-निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई-निविदा क्र ३००००६७९५३ | सप्लाय ऑफ फूल टीथ गियर कपलिंग फॉर कन्व्हेयर्स अॅट सीएचपी-१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ७.७१ लाख ११२१५/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७०८८० | प्रॉक्यूरमेंट ऑफ ब्रेक ब्लॉक असेम्ब्ली (शूज) फॉर एसएएन लोकोमोटीवज अँड अदर कनज्यूमेबल मटेरियल अॅट सीएचपी-१, व्ही/एम , २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ८.७० लाख १२२०१/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१०९४ | सप्लाय ऑफ फॅब्रीकेटेड स्पेयर्स फॉर डस्ट कलेक्टर ड्यूरिंग शॉर्ट शट डाउन ऑफ यू-६अँड ७ अॅट बीएम-१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | १९.८५ लाख २३३५४/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१११९ | प्रॉक्यूरमेंट ऑफ स्विच फ्यूज यूनिट (एसएफयू) अॅट सीएचपी-२-ईएम, टीपीएस,परळी वै. | ७.४७ लाख १०९६७/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१२२१ | प्रॉक्यूरमेंट ऑफ टेम्परेचर सेन्सॉर फॉर कोल मिल अँड एयर प्री-हीटर अॅट आय अँड सी-२, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ११.९५ लाख १५४५७/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१२७८ | वर्क ऑफ प्रोव्हायडिंग असिस्टंट टू डाटा एंट्री इन कम्प्युटर्स अँड अदर रिलेटेड वर्क्स फॉर कोल सेक्शन अॅट एम.एस ‘बी’ , सीएचपी-१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ७.६२ लाख १११२८/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१३३२ | प्रॉक्यूरमेंट ऑफ वॉल्व फॉर फायर हायड्रन्ट अँड स्प्रे सिस्टम नेटवर्क अॅट एफएस, टीपीएस,परळी वै. | ६.०१ लाख ९५२०/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१४२३ | एक्सपर्ट टेक्निकल सर्विसेस फॉर सर्विसिंग ऑफ २४व्हीडीसी छाबी मेक बॅटरी चार्जर्स अॅट ईटी-२, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | २.३४ लाख ५८४६/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१४२५ | एचपीटी, रिफिलिंग अँड पेंटिंग -लेबलिंग ऑफ सीओ२ फायर एक्स्टिंगविशर अॅट एफएस, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ९.९२ लाख १३४२४/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१४६३ | सप्लाय ऑफ इंडस्ट्रियल सेफ्टी शूज फॉर एमएसपीजीसीएल एम्प्लॉईज (O & M , Project & PAP) ऑफ टीपीएस परळी वै. | २५.२९ लाख २८७९४/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१५२८ | बाय अॅन्युअल काँट्रॅक्ट फॉर सॅम्पलिंग अँड अनॅलिसिस फॉर कोल मिल फाइनेस, फ्लाय अॅश, बॉटम अॅश, कोल मिल रिजेक्ट अँड अॅश स्लरी सॅम्प्ल्स फॉर डब्ल्यूटीपी-२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १७.४४ लाख २०९४३/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१५८८ | वर्क ऑफ शिफटिंग टेस्टिंग इन्स्ट्रुमेंटस मटेरियल अँड एचटी, एलटी, व्हीएफडी पॅनल क्लिनिंग अॅज अँड व्हेन रीक्वायर्ड अॅट ईटी-१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | १०.०५ लाख १३५५३/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१७१५ | टू इयर वर्क काँट्रॅक्ट फॉर प्रोव्हायडिंग क्लोज्ड फोर व्हीलर वेहिकल फॉर स्टाफ मूवमेंट फ्रॉम ऑफिस टू खडका / नैकोटा पम्प हाऊस अॅट सीएचपी-व्ही/एम , २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ४४.०० लाख ४७५०७/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१७२२ | वर्क काँट्रॅक्ट फॉर प्रोव्हायडिंग सर्विसेस ऑफ जेसीबी/ पोकोलीन ऑन वॅगण टिपलेर हॉप्पर ग्रिल अॅट सीएचपी-२, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ३६.७१ लाख ४०२१४/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई-निविदा क्र ३००००७१७६८ | वर्क ऑफ सर्विसिंग ऑफ स्पेयर स्लेविंग बेरिंग अँड रिप्लेसमेंट ऑफ स्लेविंग बेरिंग ऑफ स्टॅकर रिक्लेमर ऑफ यू-६ अँड ७ अॅट सीएचपी-१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ८४.१५ लाख ८७६५०/- | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |

वरील तारीखेस ई-निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई-निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे. सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/- (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी-वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in
एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### श्रीनीती चौधरीला एकेरी, दुहेरी गटाचे विजेतेपद

**बंगळुरू :** स्थानिक टेनिसपटू श्रीनीती चौधरीने प्रतिष्ठित 'केएसएलटीए वर्ल्ड टेनिस ज्युनियर जे३० बंगळुरू' टेनिस स्पर्धेत



उत्स्फूर्त खेळाचे प्रदर्शन करीत मुलींच्या एकेरी आणि दुहेरी अशा दोन्ही गटांत विजेतेपद मिळविले. दहावीत शिकणारी श्रीनीती हिने गत आठवड्यात हैदराबादमध्ये 'आयटीएफ जे-६०' विजेतेपद जिंकले होते. १५ वर्षीय श्रीनीतीने एकेरीच्या अंतिम सामन्यात शहरातीलच खेळाडू आहिदा सिंगचा ६-४, ६-२ असा पराभव केला. श्रीनीतीने रिद्धी शिंदेच्या साथीने मुलींच्या दुहेरी गटाचे विजेतेपद मिळवले. तिने रिद्धीच्या साथीने खेळताना जोहा कुरेशी व दीप्ती वेंकटेशन या जोडीचा ४-६, ६-२, १३-११ असा पराभव करून दुहेरी गटाचे विजेतेपदही आपल्या नावे केले. मुलांच्या एकेरी गटात फजल अली मीरने नियांत बद्रीनारायणनचा पराभव करून विजेतेपद जिंकले. चुक्का लक्ष्य वर्धन आणि पार्थिव नल्लागुंडला यांनी मुलांच्या दुहेरी गटाचे विजेतेपद पटकावले. सहाव्या मानांकित फजल अली मीरने अमेरिकेच्या तिसऱ्या मानांकित नियांत बद्रीनारायणनचा ६-४, ४-६, २-० असा पराभव केला. चुक्का व पार्थिवने नितीनभरत के.एस. व अभिवद्य मिश्रा यांचा ६-७ (३), ७-६ (३), १०-४ असा पराभव केला.

### लंडन स्क्वॅश : अनाहतचा उपांत्यपूर्व फेरीत पराभव

**लंडन :** येथे सुरू असलेल्या 'पीएसए गोल्ड' स्क्वॅश स्पर्धेतील महिलांच्या उपांत्यपूर्व फेरीत भारताच्या अनाहत सिंगला जगातील ५ व्या क्रमांकाची खेळाडू मलेशियाच्या शिवसंगरी सुब्रमण्यम हिच्याकडून ४-११, ४-११ असा पराभव पत्करावा लागला. सद्यस्थितीतील जागतिक ज्युनियर विजेती असलेल्या अनाहतचे या स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. उपांत्यपूर्व फेरीत धडक मारण्यापूर्वी अनाहतने जगातील ११ व्या क्रमांकाच्या नेली गिलिसचा पराभव केला होता. जगातील २० व्या क्रमांकाची खेळाडू असलेली अनाहत आता १२ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या 'कतार क्लासिक' स्पर्धेत सहभागी होईल. जपानमध्ये १९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या तयारीचा एक भाग म्हणून ती या स्पर्धेत खेळणार आहे.

### महिला लीग फुटबॉल हंगाम ऑक्टोबरमध्ये

**कोलकाता :** देशातील सर्वोच्च महिला फुटबॉल स्पर्धा असलेल्या भारतीय महिला लीगचा (आयडब्ल्यूएल) नवीन हंगाम पुढील महिन्यात सुरू होईल, असे अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) शनिवारी सांगितले. या लीगमध्ये काही महत्त्वपूर्ण बदल केले जाणार आहेत, असे त्यांनी सांगितले. हंगाम १६ ऑक्टोबर रोजी सुरू होईल, यामध्ये मागील हंगामातील सहा क्लब - ईस्ट बंगाल एफसी, सेथू एफसी, किकस्टार्ट एफसी, नीता एफए, गोकुळम केरळ एफसी आणि गढवाल युनायटेड एफसी - यांच्यासोबत पदोन्नती मिळालेले हॉप्स एफसी आणि जुबा संघ एफसी हे संघ सहभागी होतील. आयडब्ल्यूएल-२ चा गट टप्पा २३ ऑक्टोबर रोजी सुरू होईल, यात २० क्लब प्रत्येकी पाच संघांच्या चार गटांमध्ये विभागले जातील. चार गट विजेते आणि सर्वोत्तम दोन उपविजेते संघ सहा-संघांच्या अंतिम फेरीत प्रवेश करतील, अंतिम फेरी २५ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहे. एआयएफएफ लीग समितीने २०२७-२८ हंगामापासून आयडब्ल्यूएल व आयडब्ल्यूएल-२ या दोन्हींसाठी उच्च किमान प्रशिक्षण परवान्याच्या आवश्यकतांनाही मंजुरी दिली आहे. ■

# देवदत्त, तिलक, वैभव कामगिरी उंचावण्यास उत्सुक



ईशान किशन व तिलक वर्मा

**चेन्नई, ५ सप्टेंबर**

दुलिप करडंक क्रिकेट स्पर्धेत येथे रविवारपासून ईशान किशनच्या नेतृत्वाखालील पूर्व विभाग आणि तिलक वर्माच्या नेतृत्वाखालील दक्षिण विभाग संघादरम्यान अंतिम सामना खेळला जाणार आहे. या सामन्यात वैभव सूर्यवंशी, देवदत्त पडिक्कल व तिलक वर्मा हे खेळाडू लाल चेंडूच्या क्रिकेटमधील आपली अलीकडील चांगली कामगिरी अधिक उंचावण्यास उत्सुक असतील, तर मोहम्मद सिराज आगामी महत्त्वाच्या मालिकांपूर्वी आपली लय पुन्हा मिळविण्याचा प्रयत्न करेल.

साई सुदर्शन दुखापतग्रस्त झाल्यामुळे देवदत्त पडिक्कलला श्रीलंकेविरुद्धच्या अलीकडील कसोटी मालिकेसाठी भारतीय संघात अचानक संधी मिळाली होती आणि त्याने या संधीचा पुरेपूर फायदा घेतला. कर्नाटकच्या या फलंदाजाने दोन कसोटी सामन्यांत दोन शतके झळकावली आणि 'प्लेअर ऑफ द सिरीज'चा पुरस्कारही पटकावला.

आता, दुलीप करंडक अंतिम सामन्यात दक्षिण विभागासाठीही तशीच कामगिरी करण्याची त्याची आशा असेल. यामुळे केवळ २०२३ नंतर संघाला पुन्हा विजेतेपद मिळविण्यास मदत होणार नाही, तर अशा कामगिरीमुळे तिसऱ्या क्रमांकावर दीर्घकाळ खेळण्यासाठी पडिक्कलचा दावाही अधिक बळकट होईल.

राष्ट्रीय संघाच्या लाल चेंडूच्या क्रिकेटच्या योजनांचा विचार करता, सूर्यवंशी व तिलक हे दोघेही सध्या त्यात समाविष्ट नाहीत. परंतु, भारतीय टी-२० संघाचा उपकर्णधार असलेल्या तिलकने बंगळुरूमध्ये उत्तर विभागाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात नाबाद शतक व अर्धशतक झळकावून कसोटी क्रिकेटमध्ये आपली दखल घेतली जावी, यासाठी भक्कम दावेदारी सादर केली.

या कामगिरीमुळे, दक्षिण विभागाचे नेतृत्व करणाऱ्या या डावखुऱ्या फलंदाजाने भारताच्या कसोटी संघाचे प्रतिनिधित्व करण्याची आपली इच्छाही उघडपणे व्यक्त केली.

पूर्व विभागाच्या वैभव सूर्यवंशीने मध्य विभागाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात ९२ व ४० धावांची खेळी केली. यातून त्याने आपल्याकडे विविध पैलू आहेत हे दाखवून दिले. आता, अंतिम सामन्यातही त्याने अशीच प्रभावी कामगिरी केली, तर 'सर्व प्रकारच्या क्रिकेटमध्ये यशस्वी फलंदाज' होण्याच्या सूर्यवंशीच्या प्रवासाला अधिक बळ मिळेल.

दुसरीकडे, दुखापतग्रस्त वेगवान गोलंदाज विद्वथ कावेरप्पाच्या जागी संघात येऊ शकणाऱ्या अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला न्यूझीलंडच्या आगामी दौऱ्यापूर्वी आपला सर्वोत्तम फॉर्म (लय) मिळविणे गरजेचे आहे.

पूर्व विभागाचे नेतृत्व ईशान किशन करणार आहे. पुढील आठवड्यात अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी भारतीय संघात सहभागी होण्यापूर्वी, त्याला या सामन्यातून काही मोलाचा सराव मिळेल अशी अपेक्षा आहे.

**शमी १००वा सामना खेळणार**

पुढील महिन्यात होणाऱ्या न्यूझीलंड दौऱ्यासाठीची तयारी अधिक तीव्र करण्यापूर्वी, के.एल. राहुलही प्रथम श्रेणी क्रिकेटचा आणखी एक सामना खेळण्यास उत्सुक असेल. पूर्व विभागाच्या सक्षम गोलंदाजी आक्रमणात भारताचा अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी, मुकेश कुमार व फिरकीपटू अनुकूल रॉयचा समावेश आहे.

या गटात शमीचे असणे ही एक महत्त्वाची बाब असेल. बंगालचा हा वेगवान गोलंदाज त्याचा १०० वा प्रथम श्रेणी सामना खेळणार आहे. प्रथम श्रेणी, लिस्ट 'ए' आणि टी-२० सामन्यांमध्ये एकूण ९०३ बळी घेणारा शमी सध्या राष्ट्रीय निवडकर्त्यांच्या विचाराधीन नाही. आपल्यामध्ये अजूनही क्रिकेट शिल्लक आहे, याची अनेक प्रसंगी, ३६ वर्षीय शमीने भेदक गोलंदाजी करत निवडकर्त्यांना याची जाणीव करून दिली आहे ◂ (वृत्तसंस्था)



इंडोनेशियाविरुद्ध भारताची विजयी सलामी

# भारताचे इंडोनेशियावर १४-० ने निर्विवाद वर्चस्व

### एएचएफ कनिष्ठ आशिया चषक हॉकी

**मोकी, ५ सप्टेंबर**

चीनमधील मोकी येथे सुरू असलेल्या एएचएफ कनिष्ठ आशिया चषक हॉकी स्पर्धेत पाच वेळच्या विजेत्या भारतीय संघाने अ गटातील आपल्या सलामीच्या सामन्यात इंडोनेशियाचा १४-० असा धुव्वा उडवित आपल्या जेतेपदाच्या बचावासाठी दमदार सुरुवात केली.

कर्णधार अनमोल एक्का, प्रभदीप सिंग व अजित यादवने या शानदार कामगिरीचे नेतृत्व केले; या तिघांनी मिळून १२ गोल केले आणि स्पर्धेवर आपला दबदबा निर्माण केला. प्रभदीप हा दिवसातील सर्वाधिक गोल करणारा खेळाडू ठरला; त्याने पाच गोल करीत 'सामनावीर' हा पुरस्कार मिळवला. कर्णधार अनमोलने चार गोल केले, तर यादवने तीन गोल नोंदविले. हरपाल व आशु मौर्यने उर्वरित दोन गोल केले.

सामना सुरू झाल्यापासूनच भारताचा आक्रमक पवित्रा दिसून आला; त्यांनी वारंवार इंडोनेशियाच्या 'सर्कल'मध्ये प्रवेश केला आणि गोल करण्याच्या संधी निर्माण केल्या. प्रभदीपने पाचव्या मिनिटाला गोल करून भारताला सुरुवातीची आघाडी मिळवून दिली, त्यानंतर आठव्या मिनिटाला हरपालने ही आघाडी दुप्पट केली. भारतीय आक्रमणाचा वेग आणि हालचालींचा सामना करताना इंडोनेशियाच्या संघाची दमछाक झाली.

दुसऱ्या सत्रातही भारतीय आक्रमक फळीने गोल करण्याच्या संधी शोधणे सुरूच ठेवले. १६ व्या मिनिटाला इंडोनेशियाच्या बचाव फळीला 'पेनॉल्टी स्ट्रोक'चा फटका बसला व अनमोलने सामन्यातील आपला पहिला गोल केला. चार मिनिटांनंतर यादवने आणखी एक गोल करीत गोलसंख्या ४-० अशी केली. त्यानंतर प्रभदीपने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेतली; त्याने २६ व्या आणि ३० व्या मिनिटाला गोल करीत आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली आणि मध्यंतरापर्यंत भारताला ६-० अशी भक्कम आघाडी मिळवून दिली. मध्यंतरानंतरही इंडोनेशियाला फारसा दिलासा मिळाला नाही, कारण भारताने चेंडूवरील ताबा आणि मैदानातील वर्चस्व कायम राखले. अनमोलने 'सेट-पीस'च्या वेळी विशेष प्रभावी कामगिरी केली; त्याने ३५ व्या आणि ४२ व्या मिनिटाला 'पेनॉल्टी कॉर्नर'चे गोलमध्ये रूपांतर करून आपल्या खात्यात आणखी दोन गोल जमा केले. तिसरे सत्र संपण्यापूर्वी प्रभदीपने पुन्हा एकदा गोल केला, त्यामुळे गोलसंख्या ९-० अशी झाली. सामन्याचे शेवटचे सत्र सर्वात फलदायी ठरले, कारण भारताने या काळात आणखी पाच गोल केले. अनमोलने ५१ व्या मिनिटाला आपला चौथा गोल पूर्ण केला, तर त्यानंतरच्याच मिनिटाला प्रभदीपने आणखी एक गोल करत सामन्यातील आपला पाचवा गोल नोंदवला.

त्यानंतर यादवने ५३ व्या मिनिटाला दोन गोल करत शानदाररीत्या आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली आणि भारताची आघाडी १३-० अशी वाढवली. ५९ व्या मिनिटाला मौर्यने पेनॉल्टी कॉर्नरवर गोल करत संघाच्या गोलची संख्या १४ वर नेली आणि १४-० असा दणदणीत विजय साकारला. ◂ (वृत्तसंस्था)

# महिला हॉकी संघाची विजयी सलामी

**मोकी, ५ सप्टेंबर**

चीनमधील मोकी येथे शनिवारपासून सुरू झालेल्या कनिष्ठ महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारतीय महिला संघाने दक्षिण कोरियाचा ४-१ असा पराभव करून आपल्या विजेतेपदाच्या बचावाची दमदार सुरुवात केली.

महिला कनिष्ठ आशिया चषकाच्या गत दोन आवृत्त्या जिंकणाऱ्या भारतीय संघाने दक्षिण कोरियाविरुद्ध संयमी आणि वर्चस्वपूर्ण खेळ केला. या सामन्यात सानिका चंद्रकांत माने, पूर्णिमा यादव, पूजा साहू आणि मधू सिदारने गोल नोंदविले.

भारताने सामन्याची सुरुवात आक्रमक इराद्याने केली आणि पहिल्या सत्रात अनेक संधी निर्माण केल्या. त्यांच्या या प्रयत्नांना आठव्या मिनिटाला यश आले; सानिकाने गोल करत भारताला १-० अशी सुरुवातीची आघाडी मिळवून दिली. भारतीय संघाने दक्षिण कोरियाच्या बचावफळीवर दबाव कायम ठेवला आणि पहिल्या सत्रात दोन पेनॉल्टी कॉर्नर्स मिळविले, परंतु त्यांना यापैकी एकाही संधीचे गोलमध्ये रूपांतर करता आले नाही.



दक्षिण कोरियाविरुद्ध खेळताना भारतीय कनिष्ठ महिला हॉकीपटू

दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीलाही भारताने आपली आक्रमक शैली कायम ठेवली आणि पहिल्या पाच मिनिटांतच आणखी एक पेनॉल्टी कॉर्नर मिळविला. पहिल्या प्रयत्नानंतर त्यांना पुन्हा पेनॉल्टी कॉर्नर मिळाला, तरीही भारताला गोल करण्यात यश आले नाही.

दक्षिण कोरियाने अधिक दबाव निर्माण करत प्रत्युत्तर दिले आणि बरोबरी साधण्याच्या प्रयत्नात पाच मिनिटांच्या कालावधीत सलग दोन पेनॉल्टी कॉर्नर्स मिळविले. मात्र, भारतीय बचावफळीने खंबीर कामगिरी करत कोरियन संघाचे आक्रमण यशस्वीपणे रोखून धरले. त्यानंतर भारताने पुन्हा सामन्यावर नियंत्रण मिळविले आणि दुसऱ्या सत्राच्या अगदी शेवटच्या क्षणांत आणखी एक पेनॉल्टी कॉर्नर मिळविला. ◂ (वृत्तसंस्था)

### चीनच्या झू वेन जिंगकडून अनमोल खरबचा पराभव

**पोंटियानाक :** पश्चिम कालीमंतन येथील पोंटियानाक येथे झालेल्या इंडोनेशिया मास्टर्स २०२६ बॅडमिंटन स्पर्धेच्या महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत तिसऱ्या मानांकित अनमोल खरबचा चीनच्या ८१ व्या विश्वमानांकित झू वेन जिंगकडून २१-१६, २१-१९ असा पराभव झाला. ■

# पाकिस्तान महिला संघ ५५ धावांत गारद

### श्री चरणी, प्रेमाचे प्रत्येकी ३ बळी

### भारतासमोर ५६ धावांचे सोपे लक्ष्य

**दुबई, ५ सप्टेंबर**

येथे सुरू असलेल्या महिलांच्या आशिया चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत क्रिकेटप्रेमींचे लक्ष वेधणाऱ्या साखळी सामन्यात श्री चरणी व प्रेमा रावतच्या जबरदस्त फिरकीच्या बळावर भारतीय महिला संघाने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानच्या संपूर्ण संघाला १८.१ षटकांत अवघ्या ५५ धावांत गुंडाळले. त्यामुळे आधीच उपांत्य फेरी गाठणाऱ्या भारतासमोर आता विजयासाठी ५६ धावांचे सोपे लक्ष्य राहिले.

पाकिस्तान संघाची कर्णधार फातिमा सनाने नाणेफेक जिंकून भारताविरुद्ध प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु त्यांचा संघ भारतीय गोलंदाजांसमोर फार वेळ टिकाव धरू शकला नाही. भारताकडून श्री चरणी व प्रेमा रावतने प्रत्येकी ३ बळी, दीप्ती शर्माने २ बळी व शेफाली वर्माने एक बळी टिपला.



मुनीबा अली व शावल झुल्फीकारने २७ धावांची सलामी भागीदारी केली असताना पाकिस्तानला पहिला धक्का बसला. शेफाली वर्माने मुनिबा अलीचा (१३) त्रिफळा उडविला. त्यानंतर भारताची डावखुरी फिरकी गोलंदाज श्री चरणीने बळी टिपण्याचा सपाटाच लावला. श्री चरणीने गुल फिरोझा (०) हिला आल्यापावली परत पाठविले व त्यानंतर शावर झुल्फीकारला (१४) पायचित केले. त्यानंतर आयेशा जाफरला हरमनप्रीत कौरकडून झेलबाद करून श्री चरणीने हॅट ट्रिक साजरी केली. नंतर फिरकी गोलंदाज प्रेमा रावतने सदाफ शमासचा (०) त्रिफळा उडविला, याबरोबरच पाकिस्तानने ९ षटकांत ३५ धावांत निम्मा संघ गमावला. नंतर कर्णधार फातिमा सनाकडून (०) मोठ्या खेळीची अपेक्षा होती, परंतु तिला दीप्ती शर्माने आपल्या फिरकीच्या जाळ्यात अडकविले. पाकिस्तानचे खेळाडू दबावाखाली आले आणि अशातच एमान फातिमा (५) झटपट धाव काढण्याच्या नादात धावबाद झाली. पुढे प्रेमा रावतने उम्म-ए-हनीच्या (६) रुपाने आपला दुसरा बळी मिळविला. त्यामुळे पाकिस्तानची १४.४ षटकांत ८ बाद ४८ धावा अशी अवस्था झाली. तुबा हसन व नशरा संधू धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न करीत असताना प्रेमा रावतने नशराला (०) घोषकडून झेलबाद केले. तुबा हसन (९) व सादिया इक्बाल (०) शर्थीचे प्रयत्न केले. ◂ (वृत्तसंस्था)

**चायना मास्टर्स बॅडमिंटन**

# सात्त्विक-चिराग तिसऱ्यांदा अंतिम फेरीत

शेन्झेन, ५ सप्टेंबर

भारताची अव्वल मानांकित पुरुष दुहेरी जोडी सात्त्विकसाईराज रन्कीरेड्डी व चिराग शेट्टीने शनिवारी शेन्झेन एरिना येथे मलेशियाच्या नूर मोहम्मद अझरिन आणि टॅन वी किओंग या जोडीचा २१-१६, १८-२१, २१-११ असा पराभव करून 'चायना मास्टर्स' बॅडमिंटनच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

या विजयासह, 'स्मॅश ब्रदर्स' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भारतीय जोडीने २०२३ पासूनच्या चार वर्षांच्या कालावधीत या स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारण्याची तिसरी वेळ साधली. अंतिम सामन्यात त्यांचा सामना मलेशियाचे टी काई वुन/याप रॉय किंग आणि चीनचे हे जी टिंग/रेन शियांग यू यांच्यातील सामन्यातील विजेत्याशी होईल.

उपांत्य सामन्याच्या सुरुवातीला सात्त्विक-चिरागला ०-५ अशी पिछाडी सहन करावी लागली, तरीही त्यांनी सलग सात गुण मिळवून (७-५) आपला लय परत मिळविला. त्यानंतर त्यांनी ही आघाडी कायम राखत पहिला गेम २१-१६ असा जिंकला. मात्र, मलेशियाच्या जोडीने दुसरा गेम १८-२१ असा जिंकून सामना निर्णायक गेमपर्यंत नेला. ◂ (वृत्तसंस्था)



### इंडियन सुपर लीग फुटबॉल १० ऑक्टोबरपासून

**नवी दिल्ली :** इंडियन सुपर लीग (आयएसएल) २०२६-२७ हंगाम १० ऑक्टोबरपासून सुरू होणार असून पुढील वर्षी मे महिन्यापर्यंत चालणार आहे. क्लब-नेतृत्वाखालील नवीन रचनेअंतर्गत ही स्पर्धा पुन्हा एकदा पारंपरिक 'होम-अँड-अवे' (आपल्या मैदानावर आणि प्रतिस्पर्ध्याच्या मैदानावर) स्वरूपात खेळविली जाईल. आगामी हंगामात आठ महिन्यांच्या कालावधीत एकूण १६३ सामने खेळविले जातील. ■

# तीन स्पर्धा प्रकारांत भाग घेणे आव्हानात्मक : पारुल चौधरी

**बंगळुरू, ५ सप्टेंबर**

तीन स्पर्धा प्रकारांत भाग घेणे आव्हानात्मक असेल, पण मी दडपण घेत नाही. मला माझ्या प्रशिक्षणावर विश्वास आहे, असे पारुल चौधरी म्हणाली. पारुलने चीनमधील हॅण्गझोऊ येथे झालेल्या गत आशियाई स्पर्धेत ३००० मीटर स्टीपलचेस व ५००० मीटर शर्यतीत अशी दोन सुवर्णपदके जिंकली होती, यंदा जपानमध्ये होणाऱ्या आशियाई स्पर्धेत ती या दोन प्रकारांशिवाय १५०० मीटर प्रकारातही सहभागी होणार आहे.




तीन स्पर्धा प्रकारांत भाग घेणे कठीण आहे. पण मी त्यानुसारच सराव करत आहे. मला सलग तीन दिवस स्पर्धा करावी लागणार आहे. त्यामुळे, मला त्यानुसारच प्रशिक्षण घ्यावे लागेल. स्पर्धांच्या यादीत १५०० मीटर शर्यतीचा समावेश झाल्यामुळे तिच्यावर कोणताही अतिरिक्त ताण आलेला नाही, पण मी अजिबात दडपण घेत नाही, कारण मी फक्त माझी सर्वोत्तम कामगिरी करण्यावर लक्ष केंद्रित करते. मला पदक नक्कीच मिळेल, असा विश्वास ३१ वर्षीय पारूलने व्यक्त केला. चांगली कामगिरी करण्याबाबत मी आत्मविश्वासी आहे. मी गेल्या वेळी सुवर्णपदके जिंकली होती आणि ती पदके पुन्हा जिंकायची आहेत, असे ती म्हणाली. ◂ (वृत्तसंस्था)

# हव्याप्रमंच्या जिम्नॅस्टची सुवर्णमय कामगिरी

**अमरावती, ५ सप्टेंबर**

हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या अमरावती जिल्हा हौशी जिम्नॅस्टिक संघटनेच्या प्रशिक्षण केंद्रावर नियमित सराव करणाऱ्या जिम्नॅस्टिक खेळाडूंनी नुकत्याच चामूनंडीविहार, इनडोर स्टेडियम नजरबाद म्हैसूर, कर्नाटक येथे भारतीय जिम्नॅस्टिक्स महासंघद्वारा आयोजित राष्ट्रीय अक्रोबॅटिक्स जिम्नॅस्टिक, प्रीयुथ, युथ ज्युनिअर, सिनिअर जिम्नॅस्टिक अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले.

वरिष्ठ महिला ट्रायोमध्ये भाग्यश्री कलाने, धनश्री रामावत, नव्या पांडेने डायनॅमिक इव्हेंटमध्ये पश्चिम बंगाल, केरळ, कर्नाटक, गुजरात संघातील प्रतिस्पर्धी खेळाडूंवर मात करीत विजयश्री संपादित केली व सुवर्णपदकाचा मान मिळविला. राष्ट्रीय स्पर्धेत निवड झालेल्या सर्व खेळाडूंना मंडळाचे जिम्नॅस्टिक विभागाचे प्रमुख प्रा. आशिष हटेकर, एनआयएस प्रशिक्षक अक्षय अवघाते, सचिन कोठारे, हेमा राजवैद्य, डॉ. नीलेश जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.




मंडळाच्या विजेत्या जिम्नॅस्टिकपटू आपल्या प्रशिक्षकासोबत

स्पर्धेमध्ये यशस्वी झालेल्या सर्व खेळाडूंचे मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य यांनी अभिनंदन केले. मंडळाचे कार्याध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, अमरावती जिल्हा हौशी जिम्नॅस्टिक संघटनेच्या सचिव व महाराष्ट हौशी जिम्नॅस्टिक संघटनेच्या उपाध्यक्ष प्रा. डॉ. माधुरी चेंडके, अमरावती जिल्हा जिम्नॅस्टिक संघटनेचे अध्यक्ष प्रा. रवींद्र खांडेकर, उपाध्यक्ष डॉ. विकास कोळेश्वर, कोषाध्यक्ष प्रा. राजेश पांडे, मंडळाचे प्राचार्य डॉ. एस. पी. देशपांडे, प्रा. दीपा कान्हेगावकर, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, विभागीय उपसंचालक अविनाश पुंड, महाराष्ट्र हौशी जिम्नॅस्टिक संघटनेचे अध्यक्ष संजय शेटे, सचिव डॉ. मकरंद जोशी आदींनी खेळाडूंचे अभिनंदन केले. ◂ (तभा वृत्तसेवा)

# तोच जोश आहे, तशीच कामगिरी पुन्हा करेन

### स्टीपलचेस खेळाडू अविनाश साबळेचा विश्वास

**बंगळुरू, ५ सप्टेंबर**

मी २०२२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी झालो होतो. माझा जुना फिटनेस आता परत आला आहे. या २०२६, जपान आशियाई क्रीडा स्पर्धेत मी तीच कामगिरी पुन्हा करून दाखवू शकतो, असा विश्वास स्टीपलचेसपटू अविनाश साबळे याने व्यक्त केला.

२०२२२ हॅण्गझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत साबळेने पुरुषांच्या ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये सुवर्णपदक जिंकले होते. मात्र जुलै २०२५ पासून साबळे व आशियाई स्पर्धेतील सुवर्णपदक पुन्हा जिंकण्याचे त्याचे स्वप्न हे जणू दोन वेगळ्या वाटांवर होते. २०२५ मधील मोनॅको डायमंड लीगदरम्यान साबळेला दुखापत झाली होती. एसीएल व मेनिस्कस यांमधील दुखापतीवर शस्त्रक्रिया झाल्यानंतरची नाजूक शारीरिक स्थिती हा त्याच्या पुनर्मिलनातील सर्वात मोठा अडथळा ठरला; त्यामुळे त्याला अलीकडील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतूनही माघार घ्यावी लागली होती.

त्याऐवजी, त्याने उटी येथील उंचावरील प्रशिक्षण केंद्रात सराव केला, त्यानंतर कर्नाटकच्या बेल्लारी येथील 'इन्स्पायर इन्स्टिट्यूट ऑफ स्पोर्ट'मध्ये गेला व शेवटी भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) येथील 'सदर्न सेंटर'मध्ये 'स्मार्ट ट्रॅक'वर सराव केला. सुमारे आठ महिन्यांच्या या कठोर सरावाचा परिणाम म्हणून साबळेच्या मनात हा विश्वास निर्माण झाला आहे.




आशियाई क्रीडा स्पर्धेतील माझ्या प्रकारासाठी आता २४ दिवस उरले आहेत. माझी तयारी खूप चांगली झाली आहे. त्या दुखापतीनंतर माझ्या तयारीच्या काळात अनेक चढ-उतार आले. त्यानंतर मी सातत्याने सराव केला आहे आणि ती एक चांगली तयारी ठरली आहे. माझा जुना फिटनेस परत आला आहे, त्यामुळे आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेत मी पुन्हा चांगली कामगिरी करेन, असा विश्वास साबळेने व्यक्त केला.

परंतु, त्या गंभीर दुखापतीतून सावरल्यानंतर साबळे केवळ एकाच स्पर्धेत सहभागी झाला आहे - ती म्हणजे बेल्जियममधील ओर्डेगेम येथे झालेली 'आयएफएएम' आउटडोअर वर्ल्ड ॲथलेटिक्स कॉन्टिनेंटल टूर आहे. आता, अविनाश साबळे १० सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथे होणाऱ्या 'इंडियन ॲथ्लेटिक्स सीरिज फायनल'ची वाट पाहत आहेत. ◂ (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...




## मातोश्री ईश्वरम्मा विद्यालयात शिक्षक दिन साजरा

**पंढरपूर,दि.५ सप्टेंबर-**

दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती ५ सप्टेंबर शिक्षक दिन श्री. रुक्मिणी विद्यापीठ संचालित मातोश्री ईश्वराम्मा विद्यालय व ज्युनियर कॉलेज पंढरपूर येथे उत्साहात साजरी झाली. डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस संस्था सचिव सुनेत्रा पवार यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थ्यांनी केले होते. विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका पार पाडत शाळेचे संपूर्ण कामकाज दिवसभर सांभाळले. डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनावर भाषणे केली. शिक्षकांचे पुष्पगुच्छ व स्वतः बनवलेली कार्ड पेपरची फुले व पेढे देऊन स्वागत केले. सुनेत्रा पवार यांनी पर्यावरण पूरक फुले व बॅचेस बनवलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमासाठी पालक वर्गाबरोबर सुप्रिया मोटे, माधुरी बोडके, इरफान शेख, विद्यार्थी मुख्याध्यापिका वैष्णवी राऊत यांचे सह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन अर्पिता चव्हाण यांनी तर आभार साक्षी थोरात यांनी मानले.कार्यक्रमासाठी स्वाती कोळेकर, राजश्री खोत, उमा पाटील, समृद्धी उन्हाळे, संध्या फराटे आदींनी परिश्रम घेतले.




## माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानतर्फे महिलांची आरोग्य तपासणी

**सांगोला, दि. ५ सप्टेंबर-**

माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला या संस्थेच्या आरोग्य विभागाच्या वतीने महिलांना वयाच्या पस्तीशीनंतर अनेक आरोग्यविषयक तक्रारींना सामोरे जावे लागते हे लक्षात घेवून व्हिटामिन डी-३, बी १२ व कॅल्शियम तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. शिबिरासाठी सोलापूर येथील श्री साई डायग्नोस्टिक लॅबोरेटरीचे डॉ.शैलेश पटणे व त्यांचे सहकारी उपस्थित होते. एकूण ५१ महिलांनी या शिबिराचा लाभ घेतला. महिलांनी आपल्या आरोग्याकडे नियमितपणे लक्ष द्यावे असे आरोग्य विभाग प्रमुख डॉ. सुपर्णा केळकर यांनी सांगितले. याप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा निलिमा कुलकर्णी, सचिव वसुंधरा कुलकर्णी, कोषाध्यक्ष डॉ.शालिनी कुलकर्णी, ॲड.राजेश्वरी केदार उपस्थित होत्या. शिबिरासाठी डॉ.केतकी देशपांडे, अश्विनी कुलकर्णी, संपदा दौंडे यांचे सहकार्य लाभले.



## एस.व्ही.एस कॉलेज ऑफ फार्मसीत तीन दिवसीय चर्चासत्र उत्साहात

**टेंभुर्णी, दि. ५ सप्टेंबर -**

येथील एस.व्ही.एस कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च येथे तीन दिवसीय स्पर्धा परीक्षा व संशोधनास चालना देणारे चर्चासत्र पार पडले. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. विजयकुमार चकोते, मोहनराव, सचिन जाधव, डॉ.महेश बुरांडे, डॉ.समीर बुरांडे, डॉ. रवींद्र जोशी, डॉ.सतीश केळकर इत्यादी तज्ञ या चर्चासत्रात सहभाग झाले. फार्मसीच्या प्रथम वर्षापासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी. संशोधनास रुची असणाऱ्या विद्यार्थ्यांनी संशोधनात कोणत्या बाबीकडे विशेष लक्ष द्यावे, अन्न व औषध प्रशासनामध्ये फार्मसीच्या विद्यार्थ्यांनी करिअर कसे करावे आदींबाबत तीन दिवस मार्गदर्शन करण्यात आले. चर्चासत्रासाठी माजी आमदार संजय शिंदे, संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र ठोंबरे, प्राचार्य कृष्णात ढेकळे, डॉ.नेहा काजळे. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन सेलचे समन्वयक प्रा. देवळेकर, प्रा.सुरज खरात, ट्रेनिंग आणि प्लेसमेंट ऑफिसर प्रा.सचिन नवले, एस व्ही एस अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य नागेश ठोंबरे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### शरणाप्पा रेशमे



**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

कल्याणनगर येथील शरणप्पा रेशमे (वय ७९) यांचे गुरुवार दि. ३ सप्टेंबर रोज आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर होटगी येथे शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक भाऊ, एक बहीण, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### यल्लप्पा सोनवणे



**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

अंत्रोळीकरनगर भाग एकमधील यल्लप्पा सोनवणे (पिलीवकर, वय ८७) यांचे ४ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यांच्यामागे चार मुले, एक मुलगी असा परिवार आहे. डॉ. सुशीलकुमार सोनवणे यांचे ते वडील होत. त्यांच्या पार्थिवावर रविवारी सकाळी १० वाजता रुपाभवानी स्मशानभमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# श्रीकृष्ण जन्माने मध्यरात्री आशेची पहाट

## जिल्ह्यात जन्माष्टमीनिमित्त उल्हास, भक्तिभावाचे वातावरण

### मोडनिंबमधील यमाई देवी मंदिरात कृष्ण जन्माष्टमी सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ५ सप्टेंबर -**

मोडनिंब (ता. माढा) येथील श्री यमाई देवी मंदिरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व कीर्तन महोत्सवाची शनिवारी दिंडी प्रदक्षिणा व काल्याच्या कीर्तनाने सांगता झाली.

सप्ताहात विविध कीर्तनकारांची कीर्तने झाली. तसेच काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ, हरिजागर आदी धार्मिक कार्यक्रम रोज झाले. सांगतेनिमित्त सकाळी आठ वाजता दिंडी प्रदक्षिणा काढण्यात आली. त्यानंतर ह.भ.प. जयदीप महाराज सावंत यांचे काल्याचे कीर्तन झाले. अंबादास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची परंपरा दीडशे वर्षांपासून सुरू आहे.



सप्ताहानिमित्त मंदिर परिसराची स्वच्छता केली होती. फुलांची आकर्षक आरास व विद्युत रोषणाई केल्याने मंदिर परिसर भक्तिमय झाला होता. कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली.

आयोजनासाठी खंदारे नाना, नानासाहेब सुर्वे, शितल सुर्वे, राजू महामुनी, उल्हास काळे, दिगंबर सुर्वे, विजयनाथ पवार, शितल महाडीक यांच्यासह यमाई ट्रस्ट व जय भवानी चौक मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

कृष्ण जन्माचा सोहळ्यानंतर रात्री यमाई मंदिर परिसरात फुलांची उधळण, फटाक्यांची आतषबाजी केली. भाविकांनी श्री कृष्णाचा जयघोष करत आनंद साजरा केला. यावेळी मसाला दूध वाटप करण्यात आले.

### श्रीकृष्णासारखे दैवी गुण आत्मसात करा

#### ब्रह्माकुमारी निशा यांचे गोकुळाष्टमीनिमित्त मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ सप्टेंबर -**

श्रीकृष्ण हे दैवी गुणांनी संपन्न असे व्यक्तीमत्व होते. त्यांच्या दैवी गुणांचा अंगिकार करा, असे प्रतिपादन ब्रह्माकुमारी निशा यांनी केले.

येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या सेवाकेंद्रावर आयोजित गोकुळाष्टमी कार्यक्रमात त्या मार्गदर्शन करीत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बार्शी सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी संगीता होत्या.

ब्रह्माकुमारी संगीता यांनी श्रीकृष्णांच्या रासलीलेत सहभागी होण्यासाठी जीवनात परस्परांमध्ये विचार, स्वभाव व संस्कारांच्या



मिलनाची रास करणे आवश्यक असल्याचे सांगितले. पाचवीतील बालिका अद्विका बारंगुळे व आराध्या जगदाळे यांनी गोपिकांच्या वेशभूषेत, तर चौथीतील बालक लेखराज शिंदे याने श्रीकृष्णाच्या वेशभूषेत सहभाग घेतला. त्यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या गीतावर नृत्य सादर केले. दोन वर्षांच गुंजन मोरे हिनेही उत्स्फूर्तपणे नृत्य करून लक्ष वेधून घेतले. समारोपानंतर उपस्थितांनी श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या गीतावर रासलीलेचा आनंद घेतला.

## गणेशोत्सवात डीजे, डॉल्बी व लेझर लाईटला सक्त मनाई

### विजय कबाडे; अक्कलकोटमध्ये पोलिसांकडून मंडळांना सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ५ सप्टेबर**

आगामी श्री गणेशोत्सव-२०२६ शांततेत साजरा व्हावा, यासाठी विभागीय पोलीस अधिकारी अक्कलकोट विभाग यांच्यावतीने अक्कलकोट येथे गणेश मंडळांचे पदाधिकारी व शांतता कमिटीच्या सदस्यांची बैठक झाली. बैठकीत अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांनी गणेशोत्सवात डीजे, डॉल्बी व लेझर लाईटला सक्त मनाई असल्याचे सांगितले.

याप्रसंगी श्री वटवृक्ष स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, दुधनी नगराध्यक्ष प्रथमेश म्हेत्रे, मैंदर्गीचे बाजारमठ, नन्ना, तहसिलदार विनायक मगर, अक्कलकोट विभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र टाकणे, पो.नि. अविनाश पवार, पो.नि. विनोद घुगे, वळसंग पोलिस स्टेशनचे पो.नि. राहुल डोंगरे, अक्कलकोट नगरपरिषद, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरणचे अधिकारी, शांतता कमिटीचे सदस्य आणि विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

दिलीप सिध्दे, अशपाक बळोरगी, अविनाश मडीखांबे, संजय देशमुख, अल्ताफ पटेल, चंद्रशेखर मडीखांबे आदींनी मनोगत व्यक्त केले. नगरसेवक महेश हिंडोळे, यशवंत धोंगडे, सद्दाम शेरीकर, तम्मा शेळके गणेश मंडळ कार्यकर्ते उपस्थित होते

## खांडवीत बंदुकीचा धाक दाखवून दरोडा

### गोळीबारात पती गंभीर जखमी; ३.९० लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ सप्टेंबर -**

तालुक्यातील खांडवी शिवारात गुरुवारी मध्यरात्री एका दांपत्याला अडवून चार दरोडेखोरांनी बंदुकीचा धाक दाखवत आणि गोळीबार करुन तब्बल ३ लाख ९० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लुटले. गोळीबारात पती गंभीर जखमी झाला आहे. याप्रकरणी बार्शी तालुका पोलिस ठाण्यात चारजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

माळहिवरा (जि. हिंगोली) येथील रहिवासी मंदा लोंढे (वय ३३) आणि त्यांचे पती रामकिसन हे प्रवासात असताना रात्री २.२० वाजण्याच्या सुमारास खांडवी गावच्या शिवारात चालकाला झोप आल्याने त्यांनी आपली गाडी रस्त्याच्या बाजूला उभी केली होती. त्याचवेळी पाठीमागून आलेल्या चौघांनी त यांच्या गाडीजवळ येऊन रामकिसन यांच्या डोक्याला बंदूक लावली. दरोडेखोरांनी शिवीगाळ करत मंदा लोंढे यांच्या गालात मारहाण केली. त्यांच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने हिसकावून घेतले. तसेच, प्रतिकार करत असताना दरोडेखोरांनी रामकिसन लोंढे यांच्यावर बंदुकीतून गोळी झाडली. गोळी त्यांच्या उजव्या हाताला आणि पोटात लागल्याने ते गंभीर जखमी झाले.

घटनेत दरोडेखोरांनी १ लाख २० हजार रुपयांचे दीड तोळ्याचे मिनी गंठण, पतीच्या गळ्यातील २ लाख ४० हजार रुपयांची तीन तोळ्याची सोन्याची साखळी व ३० हजार रुपयांचा अन्य दागिना असा एकूण ३ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने चोरुन नेला. याबाबत पोलिस तपास करीत आहेत.

## किरण झरकर यांना राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान

### छत्रपती संभाजीनगर विभागातील आयटीआय क्षेत्राला प्रथमच राष्ट्रीय सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ५ सप्टेंबर**

भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिवचे शिल्पनिदेशक डॉ. किरण झरकर यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी नवी दिल्ली येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते त्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

शिक्षण मंत्री प्रल्हाद जोशी, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री जयंत चौधरी, शिक्षण राज्यमंत्री सुकांत मजूमदार तसेच शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण पूर्ण करून १७



वर्षांच्या सेवेत विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या किरण झरकर यांच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली. आयटीआय प्रशिक्षणार्थ्यांच्या शैक्षणिक व आर्थिक प्रश्नांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना विद्यावेतन मिळावे यासाठी त्यांनी व्यापक जनसमर्थन उभे केले. तब्बल २५० ग्रामपंचायतींचे ठराव आणि १० हजार नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांद्वारे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले.

'व्यवसाय प्रशिक्षण परियोजना'च्या माध्यमातून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या कार्याची दखल घेत विधानसभा आणि विधानपरिषदेत प्रश्न उपस्थित झाले. या कार्यात आमदार संजय केनेकर आणि आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांचे सहकार्य लाभले.

झरकर यांच्या कार्यातील महत्त्वाचा उपक्रम म्हणजे 'स्किलबुक' ही संगणक प्रणाली. हा प्रकल्प साकारण्यासाठी त्यांच्या पत्नी स्मिता झरकर यांनी स्वतःचे दागिने विकून निधी उभा केला. पुढे ज्येष्ठ समाजसेवक रमेश अण्णा मुळे यांनी मदतीचा हात पुढे केला.

नवी दिल्ली येथे शंकराचार्य स्वामी निश्चलानंद सरस्वती यांच्या हस्ते या संगणक प्रणालीचे लोकार्पण झाले. ते 'वंदे मातृशक्ती' या पुस्तकाचे लेखक आहेत. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर, सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती ज्ञानसुधा मिश्रा आणि खासदार बासुरी स्वराज यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन झाले. ते स्वातंत्र्यसेनानी देविदास झरकर यांचे नातू आहेत.

## जमीन खरेदीच्या बहाण्याने पाच लाखांची फसवणूक

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ५ सप्टेंबर**

जमीन खरेदी करुन देतो, असे सांगून ॲडव्हान्स म्हणून ५ लाख रुपये उकळून, जमीन दुसऱ्याच व्यक्तीला विकून फसवणूक केल्याचा प्रकार बार्शी शहरात उघडकीस आला आहे.

याप्रकरणी राजन दिगंबर देशमुख आणि जुनी गल्ली, बार्शी येथील एका सहकाऱ्याविरुद्ध बार्शी शहर पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. बार्शी येथील रहिवासी राजाभाऊ काळे (वय ५३) यांनी याप्रकरणी तक्रार दिली आहे. काळे यांच्या खांडवी शिवारातील जमिनीशेजारील गटातील ०.९६ आर जमिनीचा व्यवहार १ कोटी ६३ लाख २० हजार रुपयांना ठरला होता. व्यवहारासाठी संशयित राजन देशमुख याने खरेदीसाठी इसार रक्कम म्हणून २ लाख रुपये घेतले होते.

वेळोवेळी त्यानंतर बँकेचा बोजा कमी करणे आणि खरेदीखत करुन देण्याच्या बहाण्याने संशयितांनी तक्रारदाराकडून धनादेश व रोख स्वरुपात एकूण ५ लाख रुपये उकळले. मात्र, ठरल्याप्रमाणे जमीन खरेदी करुन न देता किंवा घेतलेले पैसे परत न करता, ती जमीन इतर तिसऱ्याच व्यक्तीला विकून तक्रारदाराची आर्थिक फसवणूक केली.

## पगार आणि पेन्शन विद्यार्थ्यांसाठी खर्च करणारे कर्मयोगी सि. ना. आलूरे गुरुजी


**महाराष्ट्राच्या शैक्षणिक इतिहासात काही शिक्षक फक्त शिकवत नाहीत, तर पिढ्या घडवतात. धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील अणदूर गावचे आदरणीय सिद्रामप्पा नागप्पा आलूरे गुरुजी ऊर्फ सर्वांचे लाडके बाबा हे त्यापैकीच एक नाव आहे. ज्यांनी आपल्या आयुष्याची ६० वर्षे फक्त आणि फक्त शिक्षणासाठी वाहिली. स्वतःचा पगार, स्वतःची आमदारकीची पेन्शन, स्वतःचे घर, सगळं काही विद्यार्थ्यांसाठी खर्च करणारे आदरणीय आलूरे गुरुजी आजही लाखो विद्यार्थ्यांच्या हृदयात जिवंत आहे.**

------------------------------

आदरणीय आलूरे गुरुजींचा जन्म ६ सप्टेंबर १९३२ रोजी झाला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यात त्यांनी शिक्षक म्हणून पहिली नोकरी सुरू केली. काही वर्षांनी ते आपल्या गावी अणदूरला परत आले आणि जवाहर विद्यालयात शिक्षक म्हणून रुजू झाले.या शाळेशी त्यांनी इतकी नाळ जोडली की, विद्यार्थी ते शिक्षक आणि शिक्षक ते मुख्याध्यापक हा प्रवास त्यांनी याच शाळेत पूर्ण केला आणि १९९० साली याच जवाहर विद्यालयातून ते मुख्याध्यापक म्हणून निवृत्त झाले.

२५% पगाराचा संकल्प -कर्मयोगाची सुरुवात

गुरुजींच्या जीवनातील सर्वात मोठा आणि प्रेरणादायी निर्णय म्हणजे त्यांचा आर्थिक त्याग. सांगितले जाते की, शिक्षक म्हणून पहिला पगार हातात आल्यापासून त्यांनी एक प्रतिज्ञा केली होती - पगारातील २५% रक्कम दर महिन्याला गरीब, गरजू आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी खर्च करायची.ही फक्त घोषणा नव्हती. आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी ती पाळली. पुस्तके नाहीत, वह्या नाहीत, फी भरण्यासाठी पैसे नाहीत असा एकही विद्यार्थी त्यांच्याकडे आला आणि रिकाम्या हाताने परत गेला असे कधी झालेच नाही. निवृत्तीनंतर मिळणारी शिक्षकाची पेन्शन आणि १९८० साली आमदार म्हणून मिळणारी पेन्शन या दोन्ही पेन्शनची पूर्ण रक्कम त्यांनी दलित वस्तीतील मुलांच्या शिक्षणासाठी आणि वसतिगृहासाठी दान केली होती.आज अणदूर परिसरात शिक्षणाची गंगा वाहते आहे, त्याचे एकमेव कारण म्हणजे आलूरे गुरुजी. ते शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूर या संस्थेचे संस्थापक सचिव होते.त्यांनी एक-दोन नव्हे, तर अणदूर आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागात एकूण १८ शाळा सुरू केल्या. त्याकाळी खेड्यापाड्यात शाळा काढणे म्हणजे वेडेपणा समजला जायचा, पण गुरुजींनी ते करून दाखवले.



**वसतिगृहाची कल्पना - आईची माया**

जवाहर विद्यालयात शिकण्यासाठी लांबून-लांबून मुले यायची. पावसाळ्यात नदी-नाल्यांना पूर आल्यावर त्यांना घरी जाता येत नसे. ही अडचण पाहून गुरुजी त्या मुलांना स्वतःच्या घरी घेऊन जायचे. त्यांच्या पत्नी कै. शांताकाकी त्या मुलांना स्वतःच्या मुलांप्रमाणे जेऊ-खाऊ घालायच्या, त्यांची काळजी घ्यायच्या.

या अडचणीवर कायमचा तोडगा काढण्यासाठी गुरुजींनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केले. या वसतिगृहामुळे शेकडो खेड्यातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे उघडी झाली. अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी वसतिगृहात सर्व जाती-धर्माच्या मुलांना एकत्र ठेवले.

**सामाजिक कार्य - सामूहिक फराळाची ५५ वर्षांची परंपरा**

१९७२ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. लोकांकडे खायला अन्न नव्हते, दिवाळी साजरी करणे तर दूरच. तेव्हा गुरुजींनी एक अभिनव कल्पना राबवली - सर्वधर्मीय सामूहिक फराळ.ऊसतोड मजूर, भटके-विमुक्त, अनाथ, गरीब, श्रीमंत सर्वांना एकाच पंगतीत बसवून दिवाळीचा फराळ देणे. ही परंपरा त्यांनी १९७२ मध्ये सुरू केली आणि आज ५५वर्षे झाली तरी ही परंपरा अखंडपणे अणदूर नगरीचे सरपंच रामचंद्र दादा आलूरे व त्यांच्या परिवाराने गुरुजींच्या पश्चातही अखंडपणे सुरू ठेवलेली आहे आदरणीय सुरू आहे. बाबा आमटे यांच्या भारत जोडो अभियानातही ते सक्रिय सहभागी झाले होते

**आमदार ते सहकार महर्षी**

आदरणीय गुरुजींनी शिक्षणासोबतच राजकारणातही आपला ठसा उमटवला. १९८० च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाकडून त्यांनी तुळजापूर मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि शेतकरी कामगार पक्षाचे बलाढ्य नेते माणिकराव खपले यांचा १४ हजार मतांनी पराभव करून विजय मिळवला.ते काँग्रेसचे जिल्हाध्यक्षही होते. विलासराव देशमुख आणि शिवराज पाटील चाकूरकर यांचे ते अत्यंत विश्वासू सहकारी होते.सहकार क्षेत्रात त्यांनी तुळजाभवानी सहकारी साखर कारखाना, नळदुर्गचे २००१ ते २०११ पर्यंत अध्यक्षपद भूषवले. तुळजापूर येथे तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय आणि नवोदय विद्यालय आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. लातूरची सिद्धेश्वर बँक आणि राज्य सहकारी बँकेचे उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

**साधी राहणी, उच्च विचार**

आमदार झाले, कारखान्याचे अध्यक्ष झाले तरी गुरुजींच्या अंगावर कधीही रुबाब आला नाही. धोतर, पांढरा शर्ट, आणि पायात साधी चप्पल हा त्यांचा नित्य वेश. अत्यंत साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हीच त्यांची ओळख होती.वयाच्या ९० व्या वर्षापर्यंत ते कार्यरत होते. २ ऑगस्ट २०२१ रोजी सोलापूरच्या अश्विनी रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. अणदूर येथे त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

आज शिक्षणाचा बाजार झाला असताना, आलूरे गुरुजींसारखे शिक्षक आम्हाला एक वेगळा आदर्श घालून देतात. पगार आणि पेन्शन स्वतःसाठी नाही तर विद्यार्थ्यांसाठी खर्च करणे हे फक्त पुस्तकात वाचायला बरे वाटते, पण गुरुजींनी ते प्रत्यक्ष जगून दाखवले. म्हणूनच ते फक्त माजी आमदार नव्हते, तर खऱ्या अर्थाने शिक्षणमहर्षी आणि कर्मयोगी होते.त्यांच्याच संस्थेत शिक्षक म्हणून काम करत असताना माझ्यासह अनेक गोरगरीब कुटुंबातील कर्मचारी गुरुजींच्या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वांच्या परिस स्पर्शाने आम्ही धन्य झालो आहोत आज त्यांच्या जयंतीदिनानिमित्त आदरणीय गुरुजींना विनम्र अभिवादन

**-संकलन**
**प्रवीण महादेव गुरव सहशिक्षक, महात्मा गांधी विद्यालय वडगाव (काटी), ता. तुळजापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# शिक्षकांच्या हातातील 'खडू' हरवला; 'मोबाईल'वर 'डेटा एन्ट्री'चा भार!

## अध्यापन नव्हे ऑनलाईन कामांचा ताण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ सप्टेंबर-**

विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी वर्गात खडू हातात घेणाऱ्या शिक्षकांच्या हातात सध्या मोबाईल आणि संगणक अधिक दिसू लागला आहे. शासनाच्या विविध योजना, ऑनलाइन पोर्टलवरील माहिती भरणे, अहवाल सादर करणे, छायाचित्रे व व्हिडिओ पाठविणे अशा कामांचा ताण वाढला आहे. याकडे लक्ष वेधताना शिक्षकांच्या हातातील 'खडू' हरवला अन् मोबाईलवर 'डेटा एन्ट्री'चा भार वाढला, असे शिक्षण



क्षेत्रातून बोलले जात आहे.

'अपार' ओळखपत्र नोंदणी, विद्यार्थ्यांच्या नामांकनातील तफावत दूर करणे, दुहेरी नोंदणी दुरुस्ती, यू-डायस व पीएफएमएस अद्ययावत करणे, 'निपुण प्लस'ची माहिती भरणे, पोषण आहार व गणवेश वाटपाच्या नोंदी, किचन गार्डन, पावसाचे पाणी साठवण व्यवस्था यांसह विविध उपक्रमांचे छायाचित्रे व पुरावे ऑनलाइन पाठविण्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे.

विशेष म्हणजे, अनेक कामांना 'तातडीचे' आणि 'सर्वोच्च प्राधान्य' असे निर्देश दिले जात असल्याने कोणते काम आधी करायचे? याचा संभ्रम निर्माण होतो. शाळा सुरू होण्यापूर्वीच व्हॉट्सअ‍ॅपवर येणाऱ्या सूचनांपासून दिवसभर ऑनलाइन माहिती भरण्यापर्यंत शिक्षकांचा वेळ खर्च होत असल्याने प्रत्यक्ष अध्ययन-अध्यापनासाठी उपलब्ध वेळ कमी होत आहे.

दरम्यान, अशा कामांसाठी किमान कंत्राटी पध्दतीने बेरोजगार उमेदवारांची नियुक्ती करावी. त्यामुळे रोजगारनिर्मिती, शासकीय कामकाज गतिमान होईल. शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पुरेसा वेळ देता येईल, असे डी.एड., बी.एड. असोसिएशनचे राज्य उपाध्यक्ष प्रशांत शिरगुर यांनी सांगितले.



**गोविंदा आला रे आला...**
गोकुळाष्टमीच्या निमित्ताने वडार समाजाच्या वतीने मिरवणूक काढून शहरातील विविध ठिकाणच्या दहीहंडी फोडण्यात आले.(छायाचित्र-केवल तिवारी)

## ▶▶ महत्वाचे...

### ६ सप्टेंबरपासून पुण्यात आंतरराष्ट्रीय डाळिंब परिषद

**सोलापूर, दि.५ सप्टेंबर-**

राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्रासह विविध संस्थांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ ते ८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत पुण्यात आंतरराष्ट्रीय डाळिंब परिषदेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती डॉ.राजीव मराठे यांनी पत्रपरिषदेत दिली. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत व जागतिक स्तरावर स्पर्धात्मक डाळिंब उत्पादन घेण्याच्या अनुषंगाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यात भारतासह अमेरिका, स्पेन, इटली, दक्षिण आफ्रिका, नेपाळ, ओमान, श्रीलंका आदी देशातील संशोधक, शेतकरी, उद्योजक सहभागी होणार आहेत, असेही त्यांनी सांगितले. यावेळी डॉ.प्रशांत बोडके, नीलेश गायकवाड, दिनकर चौधरी, सोमनाथ पोखरे आदी उपस्थित होते



### क्राईम पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी भांगे, सचिवपदी कोकणे

**सोलापूर, दि.५ सप्टेंबर-**

सोलापूर क्राईम पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी विशाल भांगे तर सचिवपदी परशुराम कोकणे यांची निवड करण्यात आली. पत्रकार विनायक होटकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निवडण्यात आलेले अन्य पदाधिकारी याप्रमाणे; खजिनदार-रवी मस्के, उपाध्यक्ष-विजयकुमार बाबर, इरफान शेख, विश्वभूषण लिमये, योगेश तुरेराव, कार्याध्यक्ष-अश्विनी तडवळकर, आप्पासाहेब पाटील, सहसचिव-शहानवाज शेख, इब्राहिम मुजावर, सहखजिनदार-लक्ष्मीकांत शिंदे, दिनेश शिंदे, प्रसिध्दीप्रमुख-तौसिफ शेख, प्रमोद तुपसमुद्रे, यासिन शेख, कार्यकारणी सदस्य-सुर्यकांत आसबे, शिवाजी सुरवसे, विनायक होटकर, उमाकांत चौडे, भरतकुमार मोरे, वैभव गंगणे, दिगंबर इप्पलपल्ली, इम्रान सगरी, विनोद कामतकर, रोहन नंदाणे, सल्लागार-अविनाश कुलकर्णी, राजकुमार नरुटे, भगवान परळीकर, संजय येऊलकर, पांडुरंग सुरवसे, विधी सल्लागार-ॲड.प्रदीपसिंह रजपूत, ॲड.संतोष न्हावकर.



### नूतन शिक्षणाधिकारी सुहास शिंदे यांचा सोलापूर मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात सत्कार

**सोलापूर, दि.५ सप्टेंबर-**

नूतन शिक्षणाधिकारी सुहास शिंदे यांचा सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या वतीने प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्य लिपिक मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक रजनी राऊळ, अविनाश शिंदे, रियाज आतार, आबरा डोंगरी, अमित लामतुरे, प्रशांत साठे आदी उपस्थित होते.

# सोलापूर जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या अध्यक्षपदी मल्लिनाथ खुने

## सचिवपदी सिध्दार्थ गनगोंडा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ सप्टेंबर-**





सोलापूर जनता बँक कर्मचारी सांस्कृतिक मंडळाच्या अध्यक्षपदी मल्लिनाथ खुने तर सचिवपदी सिध्दार्थ गनगोंडा यांची निवड करण्यात आली. दरम्यान, मंडळाचे यंदाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असून वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

इतर पदाधिकारी याप्रमाणे; उपाध्यक्ष-माधुरी कुलकर्णी, अनिल बरगले, सहसचिव-पवन रणसूभे, खजिनदार-विनायक कुरापाटी, ओंकार वाघमोडे, निरोप समितीप्रमुख-लक्ष्मण सुतार, वर्गणी व जाहिरात संकलन समितीप्रमुख-सुधांशू रानडे, पूजा व प्रसाद व्यवस्था समितीप्रमुख-मधुसूदन दास, प्रचार व प्रसिध्दी समितीप्रमुख-अमोल रामनवर, व्याख्यानमाला समितीप्रमुख-मदन मोरे, सभागृह व्यवस्था समितीप्रमुख-वसंत पोतदार, व्याख्याते प्रवास व निवास व्यवस्था समितीप्रमुख-जयप्रकाश नादरगी, नटवर लाहोटी, क्रीडा समितीप्रमुख-विनोद सोमा, महिला समितीप्रमुख-प्रेषिता चपळगावकर.

बँकेचे अध्यक्ष सुनील पेंडसे, उपाध्यक्ष ॲड. मिलिंद कुलकर्णी, सरव्यवस्थापक मकरंद जोशी यांची सल्लागारपदी तर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय दुनाखे, सरव्यवस्थापक देवदत्त पटवर्धन यांची विश्वस्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



## आषाढी दिंडी स्पर्धेत नू.म.वि.शिशु शाळा प्रथम

**सोलापूर, दि.५ सप्टेंबर-**

दैनिक सोलापूर तरुण भारत डिजीटल आणि इन सोलापूर न्यूज चॅनल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आषाढी दिंडी स्पर्धेत डफरीन चौक येथील नू.म.वि. शिशुशाळेने प्रथम क्रमांक पटकावले.

तरुण भारत डिजीटलच्या प्रमुखा अश्विनी तडवळकर, इन सोलापूर न्यूजचे प्रमुख समाधान वाघमोडे यांच्या हस्ते तीन हजार रुपये रोख आणि प्रमाणपत्र देवून शाळेचा गौरव करण्यात आला. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांच्या समवेत सारिका कुलकर्णी, कविता बडिगेर यांनी बक्षीस स्वीकारले. नूमविने दिंडी सोहळ्यात दुकानांची मांडणी, संत ज्ञानेश्वर यांनी चालवलेली भिंत, रिंगण सोहळा सादर केला होता.

## तेराव्या शतकातील शंभू महादेव मंदिरात 'श्रीं'च्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ सप्टेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगाव येथे जवळपास तेराशे वर्षांपूर्वीचे हेमाडपंथी शंभू महादेव मंदिर पुरातन वास्तुकलेचा उत्तम नमुना आहे. श्रावणमासाचे औचित्य साधून येथील 'श्रीं'च्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी होत आहे.

### पुरातत्व विभागाकडून जिर्णोध्दाराचे काम

माजी खासदार डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रयत्नातून या मंदिराच्या विकासासाठी ३ कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. पुरातत्त्व विभागाकडून मंदिराचा जीर्णोध्दार केला जात आहे.

येथील मंदिर अतिशय सुबक व रेखीव आहे. गाभाऱ्यात दीड ते दोन फूट उंचीवर सिंहासनावर शिवलिंगाची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. सिंहासनावर शिवलिंग दुर्मिळ आहे. सकाळच्या वेळी सूर्याची किरणे शिवलिंगावर पडतात, असे सांगण्यात येते.



या मंदिरातील दगडावर केलेले सुंदर असे नक्षीकाम पाहताना अत्यंत विलोभनीय वाटते. शिखरावर हनुमान व इतर देव-देवतांच्या मूर्ती आहेत. वरच्या बाजूला बारा ज्योतिर्लिंग आहेत. शिवलिंगासमोर पितळी धातूचा नंदी आहे. मंदिराशेजारी गणपती व बळी देवतांची स्वतंत्र मंदिरे आहेत.

मंदिराशेजारी चाफा हे फुलाचे झाड आहे. शंकराला चाफा हे फूल प्रिय आहे, असे मानले जाते. मंदिरात पहाटे व संध्याकाळी पूजा व आरती केली जाते. चैत्र महिन्यात यात्रा भरते. सात दिवस यात्रा चालते. शंभू महादेवाच्या यात्रेपूर्वी गंगेवाडी व कासेगाव येथील ग्रामस्थ कावड शिखर शिंगणापूरला नेतात. अवघड अशा मुंगी घाटातूनही ही कावड सहज वर नेली जाते. तेथून कावड परत आणून मंदिरात पूजा करून गावातून मिरवणूक काढतात. श्रावण महिन्यातील दर सोमवारी पूजा बांधली जाते. या पूजेसाठी विविध फळांचा वापर केला जातो. श्रावण महिन्यातील पवित्र वातावरणात दर्शनासाठी पंचक्रोशीतील भक्तांची झुंबड उडते. ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून मंदिराच्या शिखराचा जीर्णोद्धार केला आहे. शिखरावर केलेल्या रंगरंगोटीमुळे मंदिर अधिकच आकर्षक दिसत आहे.

## श्री संतसेना महाराज पुण्यतिथीनिमित्त सोमवारपासून विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ सप्टेंबर-**

संत शिरोमणी श्री संतसेना महाराज यांच्या ६५६ व्या पुण्यतिथीनिमित्त श्री संतसेना नाभिक समाजोन्नती संस्था व उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि.७ ते मंगळवार, दि.८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत उत्तर कसबा परिसरातील नाभिक गल्ली येथील संतसेना महाराज मंदिर येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती भारत क्षीरसागर व नंदकुमार दळवी यांनी पत्रपरिषदेत दिली. सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ८ वाजता संतोष धोत्रे यांच्या हस्ते अभिषेक, सायंकाळी ५ वाजता महिला मंडळाचा भजन, सायंकाळी ५.३० वाजता प्रवचन, रात्री ८ वाजता ह.भ.प.गणेश वारे यांचे




कीर्तन होणार आहे. मंगळवार, दि.८ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजता संस्थेचे मनोहर क्षीरसागर यांच्या हस्ते अभिषेक, सकाळी १० वाजता ह.भ.प.दत्तात्रय क्षीरसागर यांचे गुलालाचे कीर्तन, दुपारी १२ वाजता महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी पांडुरंग पवार, संतोष धोत्रे, मोहन जमदाडे, श्रीराम वाघमारे आदी उपस्थित होते.

# इंधन दरवाढीचा असाही फटका; सोलापूर-मुंबई विमानसेवा बंद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ सप्टेंबर-**



एटीएफ अर्थात विमान इंधनाच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून ते कंपनीला ते आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. त्यामुळे सोलापूर-मुंबई विमानसेवा बंद करण्यात येत आहे, अशा आशयाचे पत्र स्टार एअर लाईन या विमान कंपनीने सोलापूर जिल्हा प्रशासनाकडे धाडले.

दरम्यान, स्टार एअर लाईन या कंपनीने धाडलेल्या या पत्राच्या पार्श्वभूमीवर बुधवार, दि.९ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबई येथे बैठक बोलाविण्यात आली असून तीत विमानसेवा पूर्ववत सुरु करण्याकामी सकारात्मक निर्णय होणार आहे, अशी अपेक्षा सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

सोलापूर-मुंबई विमानसेवेमुळे प्रति महिन्याला मोठे नुकसान होत आहे. राज्य शासनाकडून विविध माध्यमातून मदत करण्यात आली. फंडिंग निधीत वाढ केल्याने काही प्रमाणात नुकसान भरुन काढण्यास मदत झाली, असे त्या पत्रात म्हटले आहे.

फेब्रुवारी २०२६ मध्ये विमान इंधनाची किंमत सुमारे ६० रुपये प्रतिलिटर होती. सप्टेंबर २०२६ मध्ये ती १२२ रुपये प्रतिलिटर झाली आहे. सोलापूर ते मुंबईसह नांदेड-मुंबई, बेळगाव-मुंबई आणि गुजरात, ओरिसा या राज्यातूनही विमान सेवा बंद करण्यात आलेल्या आहेत, असेही कंपनीकडून सांगण्यात आले.

# विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सवाच्या नेतृत्वाची धुरा विश्वनाथ कोळींच्या खांद्यावर

**रिअल इस्टेट क्षेत्रातील युवा उद्योजकाची सामाजिक क्षेत्रातही दमदार वाटचाल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.५ सप्टेंबर-**



रिअल इस्टेट क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची वेगळी छाप निर्माण करणारे युवा उद्योजक मा. विश्वनाथ (आण्णा) कोळी यांच्या नेतृत्वाला आता गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक व्यासपीठाची नवी दिशा मिळाली आहे. विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाल्याने त्यांच्या समर्थक आणि मित्रपरिवारातून आनंद व्यक्त होत असून, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांच्या नेतृत्वाचा उपयोग होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

व्यवसाय क्षेत्रातील धडाडीचे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळख असलेल्या विश्वनाथ कोळी यांनी आपल्या कार्यपद्धतीतून तरुण उद्योजकांमध्ये स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. व्यावसायिक क्षेत्रातील आव्हानांना सामोरे जाताना घेतलेले निर्णय, सहकाऱ्यांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि मित्रपरिवाराला सातत्याने दिले जाणारे पाठबळ यामुळे त्यांची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक एकोपा, सांस्कृतिक जतन आणि समाजोपयोगी उपक्रमांचे माध्यम बनत आहे. त्यामुळे मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाच्या अध्यक्षपदाची जबाबदारी महत्त्वाची मानली जात आहे. या माध्यमातून उत्सवाचे नियोजन अधिक शिस्तबद्ध करण्यासोबतच विविध सामाजिक उपक्रमांना चालना देण्याचे आव्हान कोळी यांच्यासमोर असणार आहे.

दरम्यान, ६ सप्टेंबर रोजी विश्वनाथ कोळी यांचा वाढदिवसही साजरा होत आहे. वाढदिवसानिमित्त त्यांच्या कर्तृत्वाला यशाची नवी उंची लाभावी, नेतृत्वाची वाटचाल अधिक व्यापक व्हावी आणि त्यांच्या माध्यमातून समाजहिताचे विविध उपक्रम घडावेत, अशा शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

कोळी समाजाचे नेते अंबादास कोळी, गोविंद राठोड तसेच मित्रपरिवाराच्या वतीने विश्वनाथ कोळी यांना वाढदिवसाच्या आणि मध्यवर्ती गणेशोत्सव महामंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देण्यात आल्या.




## 'संस्कृत ही तंत्रज्ञान आणि आयुर्वेदाशी जोडलेली बहुमुखी भाषा'

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ सप्टेंबर-**

संस्कृत ही केवळ प्राचीन भाषा नसून ती आधुनिक तंत्रज्ञान आणि आयुर्वेद शास्त्र यांच्याशी जोडलेली एक बहुमुखी भाषा आहे. आजच्या आधुनिक युगात संस्कृत भाषेच्या अभ्यासकांसाठी अनेक व्यावसायिक संधी उपलब्ध आहेत, असे प्रतिपादन शेठ गोविंदजी रावजी आयुर्वेद कॉलेज साहित्य सिध्दांत व संस्कृत विभागाच्या प्रमुखा डॉ.ज्योत्स्ना नवनाथ गंगासागरे यांनी केले.

संगमेश्वर कॉलेज (कनिष्ठ विभाग) मधील भाषा संकुल आणि संस्कृत विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. उपप्राचार्य प्रसाद कुंटे हे अध्यक्षस्थानी होते. प्रारंभी सुदिक्षा पटणे आणि साक्षी माशाळे या विद्यार्थिनींनी संस्कृत गीत सादर केले. प्रदीप आर्य यांनी प्रास्ताविक केले. अभिराज कोळी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. सुप्रिया आवटे हिने रेखाटलेले सुंदर चित्र पाहुण्यांना भेटीदाखल देण्यात आले. अदिती पाटील हिने पीपीटी सादरीकरणाच्या माध्यमातून भारतीय वेद आणि उपनिषदांमधील तंत्रज्ञानाचे विविध पुरावे व उल्लेख अत्यंत अभ्यासूपणे मांडले. साक्षी म्हेत्रे हिने सूत्रसंचालन केले. भक्ती ओलेकर यांनी आभार मानले.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## लातूरमध्ये आज रंगणार सुरताल संगीत महोत्सव

तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ सप्टेंबर : संगीत क्षेत्रातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व गुरुवर्य पं. शांताराम चिगरी गुरुजी व गुरुमाई शकुंतलादेवी चिगरी यांच्या पवित्र स्मरणार्थ लातूरमध्ये 'सुरताल संगीत महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. आज रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता भालचंद्र ब्लड बँक सभागृहात हा भव्य सांगीतिक सोहळा रंगणार आहे.

या महोत्सवाचे मुख्य आकर्षण पुणे येथील सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पं. अंगद गायकवाड यांचे मुख्य गायन असणार आहे. आपल्या कसदार, भावपूर्ण आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या गायकीने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे पं. गायकवाड विविध राग आणि बंदिशींचे सादरीकरण करणार आहेत. महोत्सवाचे आणखी एक विशेष आकर्षण म्हणजे राष्ट्रीय तरावर आपल्या सुरांनी रसिकांना त्रमुग्ध करणाऱ्या अंजली गायकवाड (इंडियन आयडॉल फेम) आणि नंदिनी गायकवाड (पुणे) यांचे शास्त्रीय गायन. गायकवाड भगिनींच्या सुरेल सादरीकरणाचा आणि जुगलबंदीचा अविस्मरणीय अनुभव लातूरकर संगीतप्रेमींना घेता येणार आहे. या स्वर मैफलीला पुणे येथील नामवंत बादक विजय श्रीमंगले (हार्मोनियम) आणि चैतन्य पवार (तबला) यांची उत्कृष्ट साथसंगत लाभणार आहे. चिगरी गुरुजींच्या समृद्ध संगीत परंपरेला अभिवादन करणाऱ्या या स्वरयज्ञात शास्त्रीय संगीतप्रेमी, संगीत अभ्यासक, रसिक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अविस्मरणीय सांगीतिक सोहळ्याचा आनंद घ्यावा, असे आवाहन सुरताल संगीत महाविद्यालय आणि रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या वतीने करण्यात आले आहे.



## विविध वृत्त.....

### शालेय क्रीडा स्पर्धा सहभागासाठी ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.५ सप्टेंबर : सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत समावेश असलेल्या विविध स्तरावरील शालेय व इतर क्रीडा स्पर्धांचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे. तरी लातूर जिल्ह्यातील सर्व शाळांनी या स्पर्धांमध्ये आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

या शैक्षणिक वर्षापासून क्रीडा संचालनालय स्तरावरून विकसित करण्यात आलेल्या HTTPS://SPORTS.MAHARASHTRA.GOV.IN या ऑनलाईन संकेतस्थळाद्वारे शालेय क्रीडा स्पर्धांसाठी आवश्यक असणारी शाळांची नोंदणी, प्राथमिक प्रवेशिका, संलग्नता आणि प्रवेश शुल्क भरण्याची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात आली आहे. लातूर जिल्ह्यात या शालेय क्रीडा स्पर्धांची सुरुवात सप्टेंबर २०२६ च्या दुसऱ्या आठवड्यापासून प्रस्तावित करण्यात आली असल्याने, तत्पूर्वी जिल्ह्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांनी या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन आपली सर्व आवश्यक माहिती भरून तसेच विहित ऑनलाईन शुल्क अदा करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. या क्रीडा स्पर्धांच्या नोंदणीबाबत किंवा इतर प्रक्रियेबाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास क्रीडा अधिकारी धिरज बावणे (मो. नं. ८००७९०७७१३) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयराज मुंढे यांनी केले आहे.

# महामंडळ मालामाल पण कार्डधारकांची लुट

तभा वृत्तसेवा / प्रमोद सुरवसे

लातूर दि. ५ सप्टेंबर : एक सप्टेंबर पासून बसमध्ये प्रवास करताना एन सी एम सी कार्ड अनिवार्य केले होते . पण या दिवशी बसमध्ये कोणाकडेच हे कार्ड नव्हते . त्यामुळे त्यांना फुल तिकीट काढूनच प्रवास करावा लागला ही वस्तुस्थिती आहे . आणि ज्यांनी हे कार्ड काढले ते प्रवास करताना सोबत नव्हते . काही प्रवाशांच्या जवळ हे कार्ड असूनही त्याचा फायदा त्यांना झाला नाही कारण त्या कार्डात पैसे नसल्यामुळे त्यांनासुद्धा फुल तिकीट काढूनच प्रवास करावा लागला हे सांगायला नको .






अमृत जेष्ठ नागरिक, जेष्ठ नागरिक आणि महिला यांच्यासाठी एसटी महामंडळाने इबिक्स लि. आणि एन एस डी एल पेमेंट बॅक यांच्यावर एन सी एम सी कार्ड काढून देण्याची जबाबदारी सोपवली होती परंतु कार्ड काढण्यासाठी भल्या सकाळीच कार्यालयासमोर भल्या मोठ्या रांगत असल्याचे चित्र बघून महमंडळाने काही खाजगी ग्राहकसेवा, इतर कॉम्प्युटर ची कामे करणाऱ्या दुकानदारांवर ही जबाबदारी सोपविली खरी पण हे दुकानदार मनमानी करत कितीही पैसे घेऊन कार्ड देत असल्याच्या घटना घडल्या होत्या .

काही महिलांनी सांगितले की, कार्ड काढण्यासाठी२००/ ते३००/ रुपये घेतले आणि कार्ड आल्यावर ते देण्यासाठी परत १००/ ते२००/ घेतले असून कार्डवर बॅलन्स एक रुपयाही टाकला नाही.

गरीब किंवा म्हातारे कोतारे यांना मुळात कार्ड विषयी कसलीच माहिती नाही किंवा एस.टी . महामंडळाने माहिती प्रसारीत केली नाही किंवा एखादा रिक्षा भोंगसह शहरात फिरविला नसल्यामुळे त्यांना कार्ड विषयी माहिती नाही अशांची लुटमार होत असल्याचे समजत आहे .

कार्ड काढल्यानंतर ते पोस्टाने का पाठविले जात नाही हा मुळात प्रश्न आहे . आर्थिक लुट करण्याच्या हेतूने हे केले असावे असे अनेक कार्ड काढणाऱ्यांचे म्हणणे आहे .

त्यामुळे या पुढे तरी सदरील कार्ड पोस्टाने च पाठविण्याची सोय करावी जेणेकरून कार्डधारकांची आर्थिक लुट होणार नाही एक सप्टेंबरला बहुतांश प्रवाशाकडे कार्ड नसल्यामुळे, त्यांच्याकडे होते पण त्यात बॅलन्स नसल्यामुळे तर काहींना कार्ड काढूनही न मिळाल्यामुळे अशा प्रवाशांना फुल तिकीट काढावे लागल्याने त्या दिवशी महामंडळ मालामाल झाले . कधी नव्हे त्यादिवशी धंदा जोरात होता . आतापर्यंत अनेकांना हाफ तिकीट किंवा फुकट न्यावे लागत होते त्यांच्याकडून फुल तिकीट घेत असल्यामुळे महामंडळ मालामालचं झाले ना? या सर्व प्रकारानंतर महामंडळाने हे कार्ड वापरण्यावर १९ तारखेपर्यत मुदतवाढ दिली . शिवाय ज्यांनी कार्ड काढण्याची प्रोसेस केली आहे अशांना एक पावती मिळते ती पावती सुद्धा या काळात ग्राह्य धरली जाणार असल्यामुळे प्रवाशांना काही अंशी दिलासा मिळाला आहे .

मुळात प्रश्न येतो तो असा की, एसटी महामंडळाने या कार्ड बाबत म्हणावी तशी प्रसिद्धी दिली नाही त्यामुळे कार्डविषयी ची माहिती सर्वसामान्य प्रवाशांना मिळाली नाही . कार्ड काढून देणाऱ्यांवर महामंडळाने लक्ष न दिल्यामुळे बहुतांश प्रवाशांची आर्थिक लुट झाली . आणि कार्ड तयार झाल्यावर त्यांना पोस्टाने न पाठविल्याने कार्ड काढणाऱ्याचे आयतेच फावले या विषयी बस स्टॅण्ड वर माहिती घेतली असता असे समतले की, कार्ड काढण्यासाठी दोनशे रु . कार्ड तयार झाल्यावर दीडशे रु . या दीडशे मधून शंभर रु. कार्डवर बॅलन्स . म्हणजे पुन्हा पन्नास रुपयांची लुट . पहिल्यांदा दोनशे घेतल्यावरच कार्ड पोस्टाने का नाही पाठवत. या व्यवहारात कोण कोण आहे याची चौकशी झाली पाहिजे आणि दोषींवर दंडात्मक कारवाई झाली पाहिजे तरच कार्ड काढणाऱ्यांना न्याय दिल्या सारखे होईल.

मुळात कार्ड काढण्यासाठी एसटी महामंडळाने एजन्सीची नेमणूक करू नये . उलट प्रत्येक बस स्थानकात एखादा कर्मचारी नियुक्त करून दिवसभर कार्ड काढण्याची प्रक्रिया करावी . शहरात फिरून कार्ड विषयी सांगणारे रिक्षा भोंग्या सह फिरवाव्यात म्हणजे आतापर्यत त्यांचे कार्ड काढणे राहून गेले होते ते आता कार्ड काढून घेतील .

कार्ड काढण्याचे एजन्सीला देऊ नये . म्हणजे कमी पैशात कार्ड निघत असल्यामुळे प्रवाशांची लुट होणार नाही, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे

## सुसंस्कृत लातूरची ओळख जपूया, सामाजिक एकोपा वृद्धिंगत करूया : जिल्हाधिकारी

### यंदाही लातूर जिल्ह्यात 'डीजे मुक्त' गणेशोत्सव -- बाहेर जिल्ह्यातून येणाऱ्या 'डीजे'वर पोलीस गुन्हे दाखल करणार

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. ५ सप्टेंबर : शांतताप्रिय आणि सुसंस्कृत जिल्हा अशी लातूरची सर्वत्र ओअख आहे, ही ओळख जपण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. आगामी काळातील सर्व उत्सव सर्व जाती-धर्मीय बांधवांनी एकोप्याने साजरे करावेत. या उत्सवांच्या माध्यमातून सामाजिक एकोपा वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले. दयानंद सहभागृह येथे गोकुळाष्टमी, पोळा व गणेशोत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर आयोजित लातूर जिल्हा शांतता समिती बैठकीत ते बोलत होते.



पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा लातूर ग्रामीणच्या उपविभागीय पोलीस अधिकारी मेघना आय. एन., उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, उपविभागीय पोलीस अधिकारी समिरसिंह साळवे यांच्यासह पोलीस व जिल्हा प्रशासनातील अधिकारी तसेच लातूर शहर व जिल्ह्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

गतवर्षीप्रमाणे यंदाही लातूर जिल्ह्यात 'डीजे'मुक्त गणेशोत्सव साजरा होणार असून गणेशोत्सव मंडळानी पारंपारिक वाद्ये, कला प्रकारांना प्राधान्य द्यावे. तसेच गणेश मंडळाकडून उभारण्यात येणाऱ्या देखाव्यांमधून पर्यावरण रक्षण, वृक्षरोपण, जलसंधारणाबाबत जनजागृती करावी. उत्सवाच्या माध्यमातून प्रबोधनाची परंपरा कायम ठेवत इतरांसमोर नवा आदर्श निर्माण करावा. गणेशोत्सव काळात सार्वजनिक गणेश मंडळांना आवश्यक सर्व परवानग्या एकाच ठिकाणी दिल्या जातील. त्यामुळे आवश्यक परवानगी घेवूनच उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यावेळी म्हणाले.

लातूर जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी गतवर्षी प्रमाणे यंदाही 'डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करावा. यंदाही गणेशोत्सवात डीजे व कर्णकर्कश ध्वनिप्रक्षेपण यंत्रणेला परवानगी दिली जाणार नसल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी स्पष्ट केले. तसेच जिल्ह्याबाहेरील डीजे आणल्यास संबंधित डीजे मालक आणि मंडळांच्या पदाधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. त्यामुळे गणेशोत्सवाची सांस्कृतिक परंपरा जपत मंडळांनी मिरवणुकांमध्ये लेझीम, ढोल-ताशा, झांज पथक, पारंपरिक वाद्ये, लोककला आणि लोकनृत्यांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. यामुळे उत्सवाला पारंपरिक स्वरूप प्राप्त होण्याबरोबरच स्थानिक कलाकार व कलापथकांनाही रोजगाराची संधी उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले.

गणेशोत्सवाच्या काळात सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक गणेश मंडळाने आपल्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. शक्य असल्यास ही यंत्रणा गणेशोत्सवानंतरही कायमस्वरूपी कार्यरत ठेवावी. पोलीस आणि गणेश मंडळांमध्ये प्रभावी समन्वय राहावा, यासाठी यंदा 'एक मंडळ-एक पोलीस अंमलदार' ही अभिनव संकल्पना राबविण्यात येणार आहे. प्रत्येक गणेश मंडळासाठी नियुक्त करण्यात येणारा पोलीस अंमलदार मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधून गर्दी व्यवस्थापन, मिरवणूक नियोजन, सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेसंदर्भात आवश्यक मार्गदर्शन करणार आहे. गणेशोत्सव मंडळानी विनापरवानगी मंडप अथवा मिरवणूक काढू नये, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी गणेशोत्सव काळात करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. यावेळी उपस्थितीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनीही आपल्या सूचना मांडल्या.

## एका दिवसात ५० हजारांचा दंड वसुल



तभा वृत्तसेवा

लातूरदि.५ सप्टेंबर :हेल्मेटविना दुचाकी चालवणाऱ्यांवर पोलिसाकडून कार्यवाही सुरू असून अवघ्या एक दिवसातच पन्नास हजाराचा दंड वसूल करण्यात आला आहे. शिरूर आनंतपाळ पोलिस ठाणे आंतर्गत निटूर पोलिस चौकीचे बिट आमलदार सुधीर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखालील लातूर-जहीराबाद महामार्गावरील निटूर मोड चौरस्ता येथे हा पन्नास हजाराचा दंड वसूल करण्यात आला.

जिल्हा पोलिस प्रशासन व संयुक्त तालुका पोलिस प्रशासनाच्या वतीने ही कार्यवाही केली जात आहे. हेल्मेट सक्ती १ सप्टेंबरपासून लागू करण्यात आली आहे. निटूर पोलिस चौकीचे कदम केंद्रे, पप्पू कांबळे यांनी हा हा दंड वसूल केला. हेल्मेट घालून आलेला चालकांना पुष्प देऊन स्वागतही करण्यात आले.

## आ. बसवराज पाटलांनी घेतला मनपा कारभाराचा आढावा



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ सप्टेंबर : लातूर-धाराशिव-बीड स्थानिक स्वराज्य संस्थेचे नवनिवार्चित आमदार तथा माजीमंत्री बसवराज पाटील यांनी शुक्रवारी महानगरपालिकेस सदिच्छा भेट दिली. यावेळी प्रशासनाच्यावतीने आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी त्यांचे स्वागत केले. उपस्थित पदाधिकारी, नगरसेवक आणि अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीत आ. पाटील यांनी महापालिकेच्या कामकाजाचा आढावा घेत अडचणी जाणून घेतल्या. या बैठकीकडे सत्ताधारी कॉंग्रेस महाविकास आघाडीचे महापौर, उपमहापौरांसह पदाधिकारी व नगरसेवकांनी पाट फिरवत अघोषित बहिष्कारच टाकला. परिणामी केवळ विरोधी पक्ष असलेल्या भाजप सदस्यांसमवेत आ. पाटील यांनी संवाद साधला. पाटील यांच्या पहिल्याच भेटीकडे कॉंग्रेसने फिरविलेली पाट म्हणजे कॉंग्रेसच्या कोत्या मनाच्या राजकारणाची ही प्रचिती असल्याचेच नमूद करीत विरोधकांसह लातूरकरांनी टीकेचा सूर व्यक्त केला आहे.

शुक्रवारी, आ. बसवराज पाटील यांनी महापालिकेत येऊन पदाधिकाऱ्यांसह अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी आयुक्त राहुल कुलकर्णी, विरोधी पक्षनेते देविदास काळे, भाजपचे शहराध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, गटनेते ॲड. दीपक मठपती, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, उपायुक्त वसुधा फड यांच्यासह भाजपचे नगरसेवक, पालिकेचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी आ. पाटील यांनी अधिकारी व नगरसेवकांकडून लातूरच्या समस्या जाणून जाणून घेतल्या. प्रत्येक नगरसेवकांनी लातूरच्या संभाव्य पाणीटंचाईसह हक्काचे जीएसटी अनुदान वाढवून मिळण्यासंदर्भात प्रश्न उपस्थित केले. आ. बसवराज पाटील हे भाजपचे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विजयी झालेले पहिलेच आमदार पहिल्यांदा महापालिकेत आले. त्यांनी सर्वांच्या समस्या जाणून घेतल्या. भाजपच्या आमदाराचे पहिल्यांदाच महापालिकेत आगमन झाल्याचा आनंद भाजप नगरसेवकांमध्ये दिसून येत होता. प्रशासनानेही पोटतिडकीने अमृत-२ अंतर्गत लागणाऱ्या निधीसह जीएसटी अनुदान वाढीची मागणी आ. पाटील यांच्याकडे केली.

## १२ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालत

तभा वृत्तसेवा

लातूर, दि.५ सप्टेंबर : राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार लातूर येथील जिल्हा व सत्र न्यायालय आणि जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयांमध्ये येत्या १२ सप्टेंबर, २०२६ रोजी 'राष्ट्रीय लोकअदालती'चे आयोजन करण्यात आले आहे. वेळ आणि पैशांची बचत करणाऱ्या या संधीचा लाभ घेऊन पक्षकार आणि विधीज्ञांनी १२ सप्टेंबर, २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये आपले वाद आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे आवाहन लातूरचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष संजय भारुका, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही. एन. गिरवलकर आणि लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष एस. डी. जाधव यांनी केले आहे.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली व तडजोडीस पात्र असणारी विविध दिवाणी आणि फौजदारी प्रकरणे, परक्राम्य संलेख अधिनियमातील कलम १३८ नुसार दाखल धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणे, भूसंपादन प्रकरणे, कौटुंबिक विवाद, मोटार वाहन अपघात दाव्यांची प्रकरणे, दरखास्त प्रकरणे, कामगार व औद्योगिक न्यायालयांतील विषय तसेच बँकांशी संबंधित प्रलंबित खटले तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय बँक आणि विविध वित्तीय संस्थांची वाद-पूर्व प्रकरणेसुद्धा या लोकअदालतीत सामोपचाराने मिटवण्यासाठी मांडली जाणार आहेत. लोकअदालतीच्या माध्यमातून दोन्ही पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची पूर्ण संधी उपलब्ध होते आणि परस्पर संमतीने व सामंजस्याने वादावर कायमस्वरूपी तोडगा काढता येतो. लोकअदालतीमध्ये दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने प्रकरण यशस्वीरीत्या निकाली निघाल्यास नियमानुसार न्यायालयात भरलेले न्यायालयीन शुल्क (कोर्ट फी) परत मिळण्याची तरतूद आहे. त्यामुळे वेळ आणि पैशांची बचत करणाऱ्या या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन पक्षकार आणि विधीज्ञांनी १२ सप्टेंबर, २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे मोठ्या संख्येने आपसी तडजोडीने निकाली काढावीत, असे जाहीर आवाहन करण्यात आले आहे.

# साखरेच्या गोडव्यात हरवली नातीगोती ..?

तभा वृत्तसेवा / सुधीर गंगणे

औसा दि. ५ सप्टेंबर : जीवनाश्यक वस्तूचा दर कमी व्हावा.यासाठी केंद्र सरकारने १८ टक्याचा जीएसटी कमी करून ५ टक्यावर आणला. यातून कांहीं काळासाठी किंमती कमी होऊन स्थिरावल्या होत्या.याचा यावर्षीच्या दुष्काळाच्या उंबरठ्यावर असलेल्या सर्वांनाच फायदा होईल. असे वाटत असतानाच वर्षातील ऐण श्रावणातील सणांच्या तोंडावर सर्व वस्तूंच्या किंमतीत कमी अधिक प्रमाणात वाढ झाली.तर साखरेच्या किंमतीत ४० रूपया हून थेट ८२ रूपये अशी दुपटीपेक्षा अधिक वाढ झाल्याने हॉटेल चालकांनी गावात चहाचा दर दुपटीने वाढविला.याचा फटका सर्वत्र दिसून येत असला तरी आवर्जून दररोज, एकमेकांना भेटणारी मित्रमंडळी, पाहुणे रावळे आता कट मारणे पसंत करत आहेत.त्यामुळे साखरेच्या गोडव्यात नातीगोती हरवली.. ? असे विदारक चित्र गावागावात दिसून येत आहे.





यंदाचा खरीप हंगाम दुष्काळाच्या उंबरठ्यावर उभारल्यामुळे एकमेकांनी गाठीभेटी,सोयरिकीच्या बोलीचालीला आजतरी बगल देणे पसंत केले आहे. आणि प्रत्येकांनी दिवाळीनंतरच कामाचं पाहू असा मानस करून होणाऱ्या घडामोडींची गती थांबवली आहे.केंद्र सरकारने सततच्या वाढत्या करवाढीला बगल देत यावर्षीच्या अर्थसंकल्पात १८ टक्यावरून थेट ५ टक्यावर कर आणून सर्वसामान्यांना एकीकडे दिलासा दिला.अवघ्या तीन महिन्यांत चाळिशीच्या आसपास राहणाऱ्या साखरेने ४४रूपये,४६रूपये,४८रूपये वरून पन्नाशी गाठली. यावर दरवाढ थांबेल. असे वाटत असतानाच थेट ५६ रूपयांवर पोहोचला.यानंतर ६० रूपया वरून मोठी वाढ होत साखरेने सत्तरी गाठली. एवढ्यावर न थांबता ७२ रूपये आणि यामध्ये पुन्हा एकदा चांगली वाढ होत ८२ रूपयांपर्यंत ग्रामीण भागात पोहंचला.

यावेळी यंदा पावसाअभावी वाढ खुटलेल्या,आर्थिक अडचणींमुळे अपुऱ्या खतमात्रेवर शेवटच्या घटिका मोजणाऱ्या उभ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या भुवया उंचावल्या होत्या. तर दुसरीकडे खरिप हंगामातील उडीद,मुग, सोयाबीन या नगदी पिकांनी एकापाठोपाठ शेतकऱ्यांकडे पाठ फिरवल्यामुळे व तूर पिक रामभरोसे दिसत असल्याने यंदा उत्पादन कमी का होईना परंतू साखरेचे दर वाढल्याने शेतकऱ्यांनी आपला मोर्चा ऊस पिकाकडे वळविला.या काळात साखरेची दरवाढ झाली.असे नाही.गरा,पोहे, साबुदाणा यामध्ये १० टक्यापर्यंत वाढ झाली आहे.खाद्यतेलात २०टक्के तर भगर आणि तांदूळ यामध्ये दीडपट वाढ झाली आहे.याचबरोबर सर्वच जिवनाश्यक वस्तूंच्या किंमतीत वाढ झाली आहे.

श्रावणातील सणांच्या महिन्यात या जिवनावश्यक वस्तूंच्या दरात झालेल्या दरवाढीमुळे शेतकऱ्यांसह मजुरांचे यंदा आर्थिक गणित पार कोलमडून गेले आहे.या श्रावणातील पंचीम,राखी पौर्णिमा, गोकुळाष्टमी,पोळा या सणांवर परिणाम दिसून येत आहे.तर या महिन्यात चालू हंगामातील शेतातील कामांची विश्रांती असते.याबरोबर उपवासाचा व सण साजरे करण्याचा महिना असल्याने या महिन्यात सकाळी पारावर, ओट्यावर व चौकात बसलेली मंडळी रामराम करीत एकमेकांना चहापाणी करतात. परंतू साखरेच्या दर वाढीपासून हॉटेल चालकांनी चहाच्या दरात दुपटीने वाढ केली आहे.

त्यामुळे सगेसोयरे, मित्रमंडळीनी चहा पाण्याच्या पारंपरिक पाहुणचाराला बगल देणे पसंत केले आहे.तर कांहीं मित्रमंडळी मोबाईल वरून बोलताना मी आज शेतातच आहे, बाहेरगावी आलो आहे. अशा थापा देत दुचाकीवरून गावातच फिरताना दिसत आहेत. दुष्काळापेक्षा अधिक या दरवाढीचा एवढा मोठा धसका मजुरापासून अडीच एकरच्या अल्प उधारकासह ५० एकरांच्या जमिन धारकांनी घेतला असल्याचे चित्र गावागावात दिसत आहे. त्यामुळे साखरेच्या गोडव्यात मित्रमंडळी, नातीगोती हरवली...?याचे उत्तर आगामी काळात दिसणार आहे.

## संक्षिप्त...

## शेंदचे ग्रामसेवक प्रकाश राचूरे यांचे अपघाती निधन



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ५ सप्टेंबर : शिरूर अनंतपाळ तालुक्यातील कानेगाव ग्रामपंचायत कार्यालयात पाणीपुरवठा सेवक म्हणून असलेल्या प्रकाश राचूरे वय ४१ याना सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नती मिळाली अन् गावात पाणी सोडणाऱ्या सेवकाचा ग्रामसेवक झाला परंतु अवघ्या कांही दिवसातच पदोन्नती मिळालेल्या प्रकाश राचूरे यांचे निलंगा पंचायत समिती कार्यालयातील आढावा बैठक आटोपून गावाकडे जात असताना शुक्रवारी दि ४ सप्टेंबर रोजी निलंगा येथील उदगीर मोडजवळ अपघाती निधन झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केले जात आहे. सध्या ते शेंद ता. निलंगा येथे ग्रामसेवक म्हणून कार्यरत होते.

याबातची माहिती अशी की, निलंगा पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेल्या शेंद गांव ग्रामपंचायत कार्यालय प्रकाश राचुरे गटविकास अधिकारी यानी आयोजित केलेल्या आढावा बैठकीला उपस्थित होते बैठक संपल्यानंतर ते कानेगाव ता. शिरूर अनंतपाळ मोटार सायकलीने गावाकडे जात असताना उदगीर मोड येथील पवार पेव्हर ब्लॉक समोर भरधाव ट्रॅक्टरने जोरात धकड मारत डोक्यावरून ट्रॅक्टरचा मोठा टायर गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झला. प्रकाश राचूरे हे गावामध्ये ग्रामपंचायत सेवक म्हणून पाणी सोडण्याचे काम करत होते सेवकाच्या नियमानुसार त्यांना ग्रामसेवक म्हणून पदोन्नती मिळाली होती. पुढील सेवेचे आणखी सतरा वर्ष बाकी असताना त्यांचा अपघाती मृत्यू झाला मुळे अर्ध्यावरच त्यांचा स्वप्नाचा चक्का चूर झाला आहे. अपघाताची माहिती कळताच अनेक ग्रामसेवकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती गोविंद चिलगुरे यांच्यासह ग्रामसेवक व कर्मचारी मोठ्या संख्येने घटनास्थळी उपस्थित होते. जागेवरच मृत्यू झाल्यामुळे त्यांना तात्काळ उपजिल्हा रुग्णालय निलंगा येथे नेण्यात आले असून त्यांचे शिवविच्छेदन करून कानेगाव तालुका शिरूर अनंतपाळ येथे आज अंत्यविधी करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्र्चात पत्नी मुलगा एक मुलगी असा परिवार आहे अचानक त्यांच्या अपघाती निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# सहकारी सोसायट्यांचा विस्तारासह कर्जमाफीची आढावा बैठक

# आ. अभिमन्यू पवार यांची उपस्थिती शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्वपूर्ण बैठक



तभा वृत्तसेवा

औसा दि. ५ सप्टेंबर : विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकरी व ग्रामस्थांच्या विकासाला चालना देण्याबरोबरच शासनाच्या पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी कर्जमाफी योजनेचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांची संख्या, लाभापासून वंचित राहिलेले पात्र शेतकरी, प्रलंबित प्रकरणे तसेच कर्जमाफीची रक्कम खात्यावर जमा होण्यास येणाऱ्या अडचणींबाबत राष्ट्रीयीकृत बँकांच्या प्रतिनिधींकडून सविस्तर चर्चा आमदार अभिमन्यू पवार यांनी केली.

तहसिल कार्यालयाच्या प्रशासकीय इमारतीत औसा तालुक्याची आढावा बैठक झाली.आ.अभिमन्यू पवार अध्यक्षस्थानी होते. अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, जिल्हा उपनिबधक अविष्कार पतगळे, बाजार समितीचे सभापती चद्रशेखर सोनवणे, आत्मा प्रकल्पाच्या सचालक बागर, एस एस खदारे, सहाय्यक निबधक रमेश सगर, गटविकास अधिकारी आनंद कुमार मिरगणे, तहसीलदार रामेश्र्वर स्वामी, कृषी उपसचालक लक्ष्मण खताळ, क्रिएटिव्ह फाऊंडेशनचे अध्यक्ष परिक्षित पवार, तालुका कृषी अधिकारी दतात्रय हाके

कर्जमाफी योजनेत काही पात्र शेतकरी अद्याप वंचित राहिल्याच्या तक्रारींचा यावेळी आढावा घेण्यात आला. बँक स्तरावर येणाऱ्या तांत्रिक व प्रशासकीय अडचणी, कर्जखात्यांची माहिती, कर्जमाफीची रक्कम जमा होण्यातील अडथळे आदींबाबत संबंधित बँक प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली. पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. एकही पात्र शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी संबंधित विभाग, बँका आणि सेवा सोसायट्यांनी समन्वयाने काम करावे, असे आवाहन आमदार अभिमन्यू पवार यांनी केले.

केंद्र व राज्य शासनाच्या नवीन धोरणानुसार विकास सोसायट्यांना केवळ कर्जवाटपापुरते मर्यादित न ठेवता गावपातळीवरील सक्षम व्यवसाय केंद्र म्हणून विकसित करण्याचा शासनाचा उद्देश आहे. या अनुषंगाने विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून ग्राहक भांडार, गोदामे, खत-बियाणे विक्री, स्वस्त औषधांचा पुरवठा, उडउ सेंटर, १०० टक्के संगणकीकरण तसेच संस्थेची स्वतःची जागा व कार्यालयीन इमारत निर्माण करून संस्था अधिक सक्षम करण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात व्यवसाय उभे करता येऊ शकतात. त्यामुळे संस्थांनी पारंपरिक कर्जवाटपाबरोबरच विविध व्यवसायिक उपक्रम सुरू करून शेतकरी व सभासदांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन करण्यात आले. तसेच कर्जमाफी योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी सेवा सोसायट्यांनी गावपातळीवर जनजागृती करून शेतकऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन करावे, असेही सांगण्यात आले.पश्र्चिम महाराष्ट्रातील आदर्श व यशस्वी सहकारी सोसायट्यांचा अभ्यास करण्यासाठी लवकरच दोन दिवसांचा अभ्यासदौरा आयोजित करण्यात येणार आहे. या दौऱ्यात सेवा सोसायट्यांचे चेअरमन प्रत्यक्ष पाहणी करून तेथील विविध व्यवसायिक उपक्रम, संस्थेचे व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचा अभ्यास करणार आहेत. या अभ्यासदौऱ्यासाठी इच्छुक चेअरमन यांनी आपली नावे निबंधक कार्यालय व कृषी विभागाकडे द्यावीत, असे आवाहन आमदार अभिमन्यू पवार यांनी केले.

गाव तिथे सोसायटी' हा संकल्प पुढे नेत ज्या गावांमध्ये अद्याप विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था नाहीत, त्या गावातील नागरिकांनी आपल्या गावासाठी स्वतंत्र सोसायटी स्थापन करणेबाबतही चर्चा झाली.सेवा सोसायट्यांचा विस्तार, कर्जमाफीच्या अडचणींचा आढावा आमदार अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत आढावा या बैठकीत घेण्यात आला.

## भोजराजनगर शाळेत शिक्षकांचा यथोचित सत्कार



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. ५ सप्टेंबर : येथील भोजराजनगर भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त तसेच शिक्षक दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोजराजनगर येथे शिक्षक-शिक्षिकांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात मुख्याध्यापक तोंडारे परमेश्र्वर, तसेच सांगवे देविदास, उंबरगे काशिनाथ, सूर्यवंशी महादेव, छपरावळे वाघंबर, धुमाळे विजया, भुरे मनीषा, पाटील वनिता, मुळे आशा यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त शिक्षक महादेव पारशेट्टे यांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष संदिप धुमाळे यांनी केले होते. शिक्षक दिनानिमित्त झालेल्या या सन्मानामुळे शिक्षक-शिक्षिकांनी समाधान व्यक्त केले.

## आटोळा ग्रामसभेतील रेटकार्डाचे व्हिडीओ प्रकरण तापले; सरपंचाच्या खुलाशाची चौकशी करण्याची निवेदनाद्वारे मागणी



तभा वृत्तसेवा

चाकूर, दि. ५ सप्टेंबर : चाकूर तालुक्यातील आटोळा येथे दि. १७ ऑगस्ट २०२६ रोजी श्रीराम मंदिर येथे झालेल्या ग्रामसभेत विहीर व गोठ्याचे सरपंचाने रेटकार्ड सांगितल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता.त्यामुळे तालुक्यात मोठी खळबळ उडाली होती.या प्रकरणी आटोळा येथील ग्रामस्थ आकाश तोडकरी यांनी पंचायत समिती चाकूरचे गटविकास अधिकारी संताजी माने यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असून तक्रार अर्जात म्हटले आहे की, ग्रामसभेत सरपंचांनी केलेले वक्तव्य हे व्हिडीओमध्ये स्पष्टपणे रेकॉर्ड झाले आहे.सदर व्हिडीओ कोणत्याही प्रकारे बनावट नसून एडिट केलेला किंवा चुकीच्या पद्धतीने सादर केलेला नसून तो ग्रामसभेतील प्रत्यक्ष वक्तव्याचा पुरावा आहे.सरपंचांनी दिलेला खुलासा हा वस्तुस्थितीशी विसंगत आहे.आसा तक्रारीत दावा करण्यात आला आहे.

त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. व्हिडीओची सत्यता तपासावी, १७ ऑगस्टच्या ग्रामसभेला उपस्थित असलेल्या सदस्यांचे जबाब नोंदवावेत आणि उपलब्ध कागदपत्रे तपासून वस्तुस्थिती निश्र्चित करावी, असे निवेदनात म्हटले आहे.सरपंचांनी दिलेल्या खुलाशाचा विचार करताना १७ ऑगस्टच्या ग्रामसभेतील त्यांच्या स्वतःच्या वक्तव्याचा व्हिडीओ पुरावा म्हणून ग्राह्य धरून नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

या तक्रार अर्जासोबत ग्रामसभेच्या व्हिडीओची प्रत, सरपंचांच्या खुलाशाची प्रत आणि ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या जोडण्यात आल्या आहेत.यावेळी सागर शेटे,आकाश तोडकरी,सचिन शेटे,शिवशंकर रावळे, राजू मुजावर ,गजानन शेटे,परमेश्र्वर शेरे,अलंकार शेरे,जाहीर बेग,अक्षय शेटे आदिंच्या उपस्थितीत गटविकास अधिकारी संताजी माने यांच्या कडे तक्रार दाखल करण्यात आली आहे.ग्रामस्थांनी दिलेल्या तक्रारीवर गटविकास अधिकारी काय कारवाई करतील याकडे आटोळासह संपूर्ण चाकूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांचे आज अनावरण



तभा वृत्तसेवा

लातूर दि. ५ सप्टेंबर : क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त माणूस प्रतिष्ठान, लातूरच्या वतीने औसा तालुक्यातील बुधोडा येथील 'माझं घर' प्रकल्पात महात्मा जोतीराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यांचे अनावरण करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम आज रविवार सकाळी ११ वाजता होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार राहणार असून, ज्येष्ठ लेखक, विचारवंत व मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांच्या हस्ते पुतळ्यांचे अनावरण करण्यात येणार आहे. समाजसेवक हरीशचंद्र सुडे, राज्याध्यक्ष, अंधश्रद्धा निर्मूलन समिती महाराष्ट्र माधव बावगे, माजी आमदार माणिकराव जाधव, सुनीता अरळीकर, साहेबअली सौदागर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

तसेच प्रा. सुभाष भिंगे, रामराजे आग्राम, सुनील हेंगणे, प्रा. हर्षवर्धन कोल्हापूरे, प्राचार्य डॉ. आरडी निटूरकर, नरसिंग घोडके, लक्ष्मणराव वंगे, शिवाजीराव माडे, भारत काळे व प्रा. गोविंद वाघमारे यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी वंचित घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. स्त्री-शूद्रांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याच्या स्मरणार्थ हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे.या सोहळ्यासाठी अखिल भारतीय सत्यशोधक समाज, लातूरचे अध्यक्ष प्राचार्य पांडुरंग भिसे व सचिव प्रा. डॉ. चंद्रकांत माळी यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. या ऐतिहासिक सोहळ्यास सर्वांनी सहपरिवार उपस्थित रहावे, असे आवाहन सौ. संगीता झरे, शरद झरे व माणूस प्रतिष्ठान तथा माझं घर परिवाराने केले आहे.

## बसस्थानकाच्या नूतनीकरणाचे काम अगोदरच मंजूर - श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये : शिवाजीराव काळे

तभा वृत्तसेवा

चाकूर दि. ५ सप्टेंबर : चाकूर बसस्थानकाच्या नूतनीकरण व वाढविस्ताराचे काम राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या नेतृत्वात याआधीच मंजूर करण्यात आले असून, त्याच्या सर्व शासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत. काही दिवसातच कार्यारंभ आदेश प्राप्त होताच राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते या कामाचा शुभारंभ होणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे यांनी दिली.

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात शिवाजीराव काळे म्हणाले की, काही जण समाज माध्यमातून खोटा प्रचार करत आहेत की, मी मुंबईत जाऊन परिवहन मंत्र्यांची भेट घेतल्यामुळे हे काम मंजूर झाले. असे खोटे दावे करून मंजूर कामाचे श्रेय घेऊ नये.

काही दिवसांपूर्वी चाकूर येथील एकाने मुंबईत जाऊन परिवहन मंत्र्यांची भेट घेतल्याचे सांगत समाज माध्यमावर पोस्ट केल्या की, माझ्यामुळे ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. प्रत्यक्षात या कामासाठी २ कोटी ११ लाख रुपये निधी मंजूर आहे. ज्यांना मंजूर निधी किती आहे हेच माहित नाही, त्यांनी माझ्यामुळे काम मंजूर झाले असे म्हणणे हास्यास्पद आहे.

सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या नेतृत्वात केवळ चाकूरच नव्हे तर अहमदपूर विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक बसस्थानकाचे सिमेंट काँक्रिटीकरण, शिरूर ताजबंद येथे नवीन बसस्थानक, अहमदपूर येथे बसस्थानकाची दुरुस्ती व अद्यावत बसस्थानकाची कामे करण्यात आली आहेत. त्यामुळे कोणीही उगाच श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष शिवाजी काळे यांनी केले आहे.

## महाराष्ट्र महाविद्यालयात ललित कला प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ५ सप्टेंबर : महाराष्ट्र महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने ललित कलाप्रकाराच्या एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उदघाटन परभणीचे प्रसिद्ध व्यंगचित्रकार सिद्धार्थ नागठाणकर यांच्या हस्ते करण्यात आले.

उदघाटन पर मनोगतात सिद्धार्थ नागठाणकर यांनी ललित कला प्रकारावर कार्यशाळा आयोजित करणारे स्वा.रा.ती.म.विद्यापीठातील हे एकमेव महाविद्यालय आहे.ज्यांनी ललित कला प्रकार विद्यार्थ्यांना माहिती व्हावेत यासाठी कार्यशाळा आयोजित केली आहे याबद्दल गौरवोद्गार काढले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ललित कला प्रकाराविषयी योग्य मार्गदर्शन मिळत नाही त्यामुळे विद्यार्थी ललित कलेपासून दूर राहतात. विद्यार्थ्यांची ही कलात्मक गरज ओळखून त्यांच्या मध्ये ललित कलाप्रकाराची आवड निर्माण होऊन करिअर च्या दृष्टीने विद्यार्थी तयार व्हावेत या उद्देशाने महाविद्यालयातील विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने या ललित कला प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेसाठी महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. विजय पाटील निलंगेकर तसेच सचिव श्री. बब्रूवानजी सरतापे यांनी शुभेच्छा दिल्या.

या कार्यशाळेत ललित कलाप्रकारातील चित्रकला (ऑन द स्पॉट पेंटिंग ),पोस्टरमेकिंग,कोलाज, कलात्मक जुळवणी (इन्स्टॉलेशन ) व्यंगचित्रकला ( कार्टूनिंग )मेहंदी,रांगोळी,स्थळ छायाचित्रण ( स्पॉट फोटोग्राफी ) मृदूमूर्तिकला या नऊ ललित कला प्रकाराविषयी विद्यार्थ्यांना लेखी आणि प्रात्यक्षिक या दोन्ही पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले. ललित कार्यशाळेत दोनशे पन्नास विद्यार्थी सहभागी झाले होते.

ललित कला कार्यशाळेच्या कार्यक्रम अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ.भास्कर गायकवाड यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात ते म्हणाले की कला जोपासता जोपासता करिअर म्हणून सुद्धा त्याकडे पाहिले पाहिजे. यातून संधी प्राप्त होऊ शकते अशा संधीचे सोने करण्याचा सल्ला त्यांनी दिला. प्रास्ताविक विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख डॉ.हंसराज भोसले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.संदीप सूर्यवंशी यांनी तर आभार डॉ.नरेश पिनमकर यांनी मानले.कार्यशाळा यशस्वीतेसाठी विद्यार्थी विकास विभागातील प्रा. एस.एस.बदनाळे, प्रा.गिरीश पाटील, प्रा.दर्शन पाटील,प्रा.प्रसाद धुमाळ,प्रा.शुभांगी पवार, प्रा.सपना मोरे, विद्यार्थी सांस्कृतिक प्रतिनिधी अमर तुरे आदींनी मेहनत घेतली.

## लाल बहादुर शास्त्री प्राथमिक शाळेत दही हंडी उत्सव उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

उदगीर दि ५ सप्टेंबर : येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित लाल बहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालय, उदगीर येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला.

या प्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण व राधेच्या वेशभूषेत सहभागी होऊन सर्वांचे लक्ष वेधून घेतले. दहीहंडी उत्सवाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. गोविंदा पथकाच्या सहभागामुळे शाळेचा परिसर गोविंदा आला रे आला या जयघोषाने दुमदुमून गेला.

दहीहंडी उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एकता, संघभावना, शिस्त, धैर्य आणि सहकार्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडून उत्सवाचा आनंद लुटला.

या कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक मिरगुडे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे दहीहंडी उत्सव अत्यंत आनंदात व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

## पूनम मिनियार स्मरणार्थ निलंगा तालुकास्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. ५ सप्टेंबर : मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त तालुक्यातील हरिजवळगा येथील कमळाई सार्वजनिक वाचनालय, कॅ. शाहूराज बिराजदार प्रतिष्ठान व महर्षी दयानंद माध्यमिक विद्यालय,भुतमुगळी यांच्या संयुक्त विद्यमाने स्व.पूनम दिलीप मिनियार यांच्या स्मरणार्थ माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी निलंगा तालुकास्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

वादविवाद स्पर्धे चा विषय आजची स्त्री आत्मनिर्भर आहे किंवा नाही असून स्पर्धेत भाग घेणाऱ्या प्रत्येक माध्यमिक शाळेने दोन विद्यार्थ्यांचा संघ पाठवून द्यावे. जेणेकरून एक स्पर्धक अनुकूल व एक प्रतिकूल बाजू मांडेल. स्पर्धेचे उदघाटन कासार शिरसी चे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रताप गर्जे यांच्या हस्ते होणार असून यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी संतोष स्वामी उपस्थित राहणार आहेत.

तालुका परिसरातील पालक व काही उपक्रमशील शिक्षक बांधवानी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या विचाराला आणि वक्तृत्व गुणाला संधी देण्यासाठी *तालुका स्तरीय माध्यमिक शालेय वादविवाद स्पर्धा आयोजित करण्याचा आग्रह केल्याने मराठवाडा मुक्ती दिनाच्या एक दिवस अगोदर म्हणजे दि.१६ सप्टेंबर रोजी सकाळी ९-00 वाजता भुतमुगळी येथील स्व.महर्षी दयानंद विद्यालयात या वादविवाद स्पर्धा होणार आहेत. स्पर्धे तील विजेत्यांना दिनांक १७ सप्टेंबर २०२६ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बक्षिसाचे वितरण केले जाणार आहे. स्पर्धे तील विजेत्या संघांना

स्व.पूनम मिनियार यांच्या स्मरणार्थ. प्रथम संघास २१०० रु.आणि फिरता चषक,स्व.पांडुरंग संभाजी तांबोळे यांच्या स्मरणार्थ, द्वितीय संघास १५०० रु. तृतीय संघास १००० रु आणि उत्तेजनार्थ ५०० रु पारितोषक ठेवण्यात आले आहे.

स्पर्धेत भाऊ घेऊ इच्छिणाऱ्या संघाने १४ सप्टेंबर पर्यंत वाघमारे सर(महाराष्ट्र विद्यालय,चिंचोली सायखान), घोसले सर (ज्ञानेश्र्वर विद्यालय, हरी जवळगा/उस्तुरी) आणि गायकवाड सर(महर्षी दयानंद विद्यालय, भूतमुगळी) यांच्याकडे आपली नाव नोंदणी करावी असे आवाहन संयोजक कमळाई सार्वजनिक वाचनालय,हरी जवळगा व कॅ.शाहूराज बिराजदार प्रतिष्ठान हरी जवळगा आणि सह संयोजक:महर्षी दयानंद माध्यमिक विद्यालय,भुतमुगळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

CMYK

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शिक्षक दिनी शिवाजी कदम यांचा शिष्याकडून सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ सप्टेंबर -**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून सेवानिवृत्त क्रीडा शिक्षक शिवाजीराव कदम यांचा त्यांचे माजी विद्यार्थी तथा नुकतेच फौजदारपदी नियुक्त झालेले सादिक शेख यांनी घरी जाऊन सन्मान केला.



आपल्या यशात कदम सरांचे मोठे योगदान असल्याची कृतज्ञता व्यक्त करत शेख यांनी त्यांचा सन्मानपूर्वक सत्कार केला. यावेळी माजी प्राचार्य चंद्रकांत घुमरे, मारुती धनवे, परंड्याचे पोलीस पाटील संजय कदम, नदीम डोंगरे, संतोष कदम आदी उपस्थित होते. सादिक शेख म्हणाले, माझ्या शिक्षणाची यशस्वी वाटचाल कदम सरांमुळेच शक्य झाली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे मी आज फौजदारपदापर्यंत पोहोचलो आहे. त्यांच्या ऋणातून मुक्त होण्याच्या भावनेतून शिक्षक दिनी त्यांचा सन्मान केला. तालुक्यातील अनेक विद्यार्थ्यांना घडविण्यात कदम सरांचा मोठा वाटा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# शिक्षक दिनीच 'गुरुजी' आंदोलनात; पदोन्नती प्रक्रियेविरोधात साखळी उपोषण

### दिव्यांग आरक्षणाची अंमलबजावणी न झाल्याचा आरोप; लोकप्रतिनिधींचा आंदोलनाला पाठिंबा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ सप्टेंबर -**

प्राथमिक शिक्षक संवर्गातील पदोन्नती प्रक्रियेत दिव्यांग आरक्षणाची योग्य अंमलबजावणी न झाल्याचा आरोप करत पदोन्नती प्रक्रिया रद्द करून नव्याने राबविण्याच्या मागणीसाठी शिक्षकांनी शिक्षक दिनीच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत साखळी उपोषणाला सुरुवात केली. शनिवार (दि. ५) आंदोलनाचा पहिला दिवस असून विविध लोकप्रतिनिधींनी आंदोलनस्थळी भेट देत शिक्षकांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला.



जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील, आमदार कैलास पाटील, जिल्हा परिषदेचे उपसभापती प्रमोद पाटील तसेच जिल्हा परिषद सदस्य महेंद्र धुरगुडे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलक शिक्षकांशी संवाद साधला. शिक्षकांच्या मागण्या जाणून घेत त्यांनी आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. ३ जुलै २०२६ रोजी झालेल्या प्राथमिक शिक्षक संवर्गातील पदोन्नती प्रक्रियेत दिव्यांग आरक्षणाची योग्य अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे.

तसेच पदोन्नतीच्या यादीवर घेण्यात आलेल्या आक्षेपांची पूर्तता न करताच प्रक्रिया राबविण्यात आल्याचा दावा शिक्षक संघटनेने केला आहे. दिव्यांग कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये चार टक्के आरक्षणाची तरतूद असतानाही त्याची अंमलबजावणी न झाल्याने दिव्यांग शिक्षकांवर अन्याय झाल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. याशिवाय विस्तार अधिकारी श्रेणी-२ची पदे भरू नयेत, असा शासन निर्णय असतानाही ही पदे भरल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

त्यामुळे ३ जुलै रोजीची पदोन्नती प्रक्रिया तात्काळ रद्द करून शासन निर्णय व कायद्यानुसार नव्याने प्रक्रिया राबवावी, अशी प्रमुख मागणी आंदोलक शिक्षकांनी केली आहे. मागण्या मान्य होईपर्यंत साखळी उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार शिक्षकांनी व्यक्त केला आहे.

## धाराशिवच्या शिल्पनिदेशक डॉ. किरण झरकर यांचा राष्ट्रपतींच्या हस्ते राष्ट्रीय सन्मान

### छत्रपती संभाजीनगर विभागातील आयटीआय क्षेत्राला प्रथमच राष्ट्रीय सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ सप्टेंबर -**

भाई उद्धवराव पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिवचे शिल्पनिदेशक डॉ. किरण प्रकाश झरकर यांना शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील विज्ञान भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि ५० हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील आयटीआय क्षेत्राला प्रथमच हा राष्ट्रीय सन्मान मिळाला आहे.



डॉ. झरकर यांनी १७ वर्षांच्या सेवेत व्यवसाय शिक्षण, कौशल्य विकास, विद्यार्थीहित, संशोधन व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल आयटीआय प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन मिळावे यासाठी त्यांनी २५० ग्रामपंचायतींचे ठराव आणि १० हजार नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांद्वारे शासनाचे लक्ष वेधले. 'व्यवसाय प्रशिक्षण परियोजना'च्या माध्यमातून औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या कार्यपद्धतीत बदल घडवून आणण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले. 'स्किलबुक' ही संगणक प्रणाली हा त्यांच्या कार्यातील महत्त्वाचा उपक्रम ठरला. या प्रकल्पासाठी त्यांच्या पत्नी स्मिता झरकर यांनी स्वतःचे दागिने विकून निधी उभा केला. पुढे समाजसेवक रमेश अण्णा मुळे यांच्या सहकार्याने हा प्रकल्प साकारला. या प्रणालीचे नवी दिल्ली येथे शंकराचार्य स्वामी निश्चलानंद सरस्वती यांच्या हस्ते लोकार्पण झाले.

डॉ. झरकर हे 'वंदे मातृशक्ती' या पुस्तकाचे लेखक असून त्यांच्या नावावर एक पेटंट, एक ट्रेडमार्क, १६ पुस्तके व तीन संशोधन प्रबंध आहेत. आयटीआय व कौशल्य विकास क्षेत्रावर त्यांनी मोठ्या प्रमाणावर लेखन केले आहे. विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातूनही त्यांचे कार्य सुरू आहे. डॉ. झरकर हे मूळचे ईट येथील थोर स्वातंत्र्यसेनानी देविदास माधव झरकर यांचे नातू आहेत. स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतलेल्या देविदास झरकर यांनी 'वंदे मातरम्' व 'जन गण मन'च्या माध्यमातून जनजागृती केली होती.

विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीतही त्यांनी योगदान दिले. झरकर कुटुंबातील स्वर्गीय स्वातंत्र्यसेनानी ॲड. राजाभाऊ झरकर यांनीही राष्ट्रकार्य व सामाजिक क्षेत्रात योगदान दिले.

या पुरस्कारामुळे धाराशिवच्या मातीतून राष्ट्रीय स्तरावर आयटीआय व कौशल्य शिक्षण क्षेत्रातील कार्याची दखल घेतली गेल्याने जिल्ह्यासह मराठवाड्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आदर्श प्राथमिक विद्यामंदिरात जन्माष्टमीचा उत्साह; चिमुकल्यांनी फोडली दहीहंडी



कृष्ण-राधेच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी वेधले लक्ष; 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ सप्टेंबर -**

आदर्श प्राथमिक विद्यामंदिर, धाराशिव येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडीचा कार्यक्रम उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, राधा आणि गोपिकांची वेशभूषा करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.



शाळेच्या प्रांगणात दहीहंडी बांधण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी मानवी मनोरे रचत पारंपरिक पद्धतीने दहीहंडी फोडली. यावेळी 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. कृष्णाच्या वेशभूषेतील मुलांनी तसेच राधेच्या आकर्षक वेशभूषेतील मुलींनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती, परंपरा आणि विविध सणांचे महत्त्व रुजावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

## इटकळमध्ये बाळूमामांच्या पालखीचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.५ सप्टेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील इटकळ येथे श्री संत बाळूमामा यांच्या १० नंबर पालखीचे शुक्रवारी (दि. ४ सप्टेंबर) सकाळी आगमन झाले. पालखीच्या स्वागतासाठी ग्रामस्थ व भाविकांनी मोठी गर्दी केली होती. 'बाळूमामा की जय'च्या जयघोषाने परिसर भक्तिमय झाला.

सायंकाळी झालेल्या महाआरतीस गावासह परिसरातील हजारो भाविक उपस्थित होते. महाआरतीनंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. धार्मिक सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी रामराजे पाटील, किशोर महाणूरे, दादा भोपळे, शंकर वाघमोडे, धोंडिबा शिंदे यांच्यासह ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# 'बैल बाजार' न मांडता महाराष्ट्रात तातडीने दुष्काळ जाहीर करा

### पावसाने दडी मारल्याने पिके करपली; चारा व पाणीटंचाईचेही संकट गंभीर : ॲड. रेवण भोसले

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ सप्टेंबर -**

गेल्या दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने मराठवाडा, विदर्भासह महाराष्ट्राच्या बहुतांश भागावर दुष्काळाचे भीषण सावट निर्माण झाले आहे. पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांचा चारा आणि अन्नधान्याच्या टंचाईचे संकटही आगामी काळात गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केंद्र व राज्यातील 'डबल इंजिन' सरकारने आमदार, खासदार व नगरसेवकांचा 'बैल बाजार' न मांडता या भीषण संकटाची तातडीने दखल घेऊन महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी समाजवादी नेते ॲड. रेवण भोसले यांनी केली.

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून राज्यभर पावसाने दडी मारल्याने सोयाबीनला शेंगा, कापसाला बोंडे आणि मक्याला कणसे धरण्याच्या महत्त्वाच्या अवस्थेतच पिकांना पाण्याची कमतरता भासत आहे. ऐन फुलोऱ्यात पाऊस गायब झाल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांदेखत उभी पिके वाळू लागली आहेत. विहिरी किंवा अन्य जलस्रोत असलेल्या शेतकऱ्यांनी जुलै महिन्यातील पावसातून साठलेल्या पाण्यावर पिके जगविण्याचा प्रयत्न केला; मात्र हा पाणीसाठाही आता संपल्याने पिके वाचवायची कशी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.



मराठवाडा, विदर्भ तसेच पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये सोयाबीन, कापूस, मका, तूर आणि हळद या पिकांना मोठा फटका बसला आहे. उडीद व मूगही हातचे गेल्याची स्थिती आहे. लाखो हेक्टरवरील पिकांनी माना टाकल्याने शेतकऱ्यांचा उत्पादनासाठी झालेला खर्च आणि कष्ट वाया जाण्याची वेळ आली आहे. शेतीची मशागत, पेरणी, बियाणे, खते, तणनियंत्रण, कीड-रोग नियंत्रणासाठी औषधांची फवारणी आणि मजुरी यामुळे उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. चांगले उत्पादन मिळून कर्जाचा बोजा कमी होईल, या आशेवर असलेल्या शेतकऱ्यांची पावसाअभावी मोठी निराशा झाली आहे.

मांजरा धरणासह मराठवाड्यातील अनेक लहान-मोठ्या धरणांमध्ये अत्यल्प पाणीसाठा आहे. विदर्भातील अनेक लघु व मध्यम प्रकल्पही कोरडे पडले आहेत. सप्टेंबरचा पहिला आठवडा संपत आला तरी पावसाची चिन्हे दिसत नसल्याने गहू, हरभरा यांसह रब्बी पिकांची पेरणी होईल की नाही, याची चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे.

ऐन पावसाळ्यातच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. जमिनी अशाच कोरड्या राहिल्यास पुढील सात-आठ महिने पशुधन जगविण्यासाठी आवश्यक मका, ज्वारीचा चारा उपलब्ध कुठून करायचा, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. त्यामुळे शासनाने केवळ पीक पाहणी व पंचनाम्यांची औपचारिकता न करता प्रत्यक्ष मदतीसाठी ठोस उपाययोजना करावी, अशी मागणीही भोसले यांनी केली.

पावसाअभावी झालेल्या नुकसानीची सरसकट भरपाई सर्व शेतकऱ्यांना देण्यासाठी शासनाने तातडीने विशेष योजना आखावी आणि महाराष्ट्रात दुष्काळ जाहीर करून शेतकरी व पशुधनासाठी तातडीने मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ॲड. रेवण भोसले यांनी केली.

## दातृत्वाचा हात; एकलव्य विद्या संकुलात दोन इंटरॅक्टिव्ह बोर्डचे लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.५ सप्टेंबर -**

मंगरूळ-यमगरवाडी येथील एकलव्य विद्या संकुलातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण घेता यावे, यासाठी शिखर पहारिया फाउंडेशन, मुंबई यांच्या वतीने दोन अत्याधुनिक इंटरॅक्टिव्ह पॅनल बोर्ड उपलब्ध करून देण्यात आले. प्रत्येकी सुमारे तीन लाख रुपये किमतीच्या या बोर्डचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

शिखर पहारिया फाउंडेशनच्या वतीने महाराष्ट्रात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविले जात असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व सामाजिक प्रगतीसाठीही सातत्याने योगदान दिले जाते. याच सामाजिक बांधिलकीतून एकलव्य विद्या संकुलातील विद्यार्थ्यांसाठी हे अत्याधुनिक इंटरॅक्टिव्ह बोर्ड उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

या बोर्डचे लोकार्पण शिखर पहारिया फाउंडेशनचे राज सलगर, धर्मराज गुंडे, विजय जमदाडे तसेच भटके-विमुक्त विकास प्रतिष्ठानचे ॲड. प्रदीपसिंग राजपूत यांच्या हस्ते करण्यात आले.

इंटरॅक्टिव्ह बोर्डमुळे विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणासोबतच दृक्-श्राव्य माध्यमातून अभ्यास करता येणार असून, अवघड संकल्पना अधिक सुलभ पद्धतीने समजून घेण्यास मदत होणार आहे. शैक्षणिक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञान पोहोचविणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

कार्यक्रमास संकुलाचे मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे, अण्णासाहेब कोल्हटकर, अण्णासाहेब मगर, संतोष बनसोडे, दयानंद भडंगे, हरीश मगदूम, भीम कुंभार, माधव पाटील, संतोष शितोळे, निर्मला हुग्गे, प्रणिताबाई शेटकार, कोंडीबा देवकर, दत्ता भोजने, शालीवाहन वाघमोडे, खंडू काळे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## वाठवडा शाळेत शिक्षक दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव, दि.५ सप्टेंबर -**

कळंब तालुक्यातील वाठवडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षकांचा सत्कार करून त्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

## धाराशिव जिल्हा तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करा



शिवराज्याभिषेक सोहळा समितीची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ सप्टेंबर -**

शिवराज्याभिषेक सोहळा समिती, धाराशिवच्या वतीने जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीचे निवेदन शुक्रवारी (दि. ४) जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री यांना देण्यात आले. अत्यल्प पावसामुळे जिल्ह्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी व नागरिकांना मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, भात आदी खरीप पिके सुकून गेली आहेत. खरीप हंगाम हातातून गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून माणसे व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे सन २०२६-२७ मध्ये धाराशिव जिल्हा तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी समितीचे ज्येष्ठ मार्गदर्शक गुंडोपंत जोशी, हनुमंत तांबे, आकाश भोसले, तालुकाध्यक्ष बबलू भोईटे, शहराध्यक्ष संतोष घोरपडे, अविनाश रणखांब, रामानंद माडेकर, विशाल गाढवे, आशिष क्षिरसागर, गणेश गाढवे, गोपाळ चौधरी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## उमरग्याच्या पवन मानेने पटकावला जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा प्रथम क्रमांक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ सप्टेंबर -**

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, धाराशिवचे संस्थापक व प्रेरणास्थान गुरुवर्य के. टी. पाटील यांच्या ९७व्या जयंतीनिमित्त श्रीपतराव भोसले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ३ व ४ सप्टेंबर रोजी जिल्हास्तरीय कनिष्ठ महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

४ सप्टेंबर रोजी स्पर्धेची अंतिम फेरी आणि विजेत्या स्पर्धकांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष सुधीर पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे उपस्थित होते.

यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, सरचिटणीस प्रेमाताई पाटील, संचालक बी.जी. जाधव, अभिराम पाटील, डॉ. मंजुळा पाटील, डॉ. तनया पाटील आदी उपस्थित होते.

स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत जिल्हाभरातील ८० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यातून १६ विद्यार्थ्यांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. अंतिम फेरीत छत्रपती शिवाजी कॉलेज, उमरगा येथील माने पवन रवींद्र यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

छत्रपती शिवाजी उच्च माध्यमिक विद्यालय, धाराशिवच्या मोरे सुषमा अण्णासाहेब यांनी द्वितीय, सरस्वती विद्यालय, तामलवाडीच्या सुरते साक्षी सूर्यकांत यांनी तृतीय क्रमांक मिळविला. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नळदुर्गच्या शिंदे सई संतोष व शेळके अश्विनी महादेव यांनी संयुक्तपणे चतुर्थ क्रमांक, तर श्रीपतराव भोसले ज्युनिअर कॉलेज, धाराशिवच्या जावळे साक्षी बाळासाहेब यांनी पाचवा क्रमांक मिळविला.



के.टी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त स्पर्धेचा समारोप; ८० विद्यार्थ्यांचा सहभाग

स्पर्धेचे परीक्षक म्हणून सूर्यकांत कापसे, के. पी. पाटील, संदीप जगताप, मनोज डोलारे, अरुण बोबडे, तानाजी हाजगुडे, अनिता तुंगीकर आणि महादेवी वाडकर यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्तात्रय जाधव व डी. वाय. घोडके यांनी केले.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## व्ही.पी. एज्युकेशनल कॅम्पसमध्ये शिक्षक दिन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.५ सप्टेंबर -**

व्ही. पी. एज्युकेशनल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर रोड येथे संस्थाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील व मार्गदर्शक करण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व तसेच दोन्ही महान व्यक्तींच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाविषयी मनोगत व्यक्त केले.

यावेळी शिक्षक हे विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे मार्गदर्शक असून, त्यांच्या ज्ञान व संस्कारांमुळे व्यक्तिमत्वाची जडणघडण होते, असा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### आ. स्वामी यांचा शिक्षक दिनी सत्कार

**लोहारा, दि.५ सप्टेंबर -**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून आ. प्रवीण स्वामी यांचा लोहारा तालुक्याच्या वतीने शनिवारी लोहारा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मदन सोमवंशी पाटील, जट्टे, पांचाळ, महेबूब गवंडी, मोहन शेवाळे, प्रशांत गिराम यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.



### मलकापूर शाळेत जन्माष्टमी साजरी

**येरमाळा, दि.५ सप्टेंबर -**

मलकापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शुक्रवारी (दि. ४) श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यानिमित्त विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण व राधेची आकर्षक वेशभूषा करून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थ्यांना श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रेम, मैत्री, कर्तव्यनिष्ठा व सदाचाराचे महत्त्व सांगण्यात आले. चिमुकल्या राधा-कृष्णाच्या वेशभूषेने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमास मुख्याध्यापक बळीराम भंडारे, शिक्षिका नंदा गाडे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. संस्कृती व परंपरांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



### तुळजापूरमध्ये शिक्षकांचा सन्मान

**तुळजापूर, दि.५ सप्टेंबर -**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी, शाखा तुळजापूरच्या वतीने शहर व परिसरातील ज्येष्ठ व आदर्श शिक्षकांचा सन्मान समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी विविध शाळांमधील शिक्षकांचा शाल, पुष्पगुच्छ व पेन देऊन सत्कार करण्यात आला. तालुका क्रीडा समन्वयक इसाक पटेल, कला शिक्षक हुंडेकरी सतीश दिगंबरराव, क्रीडा शिक्षक आदटराव लिंबराज, क्षीरसागर किसन तुकाराम, हुंडेकरी डी.डी., अमृतवाडीचे पुरी, मसला खुर्दचे सुरेश राऊत, सारोळा जि.प. शाळेचे सुरवसे, अपसिंगा नरेंद्र आर्य विद्यालयाचे गणेश जळके, बापूसाहेब कदम आदींचा यावेळी गौरव करण्यात आला. लोकमंगल मल्टीस्टेटचे संचालक सचिन अडगळे यांनी शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाखाधिकारी राजकुमार पवार, धनंजय कदम, विनोद देवकर, सुनील साळुंखे, काका माने, फजल सिद्धकी, रोशनी सोनवणे, खंडेराव देवकर आदींनी परिश्रम घेतले.



### काँग्रेसची संघटनात्मक आढावा बैठक

**लोहारा, दि.५ सप्टेंबर -**

लोहारा तालुका काँग्रेस कमिटीची संघटनात्मक आढावा बैठक शुक्रवारी (दि.४) जिल्हाध्यक्ष उमेशराजे निंबाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडली. बैठकीत तालुका काँग्रेसच्या संघटनात्मक कामकाजाचा तसेच पदाधिकाऱ्यांना सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्यांचा आढावा घेण्यात आला. आगामी काळातील पक्षाच्या कामकाजाचे नियोजनही करण्यात आले. बैठकीस जिल्हा उपाध्यक्ष सरफराज काझी, शिवाजी गायकवाड, दत्तात्रय गाडेकर, श्यामसुंदर तोरकडे, प्रितम शिंदे, ॲड. सयाजी शिंदे यांच्यासह विविध सेलचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### प्रभुलिंगेश्वर महास्वामीजींची पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमांचे आयोजन

**अणदूर, दि.५ सप्टेंबर -**

येथील श्री निलकंठेश्वर मठाचे मठाधिपती लिं. प्रभुलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या २९ व्या पुण्यतिथीनिमित्त शनिवार, दि. ५ रोजी मठाधिपती श्री. ष. ब्र. शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अधिपत्याखाली विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी, दि. ४ रोजी रात्री मठात शिवभजनाचा जागर होणार आहे. शनिवारी सकाळी ७ वाजता श्री निलकंठेश्वर संजीवन समाधी व लिं. प्रभुलिंगेश्वर समाधीस महापूजा व रुद्राभिषेक होईल. त्यानंतर सकाळी १० वाजल्यापासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास जयशांतलिंगेश्वर महास्वामीजी, बसवलिंग महास्वामीजी, गंगाधर महास्वामीजी व सुतरेश्वर महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

# पावसाच्या खंडाने सोयाबीन संकटात

**वाशी तालुक्यात नुकसानग्रस्त शेतशिवाराची पाहणी; प्रत्यक्ष नुकसानीच्या प्रमाणात भरपाईसाठी शासनाकडे पाठपुरावा**



### आ. राणाजगजितसिंह पाटलांकडून पाहणी...

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.५ सप्टेंबर -**

धाराशिव जिल्ह्यात मागील दीड महिन्यापासून पावसाने मोठी उघडी दिल्याने खरीप हंगामातील सोयाबीन पिकाला मोठा फटका बसला आहे. पावसाअभावी सोयाबीनचा फुलोरा व शेंगा भरण्याची अवस्था धोक्यात आली असून अनेक ठिकाणी पिके करपू लागली आहेत. त्यामुळे हातातोंडाशी आलेले पीक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू असून, दुहेरी संकटामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.

जुलै महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने पिकांना पाण्याची गरज असतानाही विहिरी, बोअर, तलाव तसेच नदी-नाल्यांमध्ये पुरेसा पाणीसाठा उपलब्ध नसल्याने सिंचन करणेही शक्य होत नाही. वाशी तालुक्यातील चारही मंडळांमध्ये सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्यास सुरुवात झाली आहे.

आधीच खत, बियाणे व औषधांच्या वाढलेल्या दरामुळे उत्पादन खर्च वाढला आहे. त्यात सोयाबीनला अपेक्षित बाजारभाव मिळत नसताना पावसानेही साथ सोडल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे.

नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करून प्रत्यक्ष नुकसानीच्या प्रमाणात नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

याच पार्श्वभूमीवर तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी दि. ५ सप्टेंबर रोजी वाशी तालुक्यातील नुकसानग्रस्त भागांचा पाहणी दौरा केला.

तेरखेडा शिवारात आमदार पाटील यांनी कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ, आयआयटीमधील तज्ज्ञ तसेच कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सोयाबीन पिकाच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी केली. पावसाअभावी पिकांची झालेली अवस्था, फुलोरा व शेंगा भरण्यावर झालेला परिणाम याबाबत त्यांनी तज्ज्ञांकडून माहिती घेतली. शेतकऱ्यांनीही आपल्या शेतातील नुकसानीची वस्तुस्थिती आमदार व अधिकाऱ्यांसमोर मांडली.

यावेळी शेतकऱ्यांनी मागील वर्षी झालेल्या नुकसानीचाही मुद्दा उपस्थित केला.

मागील वर्षी वाशी तालुक्यात अतिवृष्टीसदृश पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. मात्र, या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना केवळ हजार ते दीड हजार रुपयांचीच मदत मिळाल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

मोठ्या नुकसानीच्या तुलनेत मिळालेली मदत अत्यल्प असल्याने यंदा तरी प्रत्यक्ष नुकसानीचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी आमदार पाटील यांच्याकडे केली.

शेतकऱ्यांच्या नुकसानीची वस्तुस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून देऊन तातडीने मदत मिळवून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच नुकसानभरपाईसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाही आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी यावेळी दिली.

## श्री श्री गुरुकुलमध्ये बालगोपालांनी फोडली दही हंडी




**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.५ सप्टेंबर -**

श्रीकृष्ण जन्मअष्टमी संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहाने साजरा केली जाते.तुळजापूर तालुक्यातील अणदूर मधील श्री श्री गुरुकुल या शाळेत शनिवारी (दि.५) दही हंडी व गोपाळकाला मोठ्या उत्साहात साजरा झाला.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. जितेंद्र कानडे व संचालिका डॉ. रूपाली कानडे यांच्या हस्ते राधाकृष्ण यांच्या प्रतिमेची व दहीहंडीची पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील बालकृष्ण व बालराधांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी विविध गीतावरती मुलांनी मुलींनी दांडिया खेळला, नृत्य सादर केली. शाळेतील १० वर्गाच्या विद्यार्थ्यांनी चार थर रचून दहीहंडी फोडली.

यासाठी मुख्याध्यापक लक्ष्मण नरे, मुख्याध्यापक शिवराज भुजबळ, मंजुषा जोशी, दीप्ती काजळे, रेखा राठोड, भाग्यश्री जमदाडे, जयश्री गायकवाड, अर्जुन माशाळकर यांनी परिश्रम घेतले.

## अणदूरमध्ये शिक्षक दिन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.५ सप्टेंबर -**

शिक्षण प्रसारक मंडळ व जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि शिक्षणमहर्षी, कर्मयोगी स्वर्गीय सि.ना. आलूरे गुरूजी यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव रामचंद्र आलूरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोकराव चिंचोले, प्रगतिशील शेतकरी रविंद्र घोडके, मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी आदी उपस्थित होते. यावेळी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित विविध शाळांमधून सेवानिवृत्त झालेल्या सुरेश ठोंबरे, गुलाब सय्यद, रविंद्र उपासे, जयंत जाधव, राजकुमार ठोंबरे, सुभाष माशाळकर, गेनसिद्ध बिराजदार, लिंबाजी सुरवसे, गोपीचंद पाटील, तुकाराम शिंदे, किरण कोरडे, महादेव सौदागर, अबुजर सय्यद, क्रांती अंधारे, मनोहर घोडके व विष्णुदास पाटील यांचा पुष्पहार आणि मानाची टोपी देऊन सन्मान करण्यात आला. विद्यार्थी मनोगतात आरूषी घोडके, विद्या पन्हाळकर, संस्कार माढेकर, आदित्य घोडके, विनायक पन्हाळकर, श्रावणी हगलगुंडे, यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगितले.

यावेळी अणदूर गावातील सेवानिवृत्त गुरूजन चंद्रकांत आलूरे, रामचंद्र साखरे, कैलास बोंगरगे, सुभाष लंगडे, धोंडिबा ऐकुंडे, कैलास गवळी, कराळे, सातप्पा व्हलदुरे, मारुती सारणे, बापू कांबळे, रामलिंग पडवळ, शिवपूत्र कोडले यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## दुष्काळ जाहीर करा; सोयाबीनला हेक्टरी एक लाखांचे अनुदान द्या

**कळंब तहसील कार्यालयासमोर राष्ट्रवादी काँग्रेसचे तीव्र निदर्शने; डॉ. प्रतापसिंह पाटील यांची प्रमुख उपस्थिती**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.५ सप्टेंबर -**

कळंब तालुक्यासह संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली आहेत. पावसाअभावी सोयाबीनसह विविध पिकांची वाढ खुंटली असून शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवले आहे. या पार्श्वभूमीवर तातडीने दुष्काळ जाहीर करावा, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये अनुदान द्यावे आणि प्रलंबित पीक विम्याची रक्कम तत्काळ शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, या मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार यांच्या वतीने कळंब तहसील कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली.

या आंदोलनास पक्षाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकऱ्यांनी शासनाचे लक्ष वेधत जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी तहसील प्रशासनाला निवेदन देऊन पावसाअभावी निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी करण्यात आली.

कळंब तालुक्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने खरीप पिकांच्या उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे. विशेषतः सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली. त्यामुळे शासनाने केवळ पंचनामे व आश्वासनांपुरते मर्यादित न राहता शेतकऱ्यांना प्रत्यक्ष आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

कळंब तालुकाध्यक्ष प्रा. तुषार वाघमारे, शहराध्यक्ष बाळासाहेब कथले, जिल्हा उपाध्यक्ष सुरेश निवृत्तिराव टकाळे, सरचिटणीस आत्माराम बिक्कड, चिटणीस भरत शिंदे, सचिव रमेश देशमुख, किसान सेल जिल्हाध्यक्ष औदुंबर धोंगडे, युवक तालुकाध्यक्ष भीमा हगारे, तालुका सचिव वाहेद पटेल यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दुष्काळग्रस्त परिस्थितीची तातडीने पाहणी करून सोयाबीन उत्पादकांना हेक्टरी एक लाख रुपये अनुदान, प्रलंबित पीक विम्याची रक्कम तसेच इतर शासकीय मदत त्वरित द्यावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली.

# पावसाच्या खंडाने खरीप पिके संकटात; आ. प्रवीण स्वामींकडून शेतशिवाराची पाहणी

**जेवळी, विलासपूर-पांढरी, बेडकाळ, मार्डी परिसरातील पिकांची पाहणी... नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करण्याची मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.५ सप्टेंबर -**

लोहारा तालुक्यात मागील काही दिवसांपासून पावसाचा खंड पडल्याने खरीप पिकांवर संकट निर्माण झाले आहे. पिकांच्या वाढीसाठी सध्या पावसाची नितांत गरज असताना पावसाने उघडीप दिल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर आमदार प्रवीण स्वामी यांनी जेवळी, विलासपूर-पांढरी, बेडकाळ आणि मार्डी परिसरातील शेतशिवारात प्रत्यक्ष जाऊन खरीप पिकांची पाहणी केली.

यावेळी आमदार स्वामी यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून सोयाबीन, तूर, मूग, उडीद यांसह विविध खरीप पिकांची सद्यस्थिती, जमिनीतील ओलावा, उपलब्ध पाण्याची परिस्थिती तसेच पावसाच्या खंडामुळे पिकांवर होत असलेल्या परिणामाची माहिती घेतली. पावसाच्या सुरुवातीच्या काळात झालेल्या पावसाच्या आधारावर शेतकऱ्यांनी पेरणी केली. मात्र, पिके वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर असताना पावसाने दडी मारल्याने जमिनीतील ओलावा कमी होत आहे. आगामी काळात पाऊस न झाल्यास पिकांच्या वाढीवर आणि उत्पादनावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी आमदारांच्या निदर्शनास आणून दिली.

पावसाचा खंड आणखी वाढल्यास संभाव्य पीक नुकसानीचे तातडीने पंचनामे करून महसूल व कृषी विभागामार्फत वस्तुनिष्ठ अहवाल तयार करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच शेतकऱ्यांना पीक विमा, नुकसानभरपाई आणि शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणीही करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होऊ नये आणि त्यांना शासनाच्या मदतीपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी प्रशासनाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे, अशी भूमिका आमदार प्रवीण स्वामी यांनी मांडली.

पावसाचा खंड वाढल्यास परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन संबंधित विभागांनी गावनिहाय पिकांची पाहणी करावी, शेतकऱ्यांच्या अडचणींची नोंद घ्यावी आणि आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात, अशी सूचनाही त्यांनी केली.

लोहारा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांची सद्यस्थिती आणि पावसामुळे निर्माण झालेली परिस्थिती शासन व प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.



शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करू, अशी ग्वाही आमदार प्रवीण स्वामी यांनी दिली.

प्रशासनाने केवळ पंचनाम्यापुरते मर्यादित न राहता शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळेल, यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

यावेळी तालुकाप्रमुख अमोल बिराजदार, माजी सरपंच राजू समने, सहाय्यक गटविकास अधिकारी जगदेव वगे, तसेच व्ही.के. कांबळे व राजू चव्हाण यांच्या शेतात सोयाबीन पिकाची पाहणी करताना तलाठी रेड्डी, साहेबलाल शेख, शिवानंद तोरकडे, ग्रामपंचायत सदस्य राम मोरे, बाबुराव डोंबे, उपकृषी अधिकारी शाम गंगणे, सहायक कृषी अधिकारी शैलेश जट्टे, नायब तहसीलदार अनिल अहिरे, कृषी सहाय्यक विक्रम निकम, अनिल गोरे, दत्ता पाटील, परमेश्वर गोरे, बळवंत जाधव, ज्ञानेश्वर गोरे, अतुल गोरे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.